


महाराष्ट्राचे जिल्हे

महाराष्ट्राचे जिल्हे

किंमत--२५ नवे पैसे

नागपूर

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्याचें प्रकाशन

शासन मुद्रणालय, नागपूर

J-222—1-B.

अनुक्रमणिका

नागपूर जिल्हा

१. ऐतिहासिक पार्श्वभूमि

काळाचीं पावलें न्याहाळीत येणाऱ्या प्रवाशाला नागपूर जिल्ह्यांत इतिहासाचें एक आगळेंच स्वरूप दिसेल.

इतिहासानें नागपूर जिल्ह्याला दिलेली चिरंतन आदरशीलतेची व विशाल दिलेरीची खूण त्याला मनोमनीं पटेल.

मान उंचाऊन पाहिल्यास प्राचीनता, ऐतिहासिकता व अर्वाचीनता यांचा विरळा सुरेख संगम येथें झाल्याचे त्याला गवसेल.

अन्यत्र मानव रानटी अवस्थेंत शिकार करून उदरनिर्वाह करीत असतांना येथील लोक वैदिक काळांत विद्या व संस्कृतीचें पीठ स्थापून आर्थिकदृष्ट्या एका विशाल संस्कृतीच्या उभारणीचें कार्यांत मग्न होते.

कॉफी आणि ब्राझील, सफरचंद आणि स्पेन, तद्वतच संत्रीं आणि नागपूर यांचे येथें झालेले मधुर, ऐतिहासिक व आशावादी समिकरण विशेष जाणवते. विणकरांच्या कुशल हस्तांनीं विणलेल्या पटांत येथील ऐतिहासिक समाज नटल्याचे प्रतित होते.

प्रभु रामचंद्राची पुनीत पावलें :

दक्षिण पथावरील भागाला विशेषतः विदर्भाला व त्यांतले त्यांत नागपूर जिल्ह्याला फार मोठा प्राचीन इतिहास आहे.

फार प्राचीन काळीं येथें घनदाट अरण्य होतें. पण अगस्त्य ऋषीनें विंध्यपर्वत ओलांडून व दक्षिणेंत गोदावरीच्या तटांवर आपला आश्रम स्थापून ह्या प्रदेशांत वसाहती स्थापण्याचा मार्ग आर्यांना दाखवून दिला.

रामायण काळांत हा भाग श्रीरामचंद्राच्या राज्यांत मोडत असे. येथील अरण्यांत तपमग्न असणाऱ्या ऋषिमुनींना छळणाऱ्या मायावी राक्षसांचे प्रभु रामचंद्राकडून निर्दालन, दक्षिणागमनांत रामटेक येथील सुतिक्ष्ण स्वामींच्या आश्रमास प्रभू रामचंद्राची भेट आदी प्रसंगांची वर्णनें रामायणांत आढळतात.

रामाच्या अयोध्येचे राज्य कोसल ह्या नांवानें ओळखले जात होते. रामानंतर कोसलचे दोन भाग झाले. विंध्यपर्वतापलीकडे उत्तर कोसल व दक्षिणेकडे दक्षिण कोसल, असे ते दोन भाग होते. श्रीरामचंद्राचा एक मुलगा कुश हा दक्षिण कोसलचा स्वामी होता. नागपूर जिल्हा दक्षिण कोसलमध्यें मोडत असे.

महाभारत काल :

महाभारत काळांतील विदर्भ नांवाच्या राजानें स्थापलेल्या व त्याच्या नांवावरून ओळखल्या जाणाऱ्या विदर्भ विभागांतील ह्या नागपूर जिल्ह्यांतील कांहीं शहरें आपला स्वतंत्र असा इतिहास बाळगून होती. महाभारताच्या अश्वमेघ खंडांत काटोलचा कुंतलपूर म्हणून उल्लेख सांपडतो. भिवकूंड लेण्याचा व मंसरचा पांडवांच्या अज्ञातवासाशीं संबंध दाखविण्यांत येतो.

प्राचीन युगीन राजांची परंपरा :

प्राचीन युगांत अभिर, मौर्य, गुप्त, आंध्र, राष्ट्रकुट, चालुक्य आदि राजांनी ह्या भागावर प्रभुत्व गाजवलें. त्यांच्यामुळें ह्या भागांत विविध सुधारणाहि झाल्या. त्यावेळचे अनेक ताम्रपट, शिलालेख व नाणीं उपलब्ध आहेत, त्यावरून हे स्पष्ट होते. हिंदू, जैन व बुद्धधर्मीय संस्कृति येथें नांदल्या. नागार्जून हा प्रसिद्ध बुद्ध पंडीत ह्याच भागांत प्रसिद्धीस आला. त्याची गुहा रामटेक येथें दाखविण्यांत येते.

वाकाटक व शैल घराणीं : ज्ञात इतिहास वाकाटक घराण्यापासून सुरूं होतो. वाकाटकांचा आद्यपुरुष रुद्रसेन नांवाचा होऊन गेला. त्याच घराण्यांतील प्रवरसेन नांवाचा राजा फार विद्वान होता. त्यानें प्राकृतांत 'सेतूबंध' नांवाचें महाकाव्य लिहिलें.

तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकांपर्यंत प्रसिद्धीस आलेल्या ह्या वाकाटकांच्या दोन घराण्यांपैकीं एका घराण्याची राजधानी ह्या जिल्ह्यांत होती. नंदिवर्धन किंवा नंदरधन अथवा ज्याला आज नगरधन असें प्रचलित नांव आहे ते ठिकाण नागपूर जिल्ह्यांतील रामटेक ह्या प्रसिद्ध व एका तहसिलीच्या मुख्य ठिकाणाच्या दक्षिणेस सुमारे तीन मैलावर आहे. ते वाकाटक राजवंशाच्या ज्येष्ठपातीचे व नंतर शैल नांवाच्या राजवंशाच्या राजधानीचे शहर होते. वाकाटकांचे आरंभीचे ताम्रपट ह्या नगराहूनच दिले गेलें आहेत. भोसल्यांचे कालापर्यंत नंदिवर्धनास महत्व होते. तेथें बांधलेला एक किल्लाहि आहे. हेमाडपंती पद्धतीनें बांधलेले कोटेश्वर महादेवाचे एक देवालयहि तेथें पहावयास सांपडतें. त्याला लागूनच शंखतीर्थ किंवा शुक्लतीर्थ नांवाचें तळेंहि आहे. याशिवाय प्राचीनकाळीं येथें हंसतीर्थ नांवाचें एक तळें होतें. त्याचा उल्लेख सिंदूरगिरी माहात्म्यांत येतो.

नंदिवर्धनाजवळील रामटेक हे फार प्राचीन काळापासून पुण्यक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेलें ठिकाण आहे. कांही विद्वानांचे मतें कवि कुलगुरु कालिदासाच्या मेघदूतम् नांवाचे सुप्रसिद्ध काव्यांत वर्णन केलेली रामगिरि म्हणजेच आजचे रामटेक होय. गुप्त-वाकाटक काळांत येथें प्रभू रामचंद्रावें सुप्रसिद्ध देवालय होतें. त्यामध्यें पादुकांची पुजा केली जात असे. वाकाटक राज्ञी प्रभावती गुप्ता हिनें व तिचा पुत्र द्वितीय प्रवरसेन यांचें कांही ताम्रपट रामचंद्राच्या पादुकांजवळ दिलें होतें असा उल्लेख आहे. तेराव्या शतकांत ह्या स्थळाची कीर्ति दूरदूरच्या प्रदेशांत पसरली होती, म्हणून गुजराथेंतून महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर हे रामटेकास येऊन कित्येक महिने येथें राहिले होते.

रामटेकजवळ मनसर नांवाचें आणखी एक प्राचीन स्थान आहे. तेथेंहि बरेच प्राचीन अवशेष आहेत. तेथें मध्यभागीं मोठा तलाव असून त्याच्या काठांवर प्राचीनकाळीं बुद्ध विहार व स्तूप बांधलेले होते, असे दिसते. येथील तीर्थाला मणिकालकुंड असें सिंदूरगिरि माहात्म्यांत म्हटलें आहे. महानुभावांच्या स्थानपोथींत याचा 'मनशील' नांवानें उल्लेख झाला आहे.

खुद्द रामटेकच्या टेकडीवर भगवान विष्णूच्या अनेक अवतारांची देवालयें आहेत. त्यामध्यें त्रिविक्रमाचें देवालय अत्यंत प्राचीन आहे. त्या देवालयांतील त्रिविक्रमाची मूर्ति वाकाटककालिन उत्कृष्ट शिल्पांत गणली जात होती.

याशिवाय रामटेकच्या गडावर वराह व नरसिंह या अवतारांचीं देवालयें आहेत. क्षुद्रमुनी शम्बुक याचे शिवलिंगहि आहे. पण गडावरील मुख्य देवालयें आहेत तीं म्हणजे राम-सीता व लक्ष्मण यांचीं. त्यांतील मूर्ति काळ्या पाषाणाच्या आहेत. पुराणवस्तू संशोधन शास्त्राचे दृष्टीनें हीं मंदिरें अत्यंत महत्वाचीं आहेत. सामान्यतः राम-सीता व लक्ष्मण यांच्या मूर्ति एकत्र असतात. पण गडावर लक्ष्मणाचे देऊळ राम-सीतेच्या देवळासमोर आहे, हे येथील विशेष होय. लक्ष्मणाच्या देवळांत १३ व्या शतकांतील रामदेवराव यादव याच्या काळचा पण आतां भग्नावस्थेंत असलेला शिलालेख आहे. त्यांत या व गडावरील इतर देवळांचीं तसेच रामटेकच्या पंचक्रोशींतील तीर्थांचीं वर्णनें आहेत. ह्या विभागांत आठ तीर्थें आहेत असंख्य यात्रेकरू ह्या तीर्थांना भेटी देतात. त्यापैकीं चाकुर्डा, मन्सर व नगरधन येथील तलाव पवित्र समजले जातात.

प्राचीन ऐतिहासिक अवशेष : जिल्ह्यांत आढळणाऱ्या सर्वांत पुराण वस्तू म्हणजे कळमेश्वर गांवीं सांपडलेलीं अश्मयुगीन हत्यारें हीं होत. ती नागपूर येथील पुराणवस्तू-संग्रहालयांत ठेवलेलीं आहेत. तसेच बोरगांव, खाप्री, उवजी, डिग्रस, सांवरगांव, जुनापाणी, गोहर, कोहळी, नीलडोह, टाकळघाट, वाढोरा ह्या खेड्यांत अश्मवर्तुळें सांपडतात. हीं अश्मवर्तुळें कांही ठिकाणीं अत्यंत ठळक असतात तर कांही ठिकाणीं हीं वर्तुळें इतकीं लहान आहेत कीं तीं न्याहाळून पहावी लागतात. कांही ठिकाणचीं वर्तुळें निसर्गाच्या

व इतर उपसर्गांमुळें नाहीशी होण्याच्या मार्गाला लागलीं आहेत. ह्या वर्तुळाखालीं राखुंडी, मडक्याचे तुकडे, लोखंडी भांडीं आणि अवजारें सांपडतात. त्यावरून ह्या जागा भटक्या गवळाऊ जमातीच्या वास्तव्याच्या जागा असाव्यांत असे मानलें जातें. सिथीयन टोळ्यांच्या एका शाखेपैकीं हे लोक असावेत असेहि मानले जातें.

जिल्ह्यांतील असंख्य पौराणिक मंदिरांपैकी रामटेकखेरीज अदासा, अंभोरा, भुईगांव, धापेवाडा, जखापूर, कोराडी, काटोल, केळोद, डोंगरतळ, पारसिवनी, सावनेर व उमरेड येथील मंदिरे प्रसिद्ध आहेत. पारसिवनी येथें जैनांची व हिंदूंची प्राचीन देवळें आहेत. केळोद व डोंगरतळ येथील देवळांत शिलालेख आढळतात. नगरधन, भिवापूर, डोंगरतळ, काटोल, पाटणसावंगी व उमरेड येथें जुन्या किल्ल्यांचे अवशेष सांपडतात. नागपूर येथील पुराणवस्तू-संग्रहालयांत ११ व्या शतकांतील सिताबर्डीचा एक संस्कृत शिलालेख पहावयास मिळतो. त्यावरून त्याकाळीं नागपूर मालवाधिपतीकडे होतें असें दिसतें. ह्या सर्व खुणा नागपूर जिल्ह्याच्या प्राचीनतेची साक्ष देतात.

त्या काळचा नागपूर प्रदेश :

सातव्या शतकापासून १० व्या शतकापर्यंत भरभराटींत असलेल्या राष्ट्रकूट राजांच्या कारकीर्दींत नागपूर प्रदेशाचा विस्तार छिंदवाडा व वर्धा जिल्ह्यांपर्यंत होता.

कालचक्र :

काळाचें चक्र फिरत होतें. राष्ट्रकूट राजे गेले. चालुक्य आले. मालवदेशीय व हैहय आदि घराण्यांनीहि ह्यावर राज्य केलें. कालाचे कांही दुवे इतिहासाचे पोटांत गडप झाले आणि सलग इतिहास लावणें दुर्गम झाले.

गोंड राजघराणें :

ह्या जिल्ह्याच्या निश्चित इतिहासाला सुरवात झाली ती म्हणजे १६ व्या शतकांतील गोंड राजघराण्यापासून. गोंड ही ह्या भागांतील महत्वाची जमात. गोंड लढाऊ, राजकारणी, सुधारलेले व शेतीकडे लक्ष्य देणारे होते. त्यांच्या दोन घराण्यांपैकी देवगडच्या एका घराण्याचा नागपूरच्या इतिहासाशीं घनिष्ट संबंध आला. त्या घराण्याचा मूळ पुरुष जातबा. हा अकबरकालीन होता. त्यानें पाटणसावंगी, नगरधन व नागपूर येथील किल्ले बांधले. ह्या घराण्यांतील तिसरा राजा बख्तबुलंद, ह्यानें राजापूर बारसा नांवाच्या १२ वाड्या पेठांनीं जोडून व त्यांच्याभोवतीं तट बांधून इ. स. १७०२ मध्यें नागपूर शहर वसविलें. तर त्याचा मुलगा चांद सुलतान ह्यानें इ. स. १७०६ सालीं नागपूर शहर आपल्या राज्याची राजधानी केली. ह्या दोघांच्या काळांत ह्या भागाची भरभराट झाली; पण पुढें अंतर्गत कलहामुळें गोंड घराण्याचा ऱ्हास झाला.

मराठ्यांचा उदय :

तदनंतर १७४३ मध्यें नागपूर येथें मराठ्यांच्या कारकीर्दीचा श्रीगणेशा रघुजी भोसले ह्यांनी केला. भोसल्यांनीं नागपूर हें आपलें शासकीय केन्द्र केलें. भोसले घराण्यांतील राज्यकर्त्यांच्या कर्तबगारीमुळें मराठ्यांच्या राज्याचा पसारा खूपच वाढला. नर्मदेपासून गोदावरीपर्यंत व बंगालच्या उपसागरापासून अजिंठ्यापर्यंतचा मुलूख नव्यानें मराठी राज्यांच्या प्रभुत्वाखालीं आला. नागपूरकर भोसले मोंगल व निजामाच्या राज्यांत चौथाई व सरदेशमुखी गोळा करीत.

इतिहासाच्या ओघांत अनेक राजघराणीं आलीं व गेलीं. त्यांचा बदल हा जिल्हा आपल्या डोळ्यांनीं पाहत राहिला.

इंग्रजांची कारकीर्द :

इ. स. १८१६ मध्यें भोसले इंग्रजांचें आश्रित झालें. इ. स. १८५४ मध्यें इंग्रजांनीं भोसल्यांचें राज्य आपल्या राज्यास जोडून घेतले व त्याच्या शासनासाठीं आपल्या कमिशनराची नेमणूक केली.

आजचा नागपूर जिल्हा इ. स. १८५४ मध्यें अस्तित्वांत आला. इ. स. १८६१ मध्यें अस्तित्वांत आलेल्या मध्यप्रदेशाची राजधानी नागपूर येथें होती. इ. स. १९०३ मध्यें वऱ्हाड मध्यप्रांतास जोडण्यांत येऊन मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांत तयार करण्यांत आला. त्या प्रांताचें मुख्य ठिकाण नागपूर हेंच राहिलें. व गव्हर्नर येथील कारभार पाहूं लागला.

परकीय सत्तेच्या पाशांत भारतीय जनता फार काळ राहणें शक्य नव्हते. इंग्रजांचे दास्यांतून मुक्त होण्यासाठीं भारतीय जनतेने अहर्निश लढा दिला. त्या लढयाचे आद्य व प्रमुख केन्द्र होण्याचा मान नागपूर जिल्हयाला मिळाला. इ. स. १९२० मध्यें राष्ट्रनेत्यांनीं नागपूर येथूनच भारतीय स्वराज्याची ऐतिहासिक घोषणा केली. थोर राष्ट्रवीरांच्या अविरत प्रयत्नांमुळें १५ ऑगस्ट १९४७ रोजीं भारतास स्वातंत्र्य मिळालें व लोकशाही भारतांतील मध्यप्रदेशाची राजधानी होण्याचा मान नागपूरला मिळाला.

स्वातंत्र्याची प्रभात :

दिनांक १ नोव्हेंबर १९५६ रोजीं राज्यपुनर्रचना होऊन विदर्भासह हा जिल्हा द्विभाषिक मुंबई राज्यांत सामील झाला. मुंबई राज्यांतील महत्त्वाच्या अशा विदर्भ विभागाचे मुख्य विभागीय ठिकाण नागपूर येथेंच होते. मुंबई राज्यांत आल्यावर शेतकी, व्यावसायिक व औद्योगिक आदि बाबतींत सर्वांगीण विकासासाठीं व त्यायोगें लोकांचें जीवनमान वाढविण्याचें दिशेनें नवनिर्माणाचें काम येथें सुरूं करण्यांत आल्याने व उपलब्ध असलेली मुबलक कृषि व खनिज संपत्तीचा विनियोग करण्याची दिशा स्पष्ट झाल्यानें ह्या भागाचे महत्त्व वाढलें. कृषिव्यवसायांत सुधारणा व औद्योगिक प्रगति झपाटयानें होऊं लागल्याने राज्यांतील कृषि-व्यवसायाच्या बाबतींत 'कॅलिफोर्निया' व उद्योगधंद्यांचे बाबतींत 'रुर' हा मान मिळण्यास तो पात्र झाला.

राज्यपुनर्रचना :

सन १९५१ सालीं नागपूर येथेंच ग्रामविकासासाठीं गांववार सेवा सहकारी संस्था निर्मितीचा कार्यक्रम राष्ट्रनेत्यांनी आंखला.

तशांत १ मे १९६० रोजीं पुन्हा राज्यपुनर्रचना होऊन एकभाषी महाराष्ट्र राज्य निर्माण झालें.

एकभाषी राज्याचा हेतु : महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या वेळीं जी मार्गदर्शक तत्त्वें महाराष्ट्र राज्यानें आपल्या समोर ठेवलीं होतीं, त्यांतील एका तत्त्वान्वयें एकभाषी राज्याचा हेतु स्पष्ट करण्यांत आला होता.

राज्याच्या कारभारांत एकभाषी लोकांना भाग घेणें सोईचें व्हावें ही भाषिक राज्याच्या स्थापण्यामागील भूमिका. आपली नेहमीचीं कामें व कारभार आपल्या मातृभाषेंतून लोकांना सुलभपणें पार पाडतां येईल, आपल्या स्वतःच्या भाषेंत त्यांना सरकारसमोर आपल्या मागण्या मांडतां येतील, स्वतःच्या भाषेंत त्यांना आपल्या मुलाबाळांना शिक्षण देतां येईल, आणि आपलें वाङमय, कला व इतर गोष्टी यांच्या माध्यमाद्वारें त्यांना आपला सांस्कृतिक विकास घडवून आणणें सुलभ जाईल.

भाषिक एकसंवता निर्माण करावयाची ती जनतेचें जास्तीत जास्त कल्याण साधण्यासाठीं. या दृष्टीनेंच सर्वत्र भारतांतील व विशेषेकरून या राज्यांतील सरकारीं धोरणें, निव्वळ भावनेपेक्षां सामाजिक व आर्थिक विचारांनींच प्रेरित झालेलीं आहेत.

म्हणूनच महाराष्ट्र राज्याचा कारभार, जात, धर्म, भाषा अथवा प्रदेश याबाबतींत कोणत्याहि प्रकारचा भेदभाव न करतां चालविण्यांत येईल.

अशा ह्या महाराष्ट्रांत विदर्भांतील लोकांच्या भावनांना आदर दाखविण्यांत येतो व त्यांच्या विशेष गरजांची जाणीव ठेवण्यांत येते. यादृष्टीनें, नागपूर करार म्हणून ओळखण्यांत येणाऱ्या करारान्वयें देण्यांत आलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी करण्यांत आली; किंबहुना त्यापेक्षां जास्तच सवलती

देण्यांत येताहेत. एकाच राज्याच्या गरजा लक्षांत घेऊन, विकासाच्या खर्चासाठीं असलेल्या निधींची वांटणी राज्यामध्यें असलेल्या मुंबई, पुणें, औरंगाबाद व विदर्भ ह्या विभागांच्या प्रदेशांतील लोकसंख्येच्या प्रमाणांत करण्यांत येत असली तरी विदर्भ व मराठवाडयाची सध्यांची अविकसित परिस्थिति लक्षांत घेऊन, या विभागांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याकडे विशेष लक्ष देण्यांत येत आहे. तसे करण्यासाठीं खास प्रशासन संस्थाहि आहे. तांत्रिक शिक्षण व धंदेशिक्षण यांसाठी पुरेशा सोईची तरतूद करण्यांत आली व संपूर्ण राज्याच्या गरजा लक्षांत घेऊन राज्यसरकारच्या नियंत्रणाखालील नोकऱ्यांमध्यें भरती करण्याबाबत पुरेशा संधीची तरतूद आहे. नागपूर येथें हायकोर्टाचें एक कायम बेंच विदर्भासाठीं ठेवण्यांत आलें आहे. प्रशासनाची लोकांना चांगली कल्पना यावी या दृष्टीनें परिणामकारक साधन म्हणून शक्य तेवढ्या जास्तीत जास्त प्रमाणांत विकेन्द्रिकरण करण्यांत येत आहे.

नागपूर :

मार्गदर्शक तत्त्वांत असेंहि म्हटलें होतें कीं पूर्वीच्या मध्यप्रदेश राज्याची नागपूर ही राजधानी होती, ही दीर्घकालीन भावना विदर्भांतील लोकांच्या जिव्हाळ्याची असल्यामुळें व विदर्भांतील लोकांना त्यामुळें अनेक फायदे पूर्वी मिळत असल्यामुळें सरकार एका निश्चित कालावधीसाठीं नियमितपणें नागपूरला जाईल व वर्षांतून निदान एकतरी विधिमंडळाचे अधिवेशन दरवर्षी नागपूर येथें भरविण्यांत येईल. तसेच नागपूर शहराचा योग्य विकास घडवून आणण्याकडे विशेष लक्ष्य देण्यांत येईल व नागपूरचे महत्त्व कायम टिकविण्यासाठीं सर्व प्रकारचे प्रयत्न करण्यांत येतील. याशिवाय, विदर्भांतील जलसिंचन, औद्योगिकरण, खनिज पदार्थांचा शोध व खाणकाम आणि ग्रामीण विभागांतील पिण्याच्या पाण्याच्या सोईची तरतूद यांकडे विशेष लक्ष देण्यांत येईल. कृषि व फळबागायत यांच्या संशोधनाची वाढ करण्यांत येईल.

त्यानुसार एकभाषी महाराष्ट्रांत नागपूर जिल्ह्याचे क्षितिज खऱ्या तेजानें उजळलें. जीवन स्त्रवूं लागलें. जनतेचें जीवनमान उंचावण्यासाठीं व न्याय व समतेच्या तत्त्वावर अधिष्ठित असलेला असा महान समाज निर्मिण्यासाठीं महाराष्ट्रांतील कोटी कोटी मनगटें सरसावली. कार्यास सुरवात झाली व त्या कार्यक्रमाचीं सूत्रें हालविण्याचें कामीं महत्त्वाची कामगिरी पार पाडण्याची संधी नागपूरला मिळाली. इ. स. १९६० पासून सरकार एका निश्चित कालावधीसाठी नियमितपणें नागपूरला येऊं लागलें. तसेंच विधिमंडळाचे एक अधिवेशन दरवर्षी नागपूर येथे घेण्यांत येऊं लागले. त्यामुळें नागपूरचे व अनायासे नागपूर जिल्ह्याचें महत्त्व विशष वाढलें.

अशा ह्या ऐतिहासिक नागपूर जिल्ह्याच्या संपन्न अंतरंगाचें दर्शन घडविण्याचें हेतूनें हें पुस्तक लिहिण्यांत येत आहे.

२. नागपूर जिल्हा परिचय

भूगोलाला उभ्या आडव्या छेदणाऱ्या रेखांच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं नागपूर जिल्हा २०.३५° व २१.४४° रेखांशांमध्यें आणि ७८.४५° व ७९.४०° अक्षांशांमध्यें महाराष्ट्राच्या पूर्व सीमेवर वसलेला आहे.

नागपूर जिल्ह्याच्या सीमा : नागपूर जिल्ह्याच्या उत्तरेस मध्यप्रदेशांतील छिंदवाडा व सिवनी, पूर्वेस मध्यप्रदेशांतील बालाघाट व महाराष्ट्रांतील भंडारा, दक्षिणेस चांदा व पश्चिमेस वर्धा हे जिल्हे असून वायव्येस अमरावती जिल्ह्याची सरहद्द ह्या जिल्ह्याच्या सरहद्दीस भिडलेली आहे.

क्षेत्रफळ : नागपूर जिल्ह्याची पूर्व-पश्चिम लांबी ९४ मैल असून दक्षिणोत्तर रुंदी ८२ मैल आहे. भारताचे सर्व्हेअर-जनरल यांनी नमूद केल्यानुसार जिल्ह्याचें क्षेत्रफळ ३,८४२ चौरस मैल आहे.

शासकीय विभाग : महाराष्ट्र राज्यांतील विदर्भ विभागाच्या आठ जिल्ह्यांपैकी नागपूर हा एक जिल्हा असून शासनाचें व्यवस्थेसाठीं त्याचे पांच भाग पाडून खालीलप्रमाणें पांच तहसिली केलेल्या आहेत :—

तहसील	क्षेत्रफळ (चौ. मै.)	शहरें	खेडीं	लोकसंख्या सन १९५१	लोकसंख्या सन १९६१
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
नागपूर	८११	३	३६७	६,४६,०९०	८,२६,४६५
रामटेक	८९७	१	३७६	१,४६,९५८	१,७५,२७५
उमरेड	९६९	१	४२२	१,५८,२७१	१,९२,९२०
काटोल	६१४	३	२९१	१,४८,३१५	१,६७,२७७
सावनेर	५४३	५	२११	१,३४,९२२	१,४९,२५०
एकूण ...	३,८३४*	१३	१,६६७	१२,३४,५५६	१५,११,१८७

*हा आंकडा खेड्यांचे दप्तरांतून घेण्यांत आला असून भारताचे सर्व्हेअर-जनरल ह्यांनीं नमूद केलेल्या क्षेत्रफळापेक्षां ८ मैलांनीं कमी आहे.

स्वाभाविक विभाग : जमिनीच्या उंचसखलपणास अनुसरून नागपूर जिल्ह्याचे—(१) उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश, (२) पश्चिमेकडील उंचवट्याचा प्रदेश व (३) कन्हान आणि वेणा ह्या नद्यांचें खोरें असे तीन स्वाभाविक विभाग पडतात.

उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशांत रामटेक तहसिलीचा उत्तर भाग व सावनेर तहसिलीचा ईशान्य भाग हे येतात. पश्चिमेकडील उंचवट्याच्या प्रदेशांत काटोल तहसील पूर्ण आणि सावनेर व नागपूर ह्या तहसिलींचे पश्चिम भाग येतात ; तर कन्हान व वेणा नद्यांच्या खोऱ्यांत सावनेर व नागपूर ह्या तहसिलींचे पूर्व भाग आणि रामटेक तहसिलीचा दक्षिण भाग व उमरेड तहसील पूर्ण हे भाग येतात.

डोंगर :

सातपुडा पर्वताच्या दक्षिणेस नागपूर पठारावर नागपूर जिल्हा वसलेला आहे. जिल्ह्याचा बहुअंशीं भाग सपाटीचा असला तरी त्याच्या पृष्ठभागावर मधूनमधून लहानमोठ्या टेकड्यांच्या रांगा पसरल्याचे आढळून येते. जिल्ह्याच्या उत्तर भागांत पश्चिमांगीं अरुंद परंतु पुढें पूर्वांगीं १२ मैलांपर्यंत रुंद झालेल्या सातपुड्याच्या एका शाखेचा अंतर्भाव झालेला दिसून येतो. ह्या सातपुड्याच्या शाखेच्या दक्षिणेस जवळच अंबागड नांवाच्या डोंगराचे पश्चिम टोक आलेले दिसते आणि ह्या टोकावरच वसलेलीं आहेत रामटेकची प्रसिद्ध देवळें. पश्चिम सीमेलगत एक डोंगराची रांग आहे. वेणा नदीच्या खोऱ्यामुळें ती विभागीत झालेली दिसते. ही रांग उमरेड तहसिलीच्या आग्नेय सीमेपर्यंत जातांना दिसते. काटोल तहसिलींतील दक्षिणोत्तर जाणाऱ्या डोंगरांना पिल्कापारचें डोंगर म्हणून ओळखलें जातें. तशा तर जिल्ह्यांत अनेक टेकड्या इतस्तत: विखुरलेल्या दिसतात. परंतु त्यांतील नागपूर येथील सीताबर्डीची टेकडी विशेष महत्त्वाची असून ह्या टेकडीशीं नागपूर जिल्ह्याचा इतिहास निगडीत झालेला आहे.

जिल्ह्यांतील डोंगर अथवा टेकड्या तशा फारशा उंच नाहींत. सर्वात उंच अशा शिखराची उंची २,००० फुटांपेक्षां जास्त नाहीं. परंतु ह्या डोंगरांमधील व टेकड्यांवरील वनश्री व पशुपक्षी व प्राण्यांमुळें ह्या जिल्ह्याचें स्वरूप मोठे आकर्षक बनलें आहे. पिल्कापार डोंगरांपासून पूर्व सीमेपर्यंत असणाऱ्या मैदानावर सर्वत्र शेती केल्याचे व आंबराई लावल्याचे आढळून येते. त्याव्यतिरिक्त खाण्याचीं पानें, संत्रीं, केळीं आदि फळांनीहि हा भाग संपन्न असल्याचे दिसून येते. ह्या डोंगराच्या पूर्वेस तुरळक शेती असून व सर्वत्र छोटेमोठे तलाव निसर्ग रम्यतेंत भर घालतात. ह्या मैदानाची समुद्रसपाटीपासून उंची ९०० ते १,००० फूट आहे.

नद्या :

जिल्ह्यांतील पाण्याचा होणारा निचरा पूर्व सीमेवरून वाहणाऱ्या वैनगंगा व पश्चिम सीमेवरून वाहणाऱ्या वर्धा नदींत वाटला गेलेला आहे. ह्यापैकीं पश्चिम भागांत मोडणाऱ्या जिल्ह्याच्या एक-तृतीयांश भागांतील पाण्याचा निचरा वर्धा नदीच्या जांब, वेणा आणि इतर उप-नद्यांनीं केला जातो. सातपुड्याच्या टेकड्यांतून वाहणारी कन्हान व तिच्या उप-नद्या पेंच व सांड ह्या नद्या मध्यभागास फायदा देतात. कामठीजवळ कन्हान व पेंच नदीचा संगम होतो. तेथेंच त्यांना कोलार नदी येऊन मिळते व कन्हान नदीचा प्रमुख प्रवाह सुरू होतो. तिला पुढें नाग व सांड नद्या येऊन मिळतात. कन्हान नदी जिल्ह्यांतील उमरेड तालुक्याच्या उत्तर सीमेवरून वाहत जाऊन भंडारा जिल्ह्याच्या सरहद्दीवर वैनगंगा नदीस मिळते. आंब, सूर, आणि नंद हे प्रवाह सरळ वैनगंगेला मिळतात.

कन्हान

ही नदी छिंदवाडा जिल्ह्यांत मोहतूरच्या पहाडांत उगम पावून नागपूर जिल्ह्यांतून वाहत जाऊन नागपूर व भंडारा ह्या जिल्ह्याच्या सरहद्दीवर अंभोरा गांवाजवळ वैनगंगेस मिळते. पेंच, सांड, कोलार व नाग ह्या तिच्या उप-नद्या आहेत. कन्हान नदीपासून नागपूरास पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो.

कोलार

कन्हानची उप-नदी कोलार ही छिंदवाडा जिल्ह्यांत वडाच्या चिंचोलीजवळील टेकडींत उगम पावून सावनेर तहसिलींतून पूर्वेकडे वाहत जाऊन नागपूर तहसिलींत बिन्याजवळ कन्हान नदीस मिळते.

चंद्रभागा

कोलार नदीला सावनेर तहसिलींतील पाटणसावंगीजवळ मिळणारी ही नदी काटोल तहसिलींत मेटपांजऱ्याजवळील टेकडींत उगम पावते.

पेंच

ही नदी छिंदवाडा जिल्ह्यांत महादेवाच्या पहाडांत उगम पावून आग्नेयेकडे वाहत जाऊन नागपूर व भंडारा ह्या जिल्ह्यांच्या सरहद्दीजवळ कन्हान नदीला मिळते.

नाग — ही नदी अंबाझरीच्या तलावांतून उत्पन्न होऊन नागपूर शहरांतून पूर्वेकडे वाहत जाऊन कन्हानला मिळते.

वेणा — ही नदी काटोल तहसिलींत महादागडच्या डोंगरांत उगम पावून दक्षिणेकडे वाहत जाऊन वर्धा जिल्ह्यांत वर्धा नदीस मिळते.

जांब — ही काटोल तहसिलींत गरमसूरच्या टेकडींत उगम पावून पश्चिमेकडे वहात जाऊन जलालखेडयाजवळ वर्धा नदीस मिळते. हिला लांडगी व मदार ह्या नद्या मिळतात.

सूर — ही नदी रामटेकच्या पहाडांत उत्पन्न होऊन तिला पुढें टेकडीच्या पायथ्याशी अडवून रामसागर तलाव बनविला आहे. त्यांतील पाण्यामुळें भात शेतीस सिंचाई होते. यापुढें हिचा प्रवाह लहान बनून ती भंडाऱ्याजवळ वैनगंगेस मिळाली आहे.

महत्वाच्या अशा नद्यांची ह्या जिल्ह्यांतील लांबी येणे प्रमाणें आहे--कन्हान ६५ मैल, कोलार ४५ मैल, पेंच ३७ मैल व वेणा ८८ मैल.

बहुतेक सव नद्या सपाट भागांतून वाहतात. त्यांच्या थडया खोल आहेत. त्यांना पावसाळयांत पूर येतात. तर उन्हाळयांत त्यांच्यांतील खडकांच्या खांचखळग्यांत काय ते पाणी आढळते. उपनद्या जरी उथळ असल्या तरी आपल्या आजूबाजूच्या भागांतील वनस्पतींच्या निर्मितीस मदत करतात. हे प्रवाह सपाट मैदानावर अथवा खोल दऱ्यांत आढळून येतात. उंचसखल भागांत त्यांच्या खोलगटपणामुळें उन्हाळयांत त्यांचा शेतीला कांही उपयोग होत नाहीं. पावसाळयांत हे प्रवाह जोराने वाहून मैदानी जमिनीची धूप वाहून नेतात.

तलाव :

जिल्ह्यांत खालील ठिकाणीं महत्वाचे तलाव आहेत :—

काटोल तहसील :—काटोल.

सावनेर तहसील :—अदासा, केळवद.

उमरेड तहसील :—उमरेड, कुही, भिवापूर, मांढळ व वेलतूर.

रामटेक तहसील :—रामसागर, अंबाळा, मनसळ, कांद्री, चाकुर्डी.

नागपूर तहसील : अंबाझरी, गोरेवाडा, तेलंगखेडी आणि शुक्रवार हे नागपूरांतील, तसेच पारडी, सोनेगांव, सक्करदरा, बाजारगांव येथें तलाव आहेत.

उपरीनिर्दिष्ट तलावाखेरीज जिल्ह्यांत बरेच छोटे मोठे तलाव आहेत.

ह्या तलावांचा विविध तऱ्हेनें उपयोग केला जातो. रामसागरचे पाणी भातशेतीच्या सिंचाईसाठीं वापरतात. अंबाझरी व गोरेवाडा ह्या तलावाचे पाणी नळाने नागपूर शहरास पिण्यासाठीं पुरविले जाते. शुक्रवारी तलावाचे पाणी उद्योगासाठी व धुण्यासाठी वापरतात. मनसळ, कुही, उमरेड व मांढळ येथील तलावांत शिंगाडे होतात ; तर इतर ठिकाणचे पाणी गुराढोरांच्या व इतर उपयोगासाठी वापरतात. कांही ठिकाणीं तलावाच्या गाळापासून विटा व कौले करतात.

पाऊस पाणी :

अरबी समुद्रावरून वाहणाऱ्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांपासून ह्या जिल्ह्यास पाऊस मिळतो. सरासरी पर्जन्यमान ४० इंच असून ते ३० इंच ते ४५ इंचामध्यें सरकतांना दिसते. गेल्या पांच-सहा वर्षांत पावसाचे प्रमाण ४८ इंचापर्यंत वाढल्याचे आढळून येते. पावसाचे प्रमाण पश्चिमेस कमी आढळून येते तर जसजसे पूर्वेस जावे तसतसे ते वाढतांना आढळून येते. रामटेक व उमरेड तहसिलींत जास्तीत जास्त पाऊस पडतो.

आणि तो म्हणजे ४० इंच ते ४५ इंच. इतर भागांत ३० ते ४० इंच पाऊस पडतो. जून महिन्याच्या सुरवातीस येथें पावसाळ्यास सुरवात होते. जुलै महिन्यांत जोराचा पाऊस पडतो. तो ऑक्टोबर महिन्यापर्यंत असतो. पण इतरही महिन्यांत पावसाच्या सरी येतात. जानेवारी-फेब्रुवारी महिन्यांत पडणाऱ्या पावसांच्या सरींबरोबर गारांचाहि वर्षाव होतो; तर उन्हाळ्यांतील छोट्या छोट्या सरींबरोबर धुळीची वादळेही उठतात.

हवामान :

नागपूर भारतांतील उष्णतम ठिकाणांपैकी एक ठिकाण आहे. एप्रिल व मे महिन्यांत येथें फार उष्णता असते. परंतु सर्वसामान्यत: हवा कोरडी व आरोग्यदायक असते. मोसमी काळसुद्धां तसा वाईट नसतो. पावसाळ्यांत उष्णतामान ८० डिग्री फॅरेनहिट असते. हिवाळा फार थोडका असला तरी नोव्हेंबर ते फेब्रुवारी महिन्यांतील हवामान फार चांगले असते. विशेषत: हिवाळ्याचा उत्तरार्ध मोठा आरोग्यदायक असतो तर पावसाळ्याचा उत्तरार्ध रोगट असतो. उन्हाळ्यांत व हिवाळ्यांत आकाश निरभ्र असते, तर ढगाळ दिवसांत उष्णतामान वाढून हवा कोंदट बनते. वार्षिक कमाल उष्णतामान ११७ डिग्री फॅरेनहिट असून किमान उष्णतामान ४१ डिग्री फॅरेनहिट असते.

पाऊसपाण्याचा व हवामानाचा पिकांवर निश्चित असा परिणाम होतो. सप्टेंबर ते नोव्हेंबर ही तिमाही मोठी आणिबाणीची असते. ह्या काळांतील हवामानाचा खरीफ पीकांवर इष्टानिष्ट परिणाम संभवतो. रबी हंगाम त्यास अपवाद होऊं शकत नाहीं. सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत पाऊस व उघडिप ह्यांचा पिकांना उपयोग होतो. हिवाळ्यांतील तुरळक पावसाचा रबीच्या पिकास उपयोग होतो.

जमीन :

नागपूरच्या अवतीभवती भारतांतील प्रसिद्ध असे भूस्तर आढळून येतात. नागपूर जिल्ह्यांतील भस्तरांचे दोन भाग पडतात. नागपूरच्या पश्चिमेस दक्षिण पठाराचे भूस्तर आढळतात, तर पूर्वेस मूलभूत व स्फटिकजन्य भूस्तर आढळतात. भूस्तर शास्त्राच्या दृष्टीने येथील भूस्तरांचे खालील प्रकार आढळतात :—

(१) आधुनिक
(२) दक्षिणपठार व अंतरपठार
(३) लमेटा
(४) गोंडवना

जमिनीच्या प्रकाराचा पीकांवर विशिष्ट परिणाम होतो. त्यानुसार पाहिले असता जिल्ह्यांतील जमिनीचे सामान्यत: खालीलप्रमाणें प्रकार आढळतात :—

जमिनीचे प्रकार :

जिल्हा दक्षिण पठाराच्या पूर्व सीमेवर वसलेला असल्यानें येथें कापसाची काळी अथवा जवळच्या भागांतील जमिनीच्या मिश्रणाने तयार झालेली जमीन आढळून येते. तिचे प्रकार म्हणजे काळी १ व काळी २. काळ्या जमिनीबरोबर दुसरा प्रकार म्हणजे मोरंड होय. तिचे प्रकार म्हणजे मोरंड १ व मोरंड २ होय. खेरीज खर्डी १ व खर्डी २ आणि बर्डी, रेटरी व तांबेरी असे जमिनीचे प्रकार आढळतात.

काळी ही अत्यंत कसदार जमीन असून तीमध्यें ओलावा राखून ठेवण्याची शक्ति पुष्कळच असल्यानें अवर्षणाच्या काळांत अगर जिल्ह्यांतील काटोल सारख्या कोरड्या भागांत खरीफ पीकांस ती उपयोगी पडते. इतर वेळेस ह्या जमिनीचा खरीफ पीकास उपयोग होत नाहीं. ह्या प्रकारची जमीन २ टक्के आहे. ही जमीन मुख्यत्वे काटोल-उमरेडच्या पठारावर, उमरेडच्या दक्षिणेस आणि नागपूरच्या वर्धा विभागांत आढळते. मोरंड प्रकार सर्वत्र आढळतो. लागवडीखाली असलेल्या जमिनीच्या ६६ टक्के जमीन ह्या प्रकारांत मोडते. ही थोडी खोल, हलकी परंतु लागवडीस सोपी असते. ह्या जमिनींत चुनखडीचे दगड सांपडतात. ही जमीन कापूस व ज्वारीच्या पीकांना चांगली असते. कट्टे वगैरे घातल्यास व पाणीपुरवठ्याच्या सोई असल्यास ह्या जमिनींतून उत्तम तांदूळ मिळू शकतो. ह्या जमिनींतून दुसरे पीकहि काढतां येते. लागवडीखाली असलेल्या जमिनींतील २७ टक्के जमीन खर्डी आणि बर्डी प्रकारांत मोडते. ही जमीन उथळ व खडकाळ असून डोंगराळ भागांत आढळते. काटोल तहसिलींत बर्डी प्रकार आढळतो. रेटरी ही बिगर तांदूळ विभागांत असून तिमध्यें वाळूचे प्रमाण जास्त असते. तांबरी जातीची

जमीन ५ टक्के असून ती नांवाप्रमाणें तांब्याच्या रंगाची असते. ती प्रामुख्याने उमरेड तालुक्यांत आढळते. ह्या जमिनींत ओलावा धारण करण्याची शक्ति असते. जमिनीचे हे प्रकार विचारांत घेतां दर्जावार जिल्ह्यांतील चांगल्या जमिनिची तालुकावार वाटणी खालीलप्रमाणें आहे :—

उमरेड ७९ टक्के, रामटेक ६७ टक्के,

नागपूर ६२ टक्के, सावनेर ५१ टक्के, व

काटोल ४६ टक्के.

पिकें :

जिल्ह्यांत एकूण पिकाऊ क्षेत्र १३,२०,२८१ एकर असून पेरलेले एकूण क्षेत्र १३,०२,८८८ एकर आहे. पीकवार क्षेत्र पुढीलप्रमाणें आहे :—

कापूस १,९६,२४८ एकर,

ज्वारी (खरीफ) ४,५८,१४९ एकर.

भुईमूग १०,४६० एकर.

मिरची ३४,३१४ एकर.

गहूं १,८९,०६१ एकर.

हरबरा २५,५६८ एकर.

तूर १,१७,४९० एकर.

ज्वारी (रबी) ९०,००० एकर.

फळबागांमध्यें काटोल व सावनेर ह्या तहसिलींतील संत्री व आंबे, रामटेक तहसिलींतील केळी व पानें आणि कन्हान खोऱ्यांतील बोरे व सिताफळें प्रसिद्ध आहेत. बागायतीसाठी कॅलिफोर्नियाप्रमाणें हा जिल्हा प्रसिद्ध आहे.

जंगल संपत्ति :

जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेंत जंगलांना फार महत्वाचे स्थान आहे. १९५८-५९ च्या वनविभागीय अहवालानुसार जिल्ह्यांतील ५.६५ लाख एकर म्हणजेच एकूण जमीनीच्या १/५ जमीन जंगलाखाली आहे. त्यांतील ५० टक्के भाग एकटया रामटेक तहसिलींत आहे.

ह्या जंगलांतील ३.२८ लाख एकर जंगलें राखीव व उरलेले २.३७ लाख एकर संरक्षित जंगलें आहेत. ह्या जंगलांमुळें पर्जन्यमानावर इष्ट परिणाम होतो. त्यांतून इमारती लाकूड, इंधन व इतर उत्पन्न मिळते.

खनिज पदार्थ :

खनिज संपत्तीच्या बाबतींत नागपूर जिल्हा समृद्ध असून उद्याचे 'रुर' होण्यासाठी आवश्यक इतकी निसर्गशक्ति त्याचे अंगी आहे. मुख्य खनिज मँगनीज डॉलर मिळवून देणारे असून ते रामटेक व सावनेर तहसिलीमध्यें प्रामुख्यानें सांपडते. महाराष्ट्र राज्यांतील $\frac{1}{3}$ मँगनीज ह्या जिल्ह्यांतून मिळते. तसेच रामटेक तहसिलीमध्यें कन्हान, पिंप्री ह्या गांवाजवळ एक कोळशाची खाण चालविली जाते. सावनेर तहसिलींत कोदेगव्हान येथें लोखंड मिळते. नागपूर तहसिलींत अभ्रक विपूल सांपडते. पांढरे दगड सावनेर व काटोल तहसिलींत सांपडतात; तर बरण्याची माती काटोल तहसिलींत मिळते. उमरेड तहसिलींत अँटिमनी, तांबे आणि सोनें मिळण्याची शक्यता आहे. जिल्ह्यांत इमारती दगडांचेहि उत्पन्न मोठ्या प्रमाणांत काढण्यांत येते. ह्या खनिज संपत्तीमुळें जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला अमर्याद वाव आहे.

३. लोकजीवन

"महाराष्ट्राचे सामाजिक मन एकजिनसी झाले पाहिजे. हा ब्राह्मण-ब्राह्मणेतर, मराठा-मराठेतर, अमका-अमकेतर असा विचार करण्यापेक्षां सगळ्या लोकांची एकजिनसी कार्यकर्त्यांची सेना आम्हाला उभी करावयाची आहे. विशिष्ठ समाजाच्या अथवा गटाच्या संकुचित दृष्टिकोनातून विचार करणाऱ्या क्षुद्र बुद्धीच्या लोकांना महाराष्ट्रांत थारा मिळणार नाहीं. मराठी राज्य याचा अर्थ मराठा राज्य किंवा एका जातीचे, निदान मराठ्यांचे किंवा एखाद्या जातीचे राज्य असा कदापि होणार नाहीं. जेथें जेथें गुणवत्ता आढळेल तेथें तेथें गुणांची पूजा अत्यंत जरूर आहे."—महाराष्ट्र राज्याची मार्गदर्शक तत्वे.

नागपूर जिल्ह्यांतील लोकांचें विविध स्वरूप :

नागपूर जिल्हा भारताच्या मध्यभागीं आहे. भारताच्या सर्व भागाशी दळणवळणाच्या विविध मार्गांनीं नागपूर जोडले गेले आहे. एके काळीं मध्यप्रदेशाची राजधानी नागपूर येथे होती. तर सध्यां महाराष्ट्र सरकारचे वास्तव्य वर्षांतून बराच काळ नागपूर येथें असते. औद्योगिक, व्यावसायिक, व्यापार व शिक्षणांच्या सोईमुळें देशांतील व परदेशांतील विविध भागांतून लोक येथें येत असतात. त्यांतले पुष्कळ लोक येथें स्थायिकहि होत असतात. त्यामुळें वेगवेगळ्या भाषा बोलणारे, विविध धर्मांचे व रीतिभाती पाळणारे बहुरंगी लोक ह्या जिल्ह्यांत आढळून येतात. त्यांत जिल्ह्यांत कांही ठिकाणीं आढळणारे आदिवासी आपल्या विशेष संस्कृतीनें व बोलीभाषेनें त्या बहुरंगीत्वांत भर घालतात.

असे असले तरी बहुसंख्य लोक महाराष्ट्रीय असून मराठी बोलणारे आहेत.

लोकसंख्या :

१९५१ च्या शिरगणतीनुसार जिल्ह्याची लोकसंख्या १२,३४,५५६ इतकी होती. ती गेल्या १० वर्षांत वाढत गेली असून नुकत्याच झालेल्या १९६१ च्या शिरगणतीनुसार १५,११,१८७ इतकी झालेली आहे—

	सन १९५१	सन १९६१
पुरुष	६,३१,१९९	७,८३,७३६
स्त्रियां	६,०३,३५७	७,२७,४५१
एकूण ...	१२,३४,५५६	१५,११,१८७

ही लोकसंख्या जिल्ह्याच्या ५ तहसिलींतील १३ शहरें व १,६६७ खेड्यांत वसलेली आहे. नागपूर हे नागपूर जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण आहे. त्याची लोकसंख्या खालीलप्रमाणे आहे :—

	सन १९५१	सन १९६१
पुरुष	...	३,४१,३६९
स्त्रियां	...	३,०१,८१७
एकूण ...	४,९०,६९४	६,४३,१८६

एकूण लोकसंख्येशी मागासलेल्या जाती-जमातीचे प्रमाण :—

	सन १९५१	सन १९६१
नागपूर जिल्हा.	१८·१०	...

त्यांची लोकसंख्या १९५१ च्या शिरगणतीनुसार २,२३,५४६ होती.

लोकसंख्येचे दर चौरस मैलास प्रमाण :---

	सन १९५१	सन १९६१
नागरी भाग	१२,८००	...
ग्रामीण भाग	१७३	...
एकूण सरासरी	३२१	३९३
महाराष्ट्र राज्य	२७०	...

नागरी व ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण :

सन १९५१ च्या शिरगणतीनसार ५,००० वरील वस्तीचा नागरी भाग म्हणून उल्लेख करण्यांत येत असे. त्यानुसार १३ शहरांत राहणारे व उरलेल्या १,६६७ खेड्यांच्या ग्रामीण भागांत राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे (सर्व साधारण खेड्यांत ४०० लोक राहतात) :—

	सन १९५१ (प्रतिशत)	सन १९६१ (प्रतिशत)
नागरी	४७	...
ग्रामीण	५३	...
एकूण ...	१००	१००

महाराष्ट्रांत १९५१ साली नागरी लोकसंख्येचे प्रमाण २८.८२ प्रतिशत होते. नागपूर जिल्ह्यांत १९५१ च्या व १९६१ च्या शिरगणतीनुसार नागरी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या निम्म्याइतकी आहे.

नागपूरच्या लोकसंख्येचे एकूण नागरी लोकसंख्येशी प्रमाण खालीलप्रमाणे आहे :—

सन १९५१ (प्रतिशत)	सन १९६१ (प्रतिशत)
७७	...

बिगर शेतकी व्यवसायावर अवलंबून असलेल्या लोकांचे प्रमाण शेतकीवर अवलंबून असलेल्या लोकांपेक्षां जास्त आहे. शेतकी व बिगर शेतकी व्यवसायावर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण—

	सन १९५१ (प्रतिशत)	सन १९६१ (प्रतिशत)
शेतकी	४२.९	...
बिगर शेतकी	५७.१	...
एकूण ...	१००.००	१००.००

लोकसंख्येचे नागरी स्वरूप

नागरी भागांत राहणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणांच्या व बिगर शेतकी व्यवसायापासून उपजीविका प्राप्त करणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणांच्या अभ्यासावरून येथील लोकसंख्येचे नागरी स्वरूप सिद्ध होते.

कुटुंबांतील व्यक्तींची संख्या—

	सन १९५१	सन १९६१
ग्रामीण	४.०५	...
नागरी	५.००	...
एकूण सरासरी	४.०७	...

दर हजार पुरुषांशी स्त्रियांचें प्रमाण—

खाली तालुकावार माहिती देण्यांत आली आहे :—

	सन १९५१	सन १९६१
नागपूर	९४६	...
रामटेक	९७८	...
काटोल	९१४	...
उमरेड	८८७	...
सावनेर	९७६	...
नागपूर जिल्हा	९५६	९२८
महाराष्ट्र	९४१	...

दर दहा वर्षांनी होणाऱ्या गेल्या ५ शिरगणत्यांचा अभ्यास केला असतां स्त्रियांचे दर हजार पुरुषांशी प्रमाण घटत असल्याचे दिसून येते.

ग्रामीण भागांत स्त्रियांचे दर हजार पुरुषांशी प्रमाण नागरी भागांतील संबंधित प्रमाणापेक्षां जास्त आहे.

स्त्रियांचे दर हजार पुरुषांशी प्रमाण :—

	सन १९५१	सन १९६१
ग्रामीण	९६८	...
नागरी	९४२	...

दर हजारी जन्म-मृत्यु प्रमाण :—

	सन १९५१	सन १९६१
जन्म	२४.००	...
मृत्यु	१६.५६	...

लोकांची साक्षरता :

लिहितां वाचतां येणें ही शिक्षणाची कसोटी धरून लोकसंख्येचा अभ्यास केला असतां खालील निष्कर्ष निघतात :—

	सन १९५१	सन १९६१
नागपूर जिल्हा		
पुरुष	२,१८,२४१	३,७५,४०४
स्त्रियां	७८,२१२	१,५४,१३६
एकूण	२,९६,४५३	५,२९,५४०

(पुढें चालूं)

(साक्षरता) पुढें चालूं

नागपूर शहर

	सन १९५१	सन १९६१
पुरुष	...	२,१२,१२६
स्त्रियां	...	१,०९,०८०
एकूण	...	३,२१,२०६

नागरी व ग्रामीण स्त्री-पुरुष साक्षरतेचें प्रमाण

स्त्रियां

	सन १९५१	सन १९६१
नागरी	२७.८	...
ग्रामीण	२.३	...

पुरुष

	सन १९५१	सन १९६१
नागरी	५०.७	...
ग्रामीण	१८.८	...

साक्षरतेची टक्केवारी

	सन १९५१ (प्रतिशत)	सन १९६१ (प्रतिशत)
पुरुष	३४.००	४७.९०
स्त्रियां	१३.००	२१.१९
एकूण	२३.५०	३५.०४

नागरी-ग्रामीण व व्यवसायानुसार साक्षरता

नागरी	३५·००	...
ग्रामीण	१२·००	...
शेतकी	१४·००	...
बिगर शेतकी	३३·००	...

१९५१ सालीं नागपूर जिल्हयांतील एकूण लोकसंख्येशी साक्षरांची टक्केवारी २३.५० होती. तीच १९६१ साली ३५.०४ इतकी आहे. ह्याचा अर्थ गेल्या १० वर्षांत ती ११.५४ टक्क्यांनीं वाढली आहे. एकूण महाराष्ट्र राज्याचा विचार केला असतां बृहन्मुंबई सोडल्यास राज्याच्या सर्व जिल्ह्यांत साक्षरतेच्या बाबतींत नागपूर जिल्हा आघाडीवर असल्याचे १९६१ च्या शिरगणतीवरून आढळून येते.

(टीप :—रिकाम्या स्थानांचे आंकडे अनुपलब्ध आहेत.)

लोकसंख्येची वर्गवारी :

लोकसंख्येच्या वर्गवारीवरून असे दिसून येते की, नागपूर जिल्ह्यांत निरनिराळ्या धर्मांचे व पंथांचे लोक राहतात. त्यामध्यें हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पार्शी, जैन, बौद्ध, शिख आणि लिंगायत या धर्म-पंथांच्या लोकांचा समावेश होतो. संख्येच्या दृष्टीनें हिंदु लोक जास्त असून ते जिल्ह्यांत सर्वत्र आढळून येतात.

ह्या जिल्ह्यांतील अफाट हिंदु समाज अनेक जाति-पोटजातींनीं बनलेला असून या जाति परंपरागत भेद-भावावर आधारलेल्या अशा आहेत. आधुनिक कल्पनांच्या प्रभावामुळें व औद्योगिकरणाची गति वढल्यामुळे जातिजातींमधील हे भेदभाव हळहळू नाहीसे होऊं लागले आहेत. समाज सुधारकांच्या अविरत प्रयत्नांमुळे आणि अलीकडील कांहीं वर्षांत सरकारकडून करण्यांत आलेल्या उपाययोजनामुळें या प्रक्रियेस आणखी गति मिळाली.

हिंदु समाजांत मराठे बहुसंख्य असून ते बव्हंशी शेतकरी आहेत. ते कष्टाळू, कल्पक व काळजीपूर्वक शेती करणारे असून जुन्या परंपरागत कृषिपद्धतीऐवजी ते हळूहळू शेतकीच्या आधुनिक तंत्राचा अवलंब करीत आहेत. व्यक्ति म्हणून ते सदैव आनंदी स्वभावाचे व निर्मळ असे आहेत व त्यामुळें त्यांची परकीय लोकांवर छाप पडते. त्यांना प्रदीर्घ अशी लष्करी परंपरा असून त्यांनी भारताच्या संरक्षण-दलांत योग्य तो वांटा उचललेला आहे. एवढेच नव्हे तर, राज्याच्या पोलिस-दलांतहि मुख्यत्वेकरून त्यांचा भरणा अधिक आहे. त्यांच्यांत असलेला चिवटपणा, काटकवृत्ति व कल्पकता इत्यादि गुणांना वरील दलांत योग्य तो वाव मिळालेला आहे.

वरिष्ठ वर्णांच्या वर्चस्वाखाली अनेक शतकें राहिलेल्या अनुसूचित जाती अथवा हरिजन हे आतां जागृत झाले असून त्यांना आपल्या हक्कांची जाणीव झाली आहे. जीवनांतील सुधारणेच्या संपर्काने व या वर्गाच्या उन्नतीसाठीं म. गांधी व डॉ. भीमराव आंबेडकर ह्यांसारख्या महान् नेत्यांनीं केलेल्या चळवळींमुळे ही जागृति घडून आली आहे. ग्रामीण जीवनांतील बलुत्यांची जुनी पद्धति नष्ट झाल्यामुळें हरिजनांनीं मोठमोठी गांवे व शहरें यांकडे धांव घेतली व तेथें ते उद्योगधंद्यांतून कामगार म्हणून स्थायिक झाले. ह्यांतील 'महार' जमातीचे लोक महाराष्ट्राचे मूळचे रहिवाशी असून ते इतिहासकाळापासून आपल्या लढवय्ये-पणाबद्दल विशेष प्रसिद्ध आहेत आणि भारताच्या संरक्षण-दलांतहि त्यांच्या संख्येचे प्रमाण बरेच आहे. 'चांभार' ही हरिजनांपैकी आणखी एक महत्वाची जात असून त्यांच्यापैकी बऱ्याच लोकांनी आपल्या वंश-परंपरागत कातडी कमाविण्याच्या व चामडयाच्या वस्तू तयार करण्याच्या व्यवसायाला आधुनिक पद्धतींना अनुरूप असे वळण दिले आहे, आणि शहरांतून ते चांगल्याप्रकारें धंदा चालवित आहेत. कुंभार, मातंग, बुरुड इत्यादि जाति आजहि आपल्या परंपरागत पद्धतीनें आपली उपजीविका चालवित असल्याचे दिसते. अगदी अलीकडच्या काळांत सहकार्याचे लोण त्यांच्यापर्यंत पोहोंचले असून या मागासलेल्या जातींतील कारागिरांनीं आपल्या सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत व त्यांचे कार्य समाधानकारकरित्यां चाललेले आहे.

आपापली वेगवेगळी वैशिष्ठ्यें असलेले ब्राम्हण, कायस्थ व सुशिक्षित मराठे व कांहीं ठिकाणीं दक्षिणी लोकांनीं, पुढारलेला व पांढरपेशा वर्ग बनलेला आहे. शिक्षण, वैद्यक, कायदा, स्थापत्य, सर्वसामान्य शासन इत्यादि व्यवसायांत त्यांचे प्रमाण बरेंच आहे.

जाति-उपजातींनीं बनलेल्या ह्या समाजाचे जुनें चित्र द्रुतगतीनें बदलत चाललें आहे. शिक्षणाच्या व वाहतुकीच्या सतत वाढत्या सोयींमुळें सर्वांना समान संधी मिळण्याची प्रक्रिया फार जोरांत सुरूं झाली असून तिनें बरीच मजल मारली आहे. हिंदु समाजाचे ऐक्य हें आतां दूरचे ध्येय राहिलेले नाहीं.

इतर जमाती :

जिल्ह्यांतील लहान मोठ्या गांवामध्यें मुस्लिम जमात पसरलेली असून, बहुतांश खेडयामध्यें मुसलमान लोकवस्ती बहुधा आढळून येतेच. व्यापारी केन्द्र असलेल्या मोठमोठ्या गांवांमध्यें ते व्यापारधंदा, विशेषतः चाकूसुऱ्या व इतर लोखंडी सामानाचा व्यवसाय करतात आणि ग्रामीण भागांत घरगुती उपयोगाच्या

लहानसहान वस्तू बनविण्याचा उद्योग करीत असतात. जिल्ह्यांतील कांहीं भागांत मोमीन जमातीचे लोक चांगले विणकर आहेत. तर कांहीं मुसलमान शेतीहि करतात. हिंदु आणि मुसलमान हे दोन्हीं समाज शतकानशतके गुण्यागोविंदाने व शांततेनें येथें नांदत आले आहेत ही गोष्ट दोन्ही समाजांच्या दृष्टीनें भूषणावह आहे.

पारशी समाज हा अतिशय धाडसी आहे. त्यांची वस्ती बहुतकरून नागपूरांतच आहे. ते वरच्या मध्यम वर्गांत मोडत असून शहरी व्यवसाय करतात. या लहानशा जमातीनें देशाला अनेक नामवंत वकील, डॉक्टर, इंजिनियर पुरविले आहेत. पारशी जमातीप्रमाणेंच ख्रिश्चन हेंही बव्हंशी शहरांतच वस्ती करून आहेत व ते विशेषत: कुशल व तांत्रिक स्वरूपाच्या धंद्यांत काम करतांना आढळतात.

येथील वाणिज्य व्यवसाय फार मोठ्या प्रमाणावर गुजराती व मारवाडी करतात, ही एक उल्लेखनीय गोष्ट आहे. दूरदुरच्या खेड्यांत सुद्धां कापडाचा व्यापारी हा बहुतेक गुजराती असतो. तर वाण्याचा धंदा हा बहुधा मारवाडी करीत असतो ; आणि ते आपले हे व्यवसाय स्थानिक लोकांचा कोणत्याही प्रकारचा रोष ओढवून न घेता वर्षानुवर्षे करीत आहेत.

नागपूर जिल्ह्यांतील रामटेक तहसिलीसारख्या कांहीं भागांत गोंड नांवाचे आदिवासी राहतात. शेजारच्या सुसंस्कृत जगामध्यें मोठमोठे बदल झालेले असले तरी हे गिरिजन अजूनहि पूर्वीप्रमाणेंच पुरातन काळांतील जीवन जगतात. त्यांच्या देवता, त्यांचे सण आणि करमणुकीच्या त्यांच्या पद्धति——विशेषत: त्यांचा लोकनृत्ये आणि लोक संगीत ——हे सुधारलेल्या लोकांना भुरळ पाडणारे असेच आहे. परंतु दारिद्र्य व अज्ञानात खितपत पडल्यामुळें त्यांची स्थिति अतिशय करुणाजनक झाली आहे. याबाबत दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्यांच्यांत प्राचीन युगाची जडता इतकी खोलवर रुजली आहे कीं, त्यांच्या जीवनाविषयीं हितकारक अशी एखादी गोष्ट असली तरी ते आपल्या पुरातन तऱ्हा बदलण्यास कांहीं वेळां प्रतिकार करतात. म्हणून, त्यांच्या गिरिजन ग्रामीण संस्कृतीस कसल्याहि प्रकारचा बाध न येतां त्यांची आर्थिक स्थिति सुधारण्याबाबात सरकार व सामाजिक कार्यकर्ते प्रयत्न करीत आहेत.

समाजव्यवस्था :

येथील सर्व जमातींत पितृसत्ताक कुटुंब पद्धति अंमलांत आहे. तथापि स्त्रियांना बरेच स्वातंत्र्य असते हे अमान्य करतां येणार नाही. कुटुंबामध्यें स्त्रियांचे वर्चस्व बरेंच असते. कामगारवर्गांतील स्त्रियांना उच्चवर्गीय स्त्रियांपक्षां अधिक स्वातंत्र्य असून त्या शेतांत किंवा कारखान्यामध्यें पुरुषांच्या बरोबरीनें कामें करतात. उच्च कुलीन देशमुख घराण्यांत पड्याची अस्तित्वांत असलेली चाल नाहिशी होण्याच्या मार्गास लागलेली आहे. मराठे लोकांत व इतर कित्येक जातींत विधवा विवाह प्रचलित आहे. ब्राम्हण व कायस्थ या वर्गामध्यें विधवा-विवाहाला अगदीं अलीकडच्या काळापर्यंत मान्यता नव्हती. तथापि आधुनिक शिक्षणाच्या प्रसारामुळे या वर्गांतहि आतां विधवा-विवाह होऊं लागले आहेत. सर्वसाधारण कुटुंब एकजिनसी असते. शहरांत स्वतंत्र कुटुंबपद्धति आढळून येत असली तरी ग्रामीण भागांत संयुक्त कुटुंबपद्धति अस्तित्वांत असल्याचे दिसून येते. कुटुंब कलहाचे प्रकार कमी आढळतात.

येथील लोक कला प्रेमी आहेत. मध्यम वर्गीय आणि बुद्धिमान लोकांनीं संस्कृति व कला यांचे जतन व संवर्धन करण्याचे कामीं हातभार लावला. लोकशाहीचा विकास झाल्याकारणानें कला व संस्कृतीच्या बाबतींत मध्यम व कनिष्ठ वर्गांतील लोकांमधील अंतर बरेंच कमी झाले आहे. मध्यमवर्गीय लोकांमधील नाट्यासारख्या विशिष्ठ कलांसंबंधी खालच्या वर्गांतील लोकांना आवड उत्पन्न झाली असून खालच्या वर्गामध्येंच केवळ चालू असलेले तमाशे आतां सुशिक्षित लोकांनाही करमणुकीच्या दृष्टीनें अपरिहार्य वाटूं लागले आहेत.

संत कवींनी निर्माण केलेल्या महान् वाङमयाचा मराठी माणसाच्या मनावर गाढ परिणाम झालेला आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम व रामदास ही नांवें महाराष्ट्रांत घरोघरीं नित्य परिचयाची आहेत. आजही येथें या ख्यातनाम संत कवींचीं भजने, टाळ व मृदंगावर मोठ्या आवडीनें गाइली जातात.

मराठी मनाला या संतांइतकाच श्री शिवाजी महाराजांचाही अभिमान आहे. छत्रपति शिवाजी महाराजांबद्दल मराठी माणसाच्या मनांतील भावना सर्वत्र आदराची व ज्वलंत स्वरूपाची आहे. शिवाजी महाराजांनीं मराठी माणसाच्या ठिकाणीं एकतेची भावना जागृत केली व त्यांच्यातील शौर्य व धैर्य जागवून त्यांना कार्य प्रवृत्त केले. श्री शिवाजी महाराजांचे थोर नि उदात्त कर्तृत्व मराठी लोकांना नेहमीच स्फूर्ति देत आले आहे. त्यांची जयंति मोठ्या प्रमाणांत साजरी केली जाते.

उत्सव व लोकसाहित्य :

उत्सव व लोकसाहित्य यांमध्यें लोकांची संस्कृति स्पष्टपणें प्रतित होते. महाराष्ट्रांत सर्वत्र कित्येक उत्सव साजरे करण्यांत येतात. त्यापैकीं इतरत्रप्रमाणें होळी पौर्णिमेचा उत्सव फार मोठ्या उत्साहानें पार पडतो. होळीच्या दिवशी लोक थट्टामस्करी करण्यांत दंग झालेले दिसतात. त्या दिवशीं नित्याचे व्यवहार बंद असतात. आणि वागणूक व बोलण्याचालण्याचे नेहमीचे निर्बंध या दिवसापुरते सैल झालेले असतात. होळीच्या दुसऱ्या दिवशीं धुळवड असते. या दिवशीं मुलें धूळमाती खेळतात व त्यांच्या या खेळापासून कुणालाही स्वतःचा बचाव करणें मोठें कठीण असते. रंगपंचमीच्या दिवशीं लोक एकमेकांवर रंग टाकतात, पिचकारीनें रंग उडवतात. या दिवशी तर जो कोणी दिसेल त्याच्यावर कुणीही रंग उडवावा, असा प्रघात आहे. होलिकोत्सव हा वसंतऋतूचा प्रारंभ होय.

दसरा किंवा विजयादशमी या दिवसाला येथें महत्त्व आहे. या दिवशी सीमोल्लंघन करतात. पूर्वी या दिवशीं मराठे वीर दिग्विजयासाठीं म्हणजे मुलुखगिरी करण्यासाठीं बाहेर पडत असत. या दिवशीं आपटयांच्या पानांची बरीच मागणी असते. दसऱ्याच्या दिवशीं या पानांना लोक सोने समजून तीं पानें एकमेकांना देतात. दसऱ्या नंतर दिवाळीचा सण येतो. दीपावली हा लोकांचा राष्ट्रीय सण समजला जातो. दिवाळी जवळ आली कीं खेडयांतील कुंभार पणत्या तयार करण्यांत दंग झालेले दिसतात. खेडयांतील छोटया मोठया प्रत्येक झोपडीसमोर या वेळीं पणत्या उजळलेल्या दिसतील. या सणाच्या दिवसांत अत्यंत गरीब माणूसहि आपल्या झोपडी समोर पणत्या लावून घर सुशोभित करतो. दिवाळीच्या दिवसांत स्त्रियां निरनिराळी रुचकर पक्वाने तयार करण्यांत गर्क असतात व मुलें मौजेनें फटाके उडवतात.

पोळा अथवा "बैलांचा सण" हा आणखी एक उत्सव असून या सणांत अनेक लोक भाग घेतात. हया दिवशीं बैलांना त्यांच्या नेहमीच्या कामापासून संपूर्ण सुट्टी देण्यांत येते व त्यांना सजविण्यांत येते. सायंकाळीं खुल्या मैदानावर बैलांची अथवा बैलगाडयांची शर्यत घेण्यांत येते. गांवच्या पाटलाचा इषारा मिळतांच हे दणगट बैल खुल्या मैदानांत धावत सुटतात. सुसाट धावणाऱ्या हया बैलांना पाहून प्रेक्षकांच्या हृदयांत धडधड सुरू होते. दौड जिंकलेल्या बैलाचा गौरव करण्यांत येतो व त्याची गांवांत मिरवणूक काढण्यांत येते.

भाद्रपद महिन्यांत गणेशोत्सव साजरा करण्यांत येतो. हा एक लोकप्रिय सण आहे. गणेशोत्सवाचा सार्वजनिक उत्सव पहिल्या प्रथम लोकमान्य टिळकांनी सुरू केला. राजकीय दास्यामुळें हतोत्साह झालेल्या लोकांना या सामाजिक उत्सवांत एकत्र येऊन आपल्या समस्यांची चर्चा व विचार करतां आला. हा उत्सव दहा दिवस चालतो. हया कालावधींत अनेक प्रकारचे करमणुकीचे कार्यक्रम करण्यांत येतात व हया सर्व कार्यक्रमांत लहानापासून मोठयांपर्यंत सर्व लोक मोठ्या उत्साहानें भाग घेतात. खुद्द नागपूर येथें दरसाल लोकशिक्षणाच्या हेतूनें एक मनोरंजक व माहितीपूर्ण प्रदर्शन भरविण्यांत येते. माहिती पटाद्वारे विकासाचे ज्ञान देण्यासाठी खास मोहिम आखण्यांत येते. त्यांचा असंख्य लोक फायदा घेतात. अकराव्या दिवशीं मिरवणूक काढण्यांत येऊन गणेशाच्या मूर्तीचे नदींत अथवा जलाशयांत विसर्जन करतात.

नागपूर येथें बंगाली लोकांची बरीच मोठी संघटित वस्ती आहे. ते दुर्गापूजेचा उत्सव फार मोठ्या प्रमाणांत साजरा करतात. नवरात्र सुरू झाल्यापासून दुर्गादेवीची मूर्ति बसवतात व तिच्या नांवानें उत्सव करतात. त्याप्रसंगीं एक मोठे प्रदर्शन भरविण्यांत येते. त्यांत विकास योजनांची माहिती देणारे खाने असतात. असंख्य लोक हया उत्सवांत भाग घेतात. दसऱ्याचे दिवशी सीमोल्लंघनाचे मुहूर्तावर दुर्गा मातेचे विसर्जन करण्यांत येते.

स्त्रियांत शारदोत्सव फार प्रिय असतो. त्यानिमित्त शारदा बसवून स्त्रियां हळदीकुंकू, ओव्या, गाणीं व इतर करमणूकीचे कार्यक्रम करतात.

गोकुलाष्टमी हा कृष्णाचा जन्मदिवस म्हणून, रामनवमीस रामजन्मोत्सव म्हणून व हनुमान जयंतीहि मोठ्या प्रमाणांवर साजऱ्या होतात.

भारतांतील इतर भागाप्रमाणें ह्या ठिकाणीं मोहरमचा सण मोठ्या थाटामाटांत साजरा करण्यांत येतो. इस्लाम धर्मातील थोर व्यक्ति हसन व हुसेन यांच्या स्मरणार्थ मुसलमान लोक हा सण साजरा करतात. ह्या सणांत हिंदू लोकहि भाग घेतात. ख्रिश्चन लोक नाताळ मोठ्या प्रमाणांत साजरा करतात व बुद्धजन दीक्षा समारंभ साजरा करतात, तर इतर आपल्या पंथानुसार सण करतात.

"हुरडा" खाण्याच्या कार्यक्रमाचा उल्लेख केल्याशिवाय मराठी मनाच्या आमोद-प्रमोदाची माहिती पूर्ण होणार नाहीं. हुरडा हे ज्वारीच्या रसरसलेल्या ताज्या भाजलेल्या दाण्याचे खरपूस खाद्य होय. ज्वारीचे पीक तयार होण्याच्या वेळीं शेतकरी आपल्या नातेवाईकांना व मित्रांना हुरडा खाण्याला बोलावितात. हा कार्यक्रम शेतावरच साजरा करण्यांत येतो. ज्वारीची ताजी हिरवीं कणसें तोडून आगटींत भाजण्यांत येतात व नंतर हातावर मळून ह्या कणसांतील दाणें अलग काढण्यांत येतात. त्यानंतर हे दाणें, चटण्या व दही यां सोबत पाहुण्यांना देण्यांत येतात. हुरडा खाण्याच्या निमित्तानें सुगीचा समारंभ म्हणन गांवांतील लोकांचे एक स्नेह संमेलनच भरतें.

परंपरागत लोकगीते, समूह गीतें, नृत्यें गवळण व ओव्या म्हणून पुरुषस्त्रिया आनंदाचे प्रसंग साजरे करतात. लोकरंजनाच्या प्रकारांत तमाशाची ओढ कांही वेगळीच असते. तमाशांत लावण्या, अभिनय आणि नाच हे सर्व प्रकार एकवटलेले असतात व ह्या सर्वांना ग्रामीण पार्श्वभमि असते. तमाशाचे गौरी-गवळण आणि वग असे दोन भाग असतात. पहिल्या भागांत लावण्या आणि नाच असतो, तर दुसऱ्या भागांत कथानकावर आधारलेला विनोदी संवाद असतो. तमाशांतील स्त्री-पुरुष पात्रांची संख्या ६ ते ८ असते. स्त्री नर्तकीच तमाशांतील प्रमुख भूमिकेचे काम करते आणि आपल्या हजरजबाबीपणानें व विनोदानें लोकांना हंसविण्याचे काम सोंगाडया करीत असतो. भजन, भारूड, ललित, कीर्तन, तुंबडीगायन आणि गोंधळ हे लोकगीताचे आणखी प्रकार आहेत. देवदेवतांना आळविण्यासाठी भजनें म्हणतात. भारुडांतून माणसाच्या आध्यात्मिक जीवनाविषयींच्या गोष्टी पद्यांत कथन केलेल्या असतात आणि त्यांत मधून मधून विनोदहि असतो. ललित हा नाटकाचा ओबडधोबड प्रकार असून त्यांत पौराणिक कथा सांगितलेल्या असतात. कीर्तनकार कीर्तनांतून भक्तीबरोबर लोकशिक्षण चेहि काम करतो, तर गोंधळामध्यें गोंधळी निरनिराळ्या प्रकारची गाणी म्हणतात आणि ह्या गाण्यांतून देवदेवतांची स्तुति आणि पौराणिक गोष्टींचे कथन असते. सामाजिक प्रश्नांची खेळकर मांडणी तुंबडीगायनांतून करण्यांत येते.

खेळ व सामने :

ग्रामीण भागांत जे सामने आणि खेळ खेळले जातांत त्यांत कुस्ती ही सर्वांत लोकप्रिय आहे. प्रत्येक मोठ्या खेड्यांत साधारणतः एकतरी तालिमखाना असतो. तरुणवर्ग दंड, बैठक व मल्लखांबाच्या सहाय्यानें आपले शरीर कमावतो. कुस्त्यांचे सामने हे खेड्यांतील जत्रांचे एक प्रमुख आकर्षण असते.

हुतूतू, आट्यापाट्या, खोखो आणि लेझिम हे सर्वसाधारणपणें पुरुषांचे खेळ आहेत. तर झिम्मा आणि फुगडी हे स्त्रियांचे वेगळे खेळ आहेत. झिम्मा हा एक साधा नाच असून त्यांत पांच सहा मुलीं भाग घेतात. ह्यांत सर्व मुलीं उभ्या राहून एक गोल तयार करतात आणि पायाचा लयबद्ध आवाज करीत, टाळ्या वाजवींत आणि गाणें म्हणत भरभर गोलाकार फिरतात. फुगडी हा दोघी-दोघींनी मिळून खेळावयाचा खेळ असून त्यांत एकमेकींचे हात घट्ट गुंफून टांचेवर जोरांत गोल फिरतात.

विदेशी खेळांत क्रिकेट, हॉकी, फुटबॉल, बॅडमिंटन, टेबलटेनिस; बैठ्या खेळांत चेस व पत्ते लोकप्रिय आहेत.

नवीन नवीन शास्त्रीय शोधांमुळे आणि सुधारणांमुळें जुन्या गोष्टी जाऊन त्यांच्या जागी नव्या गोष्टी येत आहेत. दळणवळणाच्या साधनांचा झपाट्यानें विकास होत असून राज्यांतील बसगाड्या आतां खेड्यापाड्यांतहि जाऊं लागल्या आहेत. प्रौढ मतदानाद्वारे निर्माण झालेल्या लोकशाहीमुळें लोकांच्या जीवनावर परिणाम झाला आहे. विधानमंडळ आणि स्थानिक संस्था ह्यांच्या निवडणुकांमुळें जनतेंत नवीन च तन्य आणि नवीन आकर्षणें निर्माण झाली आहेत. जीवनाला नवीन अर्थ आला आहे.

४. शासनव्यवस्था व जनसहकार्य

प्रशासनाचें ध्येय :

"पूर्णपणें निपक्षपाती, अतिशय कार्यक्षम व विशुद्ध अशा प्रशासनाचा राज्यांतील लोकांना लाभ करून देणें हे सरकारचे ध्येय राहील.

प्रशासनाचे कार्य ज्यांच्याकडे सोंपविण्यांत आलेले आहे, ते सर्वजण जनतेच्या गरजांबाबत जागरूक राहतील अशी पूर्ण काळजी घेण्यांत येईल. मग त्यांचे विशिष्ट कर्तव्य जनतेशी प्रत्यक्षपणें संबंधित असो अथवा अप्रत्यक्षपणें संबंधित असो. वैयक्तिक नागरिकांशीहीं त्यांच्या कर्तव्याचा अप्रत्यक्षपणें संबंध असला तरी त्यांनीं त्यांच्या हितसंबंधाची काळजी घेतली पाहिजे.

ग्रामपंचायती व इतर स्थानिक संस्था या सारख्या लोकसंस्थांची वाढ करून व त्यांच्या कामाचा विस्तार करून, खेडयांत तसेंच शहरांत स्वतःचा कारभार चालविण्याच्या बाबतींत जनतेचा वाढता कौल मिळविण्याचे योजिलें आहे.

एखादा प्रश्न केवळ निकालांत काढणें ही प्रशासनाच्या कार्यक्षमतेची कसोटी राहणार नाही; तर आपली बाजू ऐकून घेण्यांत आली व आपल्याला योग्य रीतीनें व न्याय्यपणें वागविण्यांत आले अशी संबंधित इसमाची खात्री पटणें ही याबाबत कसोटी राहील.

प्रत्येक समाजाला, प्रदेशाला, गटाला, प्रत्येक विचार प्रणालीला योग्य न्याय व वागणूक देणे हे उद्दिष्ट राहील.

प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरुपाची हिंसा निर्माण करणारे वातावरण तयार होण्यास राज्याकडून प्रतिबंध करण्यांत येईल.

सर्व लोकांना परस्पर विश्वासानें जगतां येईल व आपले जीवन धोक्यांत आहे अथवा कुणीतरी आपल्याला उपसर्ग पोचविल अशी भीति कोणाही कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकाला वाटणार नाहीं असें वातावरण निर्माण करण्याच्या कामीं सरकार कसोशीनें प्रयत्न करील".—मार्गदर्शक तत्वे.

राज्य कचेऱ्या :

महाराष्ट्र सरकार एका निश्चित कालावधींसाठीं नागपूरला असतें. तसेंच विधिमंडळाचे एक अधिवेशन दरवर्षी नागपूर येथें घेण्यांत येते. ज्यावेळीं मंत्रीमंडळ व विधानमंडळाचा मुक्काम नागपूरांत असतो, त्यावेळीं सर्व खात्यांच्या प्रमुख कचेऱ्या नागपूर येथें येतात.

केन्द्रिय कचेऱ्या :

मध्यवर्ति ठिकाण असल्यानें केन्द्रिय सरकारच्या बऱ्याच कचेऱ्या येथें आहेत.

विभागीय कमिशनर :

नागपूर विभागाचे प्रमुख केन्द्र नागपूर असल्याने त्यादृष्टीनेंही त्याचे महत्व विशेष आहे. ह्या विभागाचा प्रमुख कमिशनर असतो. कमिशनरला विस्तृत व व्यापक अधिकार दिलेले आहेत. आपल्या विभागांतील महसूल व सर्वसामान्य प्रशासन विषयक सर्व बाबींच्या बाबतींत तो प्रमुख नियंत्रण अधिकारी असून शिवाय सर्व प्रादेशिक कार्यालयांच्या कार्यावर, विशेषतः नियोजन व विकासाच्या बाबतींत देखरेख करण्याची व त्यांच्या कार्यांच्या एकसूत्रीकरणाची जबाबदारी त्याचेवर सोपविलेली आहे. या व्यवस्थेमुळे लोकांची गैरसोयहि बऱ्याच प्रमाणांत दूर झालेली आहे. कारण आतां त्यांना लहानसहान कामांकरिता सचिवालयाकडे धांव घ्यावी लागत नाहीं.

विभागीय कमिशनराची नियुक्ति हे विकेंद्रिकरणाच्या दृष्टीनें मोठे महत्वाचे पाऊल होय. त्याचबरोबर खातेप्रमुख, प्रादेशिक व जिल्हा अधिकाऱ्यांना अधिकार देण्याचे प्रमाण वाढविलेले आहे,

समाज विकास कार्यक्रमाच्या बाबतींत कलेक्टर व प्रकल्प अधिकारी यांना विस्तृत अधिकार देण्यांत आले आहेत.

कलेक्टर :

जिल्हापातळीवर राजस्व शासन कलेक्टराचे मार्फत चालते. पूर्वी त्याला डेप्युटी कमिश्नर ही संज्ञा होती. जिल्ह्यांतील सारा वसुलीवर देखरेख ठेवणें, अबकारी व इतर कर वसूल करणें, दस्तऐवजीं उत्पन्नावर देखरेख ठेवणें आदि कामें कलेक्टरला करावी लागतात. जिल्ह्यांत शांतता व सुव्यवस्था ठेवण्यासाठी कांही न्यायालयीन अधिकार त्याला दिलेले आहेत. जिल्ह्यांत निरनिराळ्या खात्याचे अधिकारी आपापल्या खात्याची कामें करीत असतात. त्यांच्या कार्यांत एकसूत्रीपणा आणण्याचे कामही कलेक्टरला करावे लागते. जिल्ह्यांत विविध स्थानिक स्वराज्य संस्था कार्य करीत असतात. त्यांच्यावर देखरेख ठेऊन त्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्यहि त्याला करावे लागते. समाज विकास गट, स्थानिक विकास कार्यक्रम आदी योजनांतर्गत विकास कार्यावरहि त्याला देखरेख ठेवून त्यांना मार्गदर्शन करावे लागते. सरकारचे निरनिराळे कायदे, कार्यक्रम आदींची अंमलबजावणी जिल्ह्यांत योग्यरितीनें होते कीं नाहीं हे ही पहाणें त्याचे काम असते. अवर्षण, अतिवृष्टि, महापूर टोळधाड, रोगांच्या सांथी आदी उद्‌भवल्यास, त्याला जातीनें लक्ष घालावे लागते व आणिबाणीच्या काळांतील उपाययोजना कराव्या लागतात. सर्व तऱ्हेची जबाबदारी पार पाडणारा जिल्ह्यांतील प्रमुख अधिकारी म्हणून कलेक्टरकडे पाहिले जाते.

सारा व कर वसुलीवर देखरेख ठेवण्यासाठीं उप-विभाग पातळीवर व तहसिल पातळीवर उप-विभाग अधिकारी व तहसिलदार कामें करतात. ग्राम पातळीवर पाटील व तलाठी असतात. जिल्ह्यांत कोठेही शांततेचा भंग होण्याचे भय असल्यास कलेक्टर अथवा त्याचे प्रतिनिधि सुव्यवस्था ठेवण्यासाठी आपल्या न्यायालयीन अधिकारांचा उपयोग करतात. इतर विविध खात्याचे तहसील पातळीवर अधिकारी असतात. प्रत्येक तहसिलींत दस्तऐवज नोंदण्यासाठीं सब-रजिस्ट्रार असतात. त्यांच्या कचेऱ्या तहसिलीच्या प्रमुख ठिकाणीं असतात.

कलेक्टरचे मदतनीस :

जिल्ह्यांत निरनिराळ्या खात्याचे अधिकारी नेमलेले असतात. उदाहरणार्थ—जिल्हा पोलिस अधिकारी, एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा प्रकल्पाधिकारी, जिल्हा पंचायत अधिकारी, जिल्हा शेतकी अधिकारी, जिल्हा भू-संरक्षण अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा वन अधिकारी, जिल्हा सहकार अधिकारी, जिल्हा वाणिज्य अधिकारी, जिल्हा कुटिरोद्योगाधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, अबकारी व मद्यनिषेध अधिकारी, जिल्हा प्रसिद्धि अधिकारी आदि ह्या सर्वांच्या कारभारावर देखरेख ठेवून त्यांना वेळोवेळीं मार्गदर्शन करण्याचे व सर्वांच्या कामांत एकसूत्रीपणा आणण्यासाठीं कलेक्टरला प्रयत्न करावे लागतात. नव्यानेंच पब्लिक ट्रस्ट कायदा ह्या भागाला लागूं झाला असून सार्वजनिक संस्थांचे नोंदणीकरण करण्यासाठीं असिस्टंट चारिटी कमिशनरचे कार्यालय नागपूर येथें उघडले आहे. जिल्हानिहाय अधिकाऱ्यांच्या कार्यांत एकसूत्रीपणा आणण्यासाठीं कलेक्टर त्यांची एक समन्वय समिती स्थापून वेळोवेळीं तिच्या बैठकी भरवून त्यांना मार्गदर्शन करतो. त्यायोगें कारभार एकसूत्रानें व कार्यक्षमतेनें चालण्यास मदत होते.

विविध खात्याचे अधिकारी व समन्वय :

स्थानिक स्वराज्य संस्था :

सत्तेचे वाढते विकेन्द्रीकरण करण्याच्या सरकारच्या धोरणानुसार जिल्ह्यांत तहसील पातळीवर जनपद सभा, नगर पातळीवर नगरपालिका व ग्रामीण पातळीवर ग्रामपंचायती स्थानिक स्वराज्याचा कारभार पाहतात. त्यांच्यावर देखरेख ठेवण्याचे व मार्गदर्शन करण्याचे काम कलेक्टरला करावे लागते.

जनपद सभा :

दिनांक १५ ऑगस्ट १९४८ पासून तहसिलवार जनपद सभा अंमलांत आल्या. त्यांची संख्या पांच आहे. त्या लोकनियुक्त असतात. दर पांच वर्षांनीं त्यांची निवडणूक होत असते. निवडून आलेल्या सभासदांतून जनपदसभेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडण्यांत येतो. जनपदसभेचा मुख्य कार्यपालन अधिकारी म्हणून उप-विभाग अधिकारी कार्य पाहतो. तहसिलदार दुय्यम कार्यपालन अधिकारी म्हणून काम पाहतो. जनपदसभेचा स्वतःचा नोकरवर्ग असतो.

जनपदसभेकडे आपल्या भागांतील शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक बांधकामें, शेतीसुधार व विकास कामें आदि पाहण्याची जबाबदारी असते.

उत्पन्न म्हणून जनपदसभेला शेतसाऱ्यावर सेस वसुली, शाळापट्टी, घरपट्टी, नदीचे घाट, डोह, आदि पासून होणारे उत्पन्न व सरकारकडून शिक्षण आदीसाठीं मिळणारे अनुदान यांतून उत्पन्न मिळते. त्यांतून जनपद सभा आपला खर्च भागवितात.

ग्रामपंचायती :

नागपूर जिल्ह्यांत १,६६७ खेडीं आहेत. आणि सत्तेच्या विकेन्द्रीकरणाच्या तत्त्वानुसार खेडी म्हणजे शासनाचा पायाच.

इतिहासाकडे नजर टाकली म्हणजे असे दिसून येते कीं, प्राचीनकाळीं प्रत्येक खेडें स्वयंशासित व संघटित असा एक सामाजिक घटक होते. याचे प्रमुख कारण अनादिकालापासून खेड्यांचा कारभार ग्रामपंचायती हांकीत असत हे होय. आपल्या ऐतिहासिक कार्यामुळे त्या राष्ट्रीय जीवनाचे एक प्रमुख अंग बनल्या होत्या. परकीयांच्या आक्रमणाला तोंड देण्यास ही ग्रामीण लोकराज्यें सदैव समर्थ असत. परंपरागत रूढ रिवाज हे त्यांचे अलिखित कायदे होते. ह्या स्थानिक लोकतांत्रिक संस्थांची हिंदू व मुसलमान राजांच्या कारकीर्दीत सारखीच अव्याहत भरभराट चालू होती. परंतु इतिहासाच्या चढउतारांत, ब्रिटिशांच्या आमदानींत केन्द्रानुवर्ति शासनव्यवस्थेमुळें ह्या संस्था मोडकळीस आल्या, कालांतरानें लयास गेल्या आणि खेड्यांची सामाजिक, आर्थिक व राजकीय घडी विस्कळीत झाली.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत स्वराज्य प्राप्तीची चळवळ चांगलीच फोफावली. 'खेड्याकडे चला' ह्या विचारसरणीचा उदय झाला. आणि ग्रामपंचायतींच्या पुनरुज्जीवनाची आवश्यकता लोकनेत्यांना वाटूं लागली. जनतेच्या मागण्या ध्यानीं घेऊन तत्कालीन भारत सरकारनें निर्बंधित स्थानिक स्वराज्याच्या कल्पनेला मान्यता देऊन सन् १९१५ मध्यें एक प्रस्ताव केला व त्यानुसार ग्रामपंचायती कांहीं खेड्यांत स्थापण्याचे ठरविण्यांत आले. १९२० सालांत प्रथम कांहीं ग्रामपंचायती ह्या जिल्ह्यांत स्थापण्यांत आल्या.

त्याकाळीं अस्तित्वांत असलेल्या जिल्हा मंडळाकडें ह्या ग्रामपंचायतींवर देखरेख ठेवण्याचे काम सोपविण्यांत आले होते.

१९४६ सालीं विस्तृत असा ग्रामपंचायत कायदा ह्या भागास लागू करण्यांत आला.

ह्या कायद्यानुसार पंचायत विकासासाठीं ३ टप्प्यांचा कार्यक्रम आंखण्यांत आला. पहिल्या टप्प्यांत त्या कायद्याच्या ५ (१) कलमाखाली प्रत्येक १ हजारांवरील लोकवस्तीच्या खेड्यास पंचायत स्थापण्याचे ठरविण्यांत आले. दुसऱ्या टप्प्यानें ५०० च्या वर लोकसंख्या असलेल्या खेड्यांना पंचायती देण्याचे ठरविले गेले व तिसऱ्या टप्प्यांत ५०० च्या खाली लोकसंख्या असलेल्या खेड्यांच्या समुदायांना गट पंचायती देण्याचे ठरविले गेले.

हा कायदा लागूं झाल्यानंतर १ वर्षाच्या अवधींत भारताला स्वातंत्र्य मिळाले व पंचायतीच्या कार्यक्रमास नेटानें चालना देण्यांत आली. परिणामतः पहिले दोन टप्पे पूर्णतया गांठण्यांत आले व ५०० च्या वरील बहुतेक खेड्यांना ग्रामपंचायतीच्या कारभाराखाली आणण्यांत आले.

१९४६ च्या पंचायत कायद्यानुसार पात्र प्रौढांच्या मतदानांतून पंचायती अस्तित्वांत येऊं लागल्या. ह्या पंचायतींत ५ पासून १५ पर्यंत सभासद असत. निवडून आलेल्या सभासदांना पंच म्हणून ओळखीत. ते आपल्यापैकीं एकाची सरपंच व एकाची उप-सरपंच म्हणून निवड करीत. ह्या पंचायतीचे वैशिष्ठ्य हें कीं ज्या त्या खेड्याचा मुलकी पाटील हा त्या ग्रामपंचायतीचा पदसिद्ध सभासद असे.

ह्या कायद्यान्वयें ग्रामपंचायतीच्या कामाचे दोन भाग करण्यांत आले होते. पहिला भाग म्हणजे आवश्यक कामें व दुसरा भाग म्हणजे ऐच्छिक कामें. पहिल्या भागांत स्वच्छता व आरोग्य टिकविणें, दवाखान्याच्या सोई उपलब्ध करून देणें, पाणीपुरवठा करणें, रस्तेबांधणी व दुरुस्ती करणें आणि जन्ममृत्यूंची नोंद ठेवणें ह्यांचा समावेश होई. तर दुसऱ्या भागांत पैसा असल्यास खाटिक खानें चालविणें, धर्मशाळा बांधणें, निराश्रितांना मदत करणें, शेतीसुधार व सहकारी शेती करणें, पशुसंवर्धन करणें व कांहीं ठिकाणी जमीन महसूलीची कामें करणें आदींचा अंतर्भाव होई. त्यांना शेतकऱ्यांकडून शेतसाऱ्याच्या रुपयामागे अर्धा आणा कर, घरपट्टी, जागा व संडासपट्टी, बाजारपट्टी आणि जनपदच्या व सरकारच्या अनुदानांतून उत्पन्न मिळत असे. कांहीं ग्रामपंचायती न्यायदानाचेहि काम करीत. २० रुपयांपर्यंत दंड करण्याचा व १०० रुपयांपर्यंत दिवाणी खटले चालविण्याचा त्यांना अधिकार असे. त्यांचे निर्णय फिरविण्याचा अधिकार डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज ह्यांना असे. पंचायतींना आपला कारभार चालविण्यासाठीं चिटणीस व इतर कर्मचारी नमतां येत असत.

ग्रामपंचायतींचीं कामें :

दिनांक १५ ऑगस्ट १९४८ रोजीं जिल्हा मंडळें जाऊन त्यांच्या जागीं तालुकानिहाय जनपद सभा आल्या. त्यांनी नेमलेल्या तपासनिसांमार्फत व समाज कल्याण खात्याच्या तपासनिसांमार्फत पंचायतीच्या कामकाजांवर देखरेख ठेवण्यांत येत असे.

देखरेख व्यवस्था :

राज्यपुनर्रचनेनंतर १९५८ चा पंचायत कायदा नागपूर जिल्ह्यास लागू झाला.

वरील कायद्यानुसार गांवास ग्रामपंचायत जाहिर करण्यापासून ते प्रत्यक्ष ग्रामपंचायत स्थापन करण्याच्या विविध अवस्थेंपर्यंत जिल्ह्यांतील १,६६७ खेड्यांना ६५१ ग्रामपंचायती लागू करण्यांत येऊन १०० टक्के भाग ह्या कार्यक्रमाखालीं आणण्यांत आला आहे.

अस्तित्वांत आलेल्या ग्रामपंचायतीच्या घटनेवर १९५८ च्या कायद्याचा पुढील प्रमाणें परिणाम झाला. स्त्रियांना पंचायतीवर प्रतिनिधित्व मिळालें. मुलकी पाटलांचे सभासदत्व रद्द झाले, आवश्यक व ऐच्छिक असे कामाचे प्रकार रद्द करण्यांत आले व गांवाच्या सर्वांगिण विकासाची जबाबदारी पंचायतींवर सोपविण्यांत आली. समाजविकास कार्य परिणामकारकरित्या करण्याची कामगिरी पंचायतींना पार पाडावयाची आहे. स्वच्छता, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, कोंडवाडे, बाजार व यात्रा चालविणें, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य, ग्रामरक्षण, शेतकी, पशु व ग्रामोद्योग आदि विकासाच्या सर्व क्षेत्रांत आतां पंचायतींना कार्य करतां येईल. ग्रामपंचायतींना आपला नोकरवर्ग ठेवतां येतो.

शासनाचें खऱ्या अर्थानें विकेन्द्रीकरण करण्याच्या हेतूनें प्रशासन विषयक, न्यायदान विषयक, महसूल विषयक कामें व विकास कामें पंचायतीकडें देण्यांत आलेलीं आहेत. ही कामें कार्यक्षमरित्यां पार पाडतां यावींत म्हणून ग्रामपंचायतींना सवलती व निधी उभारण्यासाठीं कर लादण्याचे, १ रुपया महसुलावर १२ नये पसे सेस वसूल करण्याचे विस्तृत अधिकार देण्यांत आले आहेत. त्याखेरीज महसुलाच्या २५ ते ३० टक्के रक्कम पंचायतींना अनुदान म्हणून सरकारकडून मिळणार आहे.

ग्रामपंचायतींच्या कारभारावर देखरेख ठेवण्यासाठीं नवीन कायद्यान्वयें जिल्ह्यांत जिल्हा ग्रामपंचायत मंडळ अस्तित्वांत आले आहे.

जिल्हा ग्रामपंचायत मंडळ :

नागपूर जिल्ह्यांत प्रथमतः जनपद सभाच पंचायतीच्या देखरेखीचें काम पहात. नंतर ती व्यवस्था पाहण्याचे काम कलेक्टरकडे देण्यांत आले. त्याच्या मदतीला जिल्हा पंचायत अधिकारी व हिशेब तपासनीस देण्यांत आले. तसेच तालुका व गटनिहाय अधिकारी नेमण्यांत आले.

आतां नव्याने अस्तित्वांत आलेले जिल्हा ग्रामपंचायत मंडळ ग्रामपंचायतींच्या कारभारावर देखरेख ठेवते. ह्या मंडळाचे सदस्य ग्रामपंचायत मतदार संघांतून निवडून येतात. कलेक्टर हा मंडळाचा अध्यक्ष असतो, तर एक बिनसरकारी सदस्य उपाध्यक्ष म्हणून निवडून येतो. जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी मंडळाचा सचिव असतो.

गांवाच्या व देशाच्या राज्य कारभाराचें शिक्षण देणाऱ्या ह्या पंचायत संस्थांचे भवितव्य उज्वल आहे. विकास कार्यक्रमाशीं त्यांची सांगड घातल्यानें त्यांचे आजच्या काळांत महत्व वाढले आहे. शासन व अर्थव्यवस्थेच्या विकेंद्रीकरणाच्या धोरणामुळें पंचायतद्वारां लोकशाही विस्तृत पायावर उभी राहण्यास मदत झाली. पंचायतीच्या कार्यक्षम कारभारासाठीं सरपंच, पंच ह्यांना प्रशिक्षण देण्यासाठीं तालुका व गट निहाय शिबिरें घेण्यात येत असून कामठी सारख्या केन्द्रांत ग्रामपचायतींना आवश्यक असलेले चिटणीस प्रशिक्षण देऊन तयार करण्यांत येत आहे. त्यामुळें ग्रामपंचायतींची घटना मजबूत होत आहे. अर्थात्च त्यामुळें खेड्याचा कायापालट होण्यास वेळ लागणार नाहीं असा विश्वास वाटूं लागला आहे.

नगरपालिका :

नागपूर जिल्ह्यांत कामठी, रामटेक, खापा, कळमेश्वर, उमरेड, मोवाड, सावनेर, काटोल, नरखेड, आणि मोहपा येथें नगरपालिका आहेत. ह्या नगरपालिका लोकनियुक्त असतात.

रस्ते बांधणें, दवाखानें चालविणें, पाणीपुरवठा करणें, स्थानिक स्वच्छता राखणें व शैक्षणिक सोई उपलब्ध करून देणें आदी जनतेच्या सुखसोईंची कामें त्यांना करावीं लागतात.

त्यासाठीं कर रुपानें त्यांना उत्पन्न उभें करतां येते. मोठ्या कामांसाठीं सरकारच्या पूर्व परवानगीनें त्यांना कर्जहि उभें करतां येते. सरकारहि त्यांना अनुदान देते. २० हजार लोकवस्तीपर्यंतच्या नगरपालिकांना विकास गटांच्या योजनांचाहि फायदा मिळूं शकतो.

नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यास :

नागपूर शहराचा स्थानिक स्वराज्य कारभार नागपूर महानगरपालिकेकडे आहे. ही महानगरपालिका २ मार्च १९५१ रोजीं अस्तित्वांत आली.

महानगरपालिका क्षेत्राचा व्याप ८४ चौरस मैलाचा असून त्या क्षेत्रांतील लोकसंख्या १९६१ च्या शिरगणतीनुसार ६४३,१८६ इतकी आहे.

महानगरपालिकेचे सभासद लोकनियुक्त असतात. महानगरपालिकेच्या अध्यक्षांना मेयर म्हणतात. महानगरपालिकेचे मुख्य कार्यपालन अधिकारी म्हणून म्युनिसिपल कमिशनर हा कलेक्टरच्या दर्जाचा अधिकारी काम पहातो. महानगरपालिकेचा नोकरवर्ग खूप मोठा असतो.

नागरिकांना विविध सुखसोई उपलब्ध करून देण्यासाठीं महानगरपालिका अविरत प्रयत्नशील असते. सिमेंटचे रस्ते तयार करणें, विद्युत दिव्यांची व्यवस्था करणें, प्राथमिक शाळा चालविणें, गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करणें, नवीन वस्त्या वसविणें, कर्मचाऱ्यांसाठीं घरें बांधून देणें, तलाव दुरुस्त करणें, बागांचा विकास करणें, स्टेडियम बांधून ते चालविणें, स्वच्छता व आरोग्याच्या सोई उपलब्ध करून देणें, पोहण्याचे तलाव बांधणें, औषधालयें, बाजार चालविणें, नाली योजना व पाणीपुरवठ्याच्या योजनांत वाढ करणें आदि कामें महानगरपालिकेकडून करण्यांत आली असून त्यापैकीं कांहीं प्रगतीपथावर आहेत.

वरील कामें करण्यासाठीं महानगरपालिका विविध कर बसविते, कर्ज उभारते, सरकारकडून अनुदान व कर्ज घेते.

नागपूर नगरपालिका विदर्भांत स्थानिक स्वराज्याचा आदर्श आहे.

तिच्या जोडीस १९३७ सालीं अस्तित्वांत आलेली नागपूर सुधार प्रन्यास (Improvement Trust) ही संस्थाही काम करते. हिच्या द्वारा शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठीं प्रयत्न होत आहेत. नव्या वस्त्या करणें, रस्ते बांधणें, औद्योगिक व व्यापारी वसाहती स्थापणें, कामगारांसाठीं व कमी उत्पन्नवाल्यांसाठीं वस्त्या तयार करणें आदी कामें ह्या संस्थेमार्फत हातीं घेण्यांत आली आहेत. ह्या संस्थेमार्फत ५० वर्षांचा मास्टर प्लॅनही तयार करण्यांत आला आहे.

विभागीय पातळीवर विकास गट, स्थानिक विकास कार्यक्रम व योजनान्तर्गत कार्यक्रम आंखून राबविण्यासाठीं एक विभागीय विकास मंडळ नागपूर येथें आहे. विभागांतील विविध स्तरांतील सामाजिक कार्यकर्ते, विधान मंडळाचे व लोकसभेचे सदस्य आदी हे त्या मंडळाचें सदस्य असतात.

विभागीय विकास मंडळ: विविध विभागीय अधिकारी ह्या संस्थेचे पदसिद्ध सभासद असतात. विभागीय कमिशनर हा त्या मंडळाचा अध्यक्ष असतो व एक सामाजिक कार्यक्षेत्रांतील व्यक्ति उपाध्यक्ष असते. त्याची व मानद सचिवाची नेमणूक सरकारमार्फत होते. ह्या मंडळाच्या विविध विषयवार उपसमित्याहि असतात. त्यांच्याद्वारा विभागांतील योजनाबद्ध विकास घडवून आणण्यासाठीं मार्गदर्शन करण्यांत येत असते.

जिल्हा पातळीवर जिल्हा विकास मंडळ आहे. विकास गट व स्थानिक विकास कार्यक्रमाखालीं तसेंच योजनांतर्गत कार्यक्रम आंखून राबविण्यासाठीं हें मंडळ कार्यशील असते. विविध विकास कार्यावर देखरेख ठेवून त्यांच्यांत एकसूत्रीपणा आणण्यासाठी हें मंडळ कार्य करते. ह्या

जिल्हा विकास मंडळ: मंडळाचा अध्यक्ष कलेक्टर असतो. मंडळाचा उपाध्यक्ष व मानद सचिव समाजकार्यकर्त्यांमधून सरकार नियुक्त करते. जिल्ह्यांतील सर्व खासदार व आमदार व सरकारी अधिकारी हे ह्या मंडळाचे पदसिद्ध सभासद असतात. कांहीं समाज सेवक नियुक्त सभासद असतात. ह्या मंडळाच्या निरनिराळ्या विषयवार उपसमित्या असतात. ह्या मंडळाची नव्यानेंच पुनर्घटना करण्यांत आली आहे. जिल्हा प्रकल्प अधिकारी मंडळाचा कार्यपालन अधिकारी म्हणून काम करतो. जिल्हा विकास मंडळामार्फत जिल्ह्यांतील विविध भागांत जनतेच्या सहकार्यानें स्थानिक विकासाचे विविध कार्यक्रम आखून राबविण्यांत येतात. त्या कार्यक्रमाखाली शाळा, विहिरी, रस्ते, समाजगृहे आदि बांधण्यांत येतात.

लोकशाही कल्याणकारी राज्यांत योजना आखून पार पाडणें महत्वाचे असते. अर्थात् ही योजना वरून आखली गेली व राबविली गेली तर जनतेला तिच्याविषयी आत्मियता नसणें अगदी साहजिक आहे. म्हणून तिसरी पंचवार्षिक योजना आंखतांना विभागीय विकास मंडळ व जिल्हा विकास मंडळ द्वारां जनतेकडून योजना मागविण्यांत येऊन त्यांच्यांतून अग्रता ठरवून तिसरी पंचवार्षिक योजना ठरविण्यांत आली. अशा रितीनें भविष्यांत महत्त्वाची कामगिरी ह्या मंडळांना बजावयाची आहे.

ग्रामीण जनतेंत नवजीवन निर्मिण्यासाठीं व नवसमाजाची उभारणी करण्याच्या उद्देशानें १९५२ मध्यें समूह विकास योजना ह्या नांवाचा एक राष्ट्रव्यापी कार्यक्रम कार्यवाहित आणण्यास प्रारंभ झाला. कांहीं कालानंतर या कार्यक्रमाची राष्ट्रीय विस्तार योजना या नांवानें व्याप्ती

समाज विकास गट: करण्यांत येऊन वाढविण्यांत आली. ग्रामीण जनतेंत उत्साह निर्मून त्यांच्यांत सामाजिक परिवर्तन घडवून आणणें, त्यांच्यांतील दारिद्र्य नष्ट करून त्यांच्या स्थीर जीवनांत चालना निर्माण करणें व विकासाची गति वाढविण्याच्या कार्यक्रमांत खेड्यांतील प्रत्येक कुटुंबाला सहभागी होण्यास प्रोत्साहन देणें हे हेतू या दोहीं कार्यक्रमांत समान आहेत. ग्रामीण जीवनाचे विविध पैलू एकमेकांत मिसळलेले असल्यानें या कार्यक्रमांत अन्न व शेती उत्पादनांत वाढ करणें, शिक्षण प्रसार, आरोग्य व ग्रामीण आरोग्यावस्था आणि नवीन कसबें आणि उद्योग यांचा प्रारंभ करणें या गोष्टींचा समावेश आहे.

१९५८ पर्यंत या कार्यक्रमाची तीन पायऱ्यांत विभागणी करण्यांत आली होती—राष्ट्रीय विस्तार गट, समूह विकास गट व जोमदारोत्तर कार्यक्रम गट. पहिल्या अवस्थेंत सरकारी व बिनसरकारी पायाभूत विस्तार संघटना व विकास कार्यासाठीं जरूरीपुरती आर्थिक तरतूद यांची व्यवस्था करण्यांत येई. ज्या गटांची प्रशंसनीय प्रगति आढळून येई अशांची निवड दुसऱ्या अवस्थेच्या गटासाठी होई. याचा काल तीन वर्षांचा असे. त्या काळांत विकास कार्यासाठीं जादा आर्थिक मदत व कर्मचाऱ्यांची तरतूद होई. ही अवस्था पूर्ण झाल्यावर अंतिम अवस्था येई. त्यासाठीं कायमस्वरूपाची पायाभूत संघटना तयार करण्यांत येई.

परंतु, बलवंतराय मेहता कमिटीच्या शिफारशीप्रमाणें १ एप्रिल १९५८ पासून भारत सरकारनें या तीन अवस्था रद्द करण्याचें ठरविलें व त्याजागीं प्रथमावस्था व द्वितीयावस्था अशी नवी विभागणी लागू केली. ती व्यवस्था मान्य झाली. प्रथमावस्थेच्या अगोदर विस्तारपूर्व अवस्था ठेवण्यांत आली. ह्या अवस्थांचा

कार्यक्रमहि निश्चित करण्यांत आला. विस्तारपूर्व अवस्थेंत जनतेंत विकासाचें मानस निर्माण करून त्यासाठीं पायाभूत संघटना उभारणें, प्रथमावस्थेंत विकासाचा जोमदार कार्यक्रम आखून तो राबविणें व द्वितीयावस्थेंत विकासकार्याची गति कायम ठेवणें असा कार्यक्रम आखण्यांत आला.

ग्रामीण विकासाची एक प्रभावी कार्यप्रणाली म्हणून समाज विकास योजनेकडे पाहण्यांत येते. त्यायोगें योजनेच्या अंमलबजावणीस मदत होते.

ग्रामीण विकास साधण्यासाठीं वेगवेगळ्या अवस्थेचे विकास गट जिल्ह्यांत सर्वत्र स्थापण्यांत आले असून १०० टक्के भाग ह्या कार्यक्रमाखालीं आणण्यांत आला आहे.

आज रोजीं जिल्ह्यांत ४ विस्तारपूव विकास गट कार्यान्वित आहेत. ते म्हणजे कामठी, पारसिवनी, हिंगणा व उमरेड हे होत.

प्रथमावस्थेच्या अवस्थेंत करावयाच्या जोमदार विकास कार्यक्रमाची आंखणी व मनोभूमि आणि पायाभूत संघटना निर्माण करण्याचें काम ह्यावेळीं करावयाचे असतें.

ह्या विकास गटांत एक गट विकास अधिकारी व जुजबी विस्तार अधिकारी व कर्मचारी दिले गेले आहेत.

प्रथमावस्थेचे पांच विकास गट जिल्ह्यांत आहेत. ते म्हणजे नागपूर, काटोल, भिवापूर, सावनेर व रामटेक हे होत. ह्या विकास गटांत विकासाचा जोमदार कार्यक्रम घेण्यांत यतो. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी गट विकास अधिकारी व त्यांच्या जोडीस विषयवार विस्तार अधिकारी असतात. ते म्हणजे कृषि, पशुसंवर्धन, स्थापत्य, सहकार, समाजशिक्षण, कुटिरोद्योग, संख्या, आदि ह्या विषयाचे अधिकारी हे होत. लोकांच्या सहकार्यानें विकास कार्यक्रम राबविण्यांत यतो. गट व खेड ह्यामधील महत्वाचा दुवा ग्रामसेवक असतो. जनतेला निरनिराळ्या विषयावर माहिती देऊन त्यांच्याकडून प्रत्यक्ष कार्य करवून घेण्याचें काम ग्रामसेवकाला करावे लागतें. ग्रामसेवक प्रशिक्षण देऊन तयार करण्याच्या सोई जिल्ह्यांत तारसा येथें उपलब्ध आहेत.

प्रथमावस्थेचे कार्यक्रम संपवणाऱ्या विकास गटांचे द्वितीयावस्थेच्या विकास गटांत रूपांतर होते. असे विकास गट चार असून ते म्हणजे नरखेड, कळमेश्वर, मौंदा व कुही येथें असलेलें होत.

विकासाचे मानस व गति टिकवून ठेवण्याचें काम ह्या गटांमार्फत करण्यांत येतें.

विस्तारपूर्व विकास गटांची मुदत अल्पशी असून भांडवल नाममात्र असतें. प्रथमावस्थेचे व द्वितीयावस्थेचे गट प्रत्येकी पांच पांच वर्षाचे मुदतीचे असतात व त्यांना अनुक्रमें १२ लाख व ५ लाख रुपये प्रत्येकीं सरकारचा वांटा म्हणून खर्चण्यास मिळतात. त्यास जनतेची लोकवर्गणी व श्रमदान ह्यांची जोड देण्यांत येते.

गटपातळीवर मार्गदर्शन करण्यासाठीं गट सल्लागार समित्या असतात. उपविभाग अधिकारी त्यांचे अध्यक्ष असतात व गट विकास अधिकारी सचिव असतात. उपाध्यक्ष व सभासद सरकारनियुक्त असतात. आमदार व स्थानिक अधिकारी पदसिद्ध सभासद असतात. ह्या सल्लागार समितीवर पंचायत व हरिजनांनाहि प्रतिनिधित्व असते.

विकास कार्यक्रमाचे अंमलबजावणीचे कामीं गट विकास अधिकाऱ्यांना सल्ला व मार्गदर्शन देण्याचें व विकास कार्याला जनतेचें सहकार्य मिळवून देण्याचें काम समितीच्या सभासदांना करावे लागते.

वर नमद केलेल्या विकास गटांतून कृषि, पशुसंवर्धन, स्थापत्य, सहकार, समाज शिक्षण, शिक्षण, कुटिरोद्योग आदि विभागांत विविध योजना आखून पार पाडण्यांत आल्या व त्यावर बराच खर्च करण्यांत आला. त्यायोगे जनतेचें जीवनमान उंचावण्यास मदत झाली. गटवार खर्चाची व कार्याची प्रगती खालील परिच्छेदांत देण्यांत आली आहे.

खालील परिच्छेदांत नमूद केलेली लोकसंख्या १९५१ चे शिरगणतीनुसार समजावी.

हा गट २ ऑक्टोबर १९५३ रोजीं अस्तित्वांत आला. ह्यांत १७२ खेडीं असून लोकवस्ती ७९,७५४ इतकी आहे. १ जुलाई १९५९ पासून हा गट द्वितीयावस्थेंत आला. दिनांक २८ फेब्रुवारी १९६१ पर्यंत १,२६४ हजार रुपये खर्च करण्यांत आले. **नरखेड विकास गट :**

त्यांत १,२०,००० रुपये लोकवर्गणी श्रम व रोख स्वरूपांत म्हणून जमा झाले. ह्या गटांत खालील कामें प्रामुख्यानें करण्यांत आली आहेत : १ प्राथमिक आरोग्य केंद्र, १ बीजोत्पादन केंद्र, १ कृत्रिम रेत उपकेंद्र, १ की व्हीलेज स्कीम, १ कुक्कुटपालन केंद्र व १ कुंभार काम प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यांत आले आहेत. ७,०८३ कंपोस्ट खड्डे खणण्यांत आले. १७,२१३ बंगाली मण खतें वाटण्यांत आली. १०,६९१ बंगाली मण बियाणें वाटण्यांत आले. ८ वळू पुरविण्यांत आले. ७,९४१ एकर जमीन लागवडी खाली आणून ६,६२० एकर जमिनीस पाणीपुरवठा करण्यांत आला. २,८८४ शोषखड्डे, २१४ संडास, ६,७२१ यार्ड नाली व १६ पाणी पिण्याच्या विहिरी बांधण्यांत आल्या. ३६ विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या. ७ शाळांचे मुलोद्योगी शाळांत रूपांतर करण्यांत येऊन १९ शाळा नव्याने बांधण्यांत आल्या. ९१४ प्रौढ साक्षर करण्यांत आले. २३ लोकांना धंदेशिक्षण देऊन कामास लावले. ८२ शेतकरी संघटना, १७ महिला मंडळे, ५५ तरुण मंडळें संघटित करण्यांत आली.

कळमेश्वर विकास गट :

हा गट २ आक्टोबर १९५३ रोजीं अस्तित्वांत आला. ह्यांत १२१ खेडीं असून लोकवस्ती ७९,८३६ इतकी आहे. १ एप्रिल १९५८ पासून हा गट द्वितीयावस्थेंत आहे. ह्याचें क्षेत्रफळ २१८ चौ. मैल आहे. दिनांक ३१ डिसेंबर १९६० पर्यंत २,७७० हजार रुपये खर्च करण्यांत आले असून त्यांत ४,३७,५७९ रुपये लोकवर्गणी श्रम व रोख स्वरूपांत म्हणून जमा झाले. ह्या गटांत खालील कामें प्रामुख्याने करण्यांत आली आहेत : १ बीजोत्पादन केंद्र, १ प्राथमिक आरोग्य केंद्र, १ कुटुंबनियोजन केंद्र, १ कृत्रिम रेत उपकेंद्र उघडण्यांत आले. १ माहिती केंद्र सुरू केले. २,५४८ कंपोस्ट खताचे खड्डे खणण्यांत आले. २४,४७३ बंगाली मण खतें, ५,९८३ बंगाली मण बियाणें वाटण्यांत आले. ९२ कोंबडया पुरविण्यांत आल्या. ६१,८५१ जनावरांना लस टोचून १,२३० बैल खच्ची केले. ३१२ एकर जमीन लागवडीखाली आणून ४,३९४ एकर जमीनीला नव्याने पाणीपुरवठा करण्यांत आला. १,९३५ शोषखड्डे, ११२ शौचकुपें, ३,९६४ यार्ड नाली, ५३ फर्लांग रस्ते, ४४ पिण्याच्या पाण्याच्या विहिरींचें बांधकाम, ८० विहिरींची दुरुस्ती, ११ शाळांचे मुलोद्योगी शाळांत रूपांतर, १९ शाळांचे नव्यानें बांधकाम करण्यांत आले. १,३७९ प्रौढ साक्षर करण्यांत आले. १०७ लोकांना धंदेशिक्षण देण्यांत आलें. ४४ शेतकरी संघटना, १४ महिला मंडळे, १७ तरुण मंडळें संघटित करण्यांत आलीं. ३,५८१ एकर जमीन नव्याने बागायतीखाली आणली गेली.

मौदा विकास गट :

हा गट २ आक्टोबर १९५३ रोजीं अस्तित्वांत आला. ह्यांत १३० खेडीं असून लोकवस्ती ४६,६६४ इतकी आहे. ह्याचें क्षेत्रफळ २४६ चौरस मैल आहे. दिनांक १ जुलाई १९५९ पासून द्वितीयावस्थेंत आहे. दिनांक ३१ डिसेंबर १९६० पर्यंत १,३२२ हजार रुपये खर्च करण्यांत आले असून त्यांत सुमारे १,२०,००० रुपये लोकवर्गणी श्रम व रोख स्वरूपांत मिळाली आहे. ह्या गटांत खालील कामें प्रामुख्यानें करण्यांत आली आहेत : १ मौदा गांवीं ३०,००० रुपये खर्चून पाणीपुरवठ्याची व्यवस्था, १ बीजोत्पादन केंद्र, १ प्राथमिक आरोग्य केंद्र, १ कृत्रिम रेत उपकेंद्र, १ सुतार काम व १ लोहार काम प्रशिक्षण शाळा, १ माहिती केंद्र, आदी उघडण्यांत आले. १ गोडाऊन बांधले. ४,१९१ कंपोस्ट खड्डे खणण्यांत आले. १२,००० बंगाली मण बी वाटण्यांत आले. १४,९६३ बंगाली मण खतें वाटण्यांत आली. ३,२०० एकर जमिनीस नव्यानें सिंचाई करण्यांत आली. २०५ नव्या विहिरींचें बांधकाम व २३ विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली. ग्रामनेता शिबिरें भरविण्यांत आली. ३ वळू पुरविण्यांत आले. २ तलावांत मासळीचे बीं सोडण्यांत आले. ७६ आदर्श पिण्याच्या पाण्याच्या विहिरी करण्यांत आल्या. १६ मैल लांबीचे रस्ते बांधले. १२४ खेडी सहकारी सोसायटयांच्या कार्यक्षेत्रांत आणली. १८ शाळा बांधल्या. ७४० प्रौढ साक्षर केले. ८ आखाडे, ७ महिला मंडळें, ६ बालोद्याने, १७ भजनी मंडळे, २८ युवक मंडळें संघटित करण्यांत आली. ५ गांवाना रेडियो पुरविले, १० वाचनालयें काढली.

कुही विकास गट :

हा गट १ एप्रिल १९५४ रोजीं अस्तित्वांत आला. ह्याचें क्षेत्रफळ २९५ चौरस मैल व १८३ खेडीं असून लोकवस्ती ५८,४३४ इतकी आहे. १ एप्रिल १९५९ पासून हा गट द्वितीयावस्थेंत आहे. दिनांक २८ फेब्रुवारी १९६१ पर्यंत १,१२९ हजार

रुपये खर्च करण्यांत आले. त्यांत २,६१,३५७ रुपये श्रम व रोख स्वरूपांत लोकवर्गणी म्हणून जमा झाले. ह्या गटांत खालील कामें प्रामुख्याने करण्यांत आली आहेत : १ सुतार काम प्रशिक्षण केंद्र, १ बीजोत्पादन केंद्र, १ प्राथमिक आरोग्य केंद्र, १ कृत्रिम रेत उपकेंद्र सुरू करण्यांत आले. ३,६६५ कंपोस्ट खड्डे खणण्यांत आले. १३,९५४ बंगाली मण खते वाटण्यांत आली. ६,६४० बंगाली मण सुधारलेले बियाणें वाटली. २८० एकर जमीन फळ बागायतीखाली आणण्यांत आली. २,२९८ एकर जमीन लागवडीखाली आणण्यांत येऊन ३,३१६ एकर जमीन पाणीपुरवठ्याखाली आणण्यांत आली. २,८६५ शोषखड्डे, १०,४०४ यार्ड नाली, ३५६ संडास, १२१ विहिरी बांधणे व ८२ विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या. १ शाळा मुलोद्योगाखाली आणून ३३ शाळा बांधल्या गेल्या. १,७२५ प्रौढ साक्षर करण्यात आले. ३१७ फर्लांग कच्चे रस्ते बांधण्यांत आले. ७१ लोकांना धंद्याचें शिक्षण देण्यांत आलें. १०० टक्के खेड्यांत पंचायती स्थापण्यांत आल्या. ९५ शेतकरी संघटना, ४० महिला मंडळें, ३९ तरुण संघटना स्थापन करण्यांत आल्या.

नागपूर विकास गट :

हा गट २ आक्टोबर १९५६ रोजीं सुरू झाला. ह्याचें क्षेत्रफळ २११ चौरस मैल असून १५१ खेडीं आहेत. लोकवस्ती ३९,४८८ इतकी आहे. २ आक्टोबर १९५६ पासून हा गट प्रथमावस्थेंत आहे. ३१ डिसेंबर १९६० पर्यंत ६७९ हजार रुपये खर्च करण्यांत आले, त्यांत ७४,४०४ रुपये श्रम व रोख-रीत्या लोकवर्गणी म्हणून गोळा करण्यांत आले. ह्या गटांत खालील कामें प्रामुख्यानें करण्यांत आली आहेत : १ बीजोत्पादन केंद्र, १ टेलरिंग प्रशिक्षण केंद्र, १ बाहुल्या तयार करण्याचें प्रशिक्षण केंद्र उघडण्यांत आले. ६३४ कंपोस्ट खड्डे खणण्यांत आले. ५,७५४ बंगाली मण खतें वाटण्यांत आली. ४,८४४ बंगाली मण बियाणें वाटण्यांत आली. १ वळू पुरविण्यांत आला. ३,६८८ एकर जमीन बांध बाधून लागवडीखालीं आणली गेली. १,१३८ एकर जमिनीस पाणीपुरवठा करण्यांत आला. ५६६ शोषखड्डे, ७ संडास, ७१ यार्ड नाली, १४ पिण्याच्या पाण्याच्या विहिरीचें बांधकाम, २६ विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली. ६ शाळा बांधण्यांत येऊन ६ शाळांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. ३७५ प्रौढ साक्षर करण्यांत आले. ६७ शतकरी संघटना, २३ महिला मंडळें व ४५ तरुण मंडळें संघटित करण्यांत आली. ५१ सेवा-सहकारी संस्था स्थापण्यांत आल्या. २ बहुउद्देशी व ३ औद्योगिक संस्था संघटीत करण्यांत आल्या असून १ शेतकी सहकारी संस्था चालू केली.

काटोल विकास गट :

हा गट १ एप्रिल १९५७ रोजीं सुरू झाला. ह्यांत १९० खेडीं असून लोकवस्ती ७२,८२३ इतकी आहे. हा गट प्रथमावस्थेंत १ एप्रिल १९५८ रोजीं आला. ह्याचें क्षेत्रफळ ३४८ चौरस मैल आहे. ३१ डिसेंबर १९६० पर्यंत ६५२ हजार रुपये खर्च करण्यांत आले. त्यांत ११६ हजार रुपये लोकवर्गणी श्रम व रोखरीत्या म्हणून गोळा करण्यांत आले. ह्या गटांत खालील कामें प्रामुख्यानें झाली आहेत : १ बीजोत्पादन केंद्र व १ की व्हीलेज स्किम उघडण्यांत आली. ३०० एकर जमिनीस बांध घालण्यांत आले. ह्या काळांत ८६१ कंपोस्ट खड्डे खणण्यांत आले. ६,२२६ बंगाली मण खतें, ४,५७८ बंगाली मण सुधारलेलें बीं वाटण्यांत आले. ७ वळू पुरविण्यांत आले. ९५५ बैलांचें खच्चीकरण करण्यांत आलें. ९३२ एकर जमीन लागवडीखाली आणण्यांत येऊन ५९० एकर जमिनीस पाणीपुरवठ्याच्या सोयी उपलब्ध करून देण्यांत आल्या. ८७३ शोषखड्डे, १३६ शौचकुपें, २९० यार्ड नाली, ४४ पिण्याच्या पाण्याच्या विहिरींचे बांधकाम, १२० विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली. ११ शाळा बांधण्यांत येऊन १६५ प्रौढ साक्षर करण्यांत आले. ४९ फर्लांग रस्ते तयार झाले. ८७ लोकांना धंदेशिक्षण देण्यांत आलें. २९ शेतकरी संघटना, १७ महिला मंडळे व १८ तरुण मंडळें संघटित करण्यांत आली आहेत.

भिवापूर विकास गट :

हा गट १ एप्रिल १९५८ रोजीं सुरू झाला असून प्रथमावस्थेंत आहे. ह्यांत १४७ खेडीं असून लोक-संख्या ४७,०९१ आहे. ह्याचें क्षेत्रफळ २४० चौरस मैल आहे. ३१ डिसेंबर १९६० पर्यंत ६२१ हजार रुपये खर्च करण्यात आले असून त्यांत १६७ हजार रुपये श्रम व रोखरीत्या लोकवर्गणी म्हणून गोळा करण्यांत आले. ह्या गटांत खालील कामें प्रामुख्यानें करण्यात आली आहेत: १ बिजेरी उपकरणें तयार करण्याचे

प्रशिक्षण केंद्र, १ चर्मोद्योग प्रशिक्षण केंद्र, १ बीजोत्पादन केंद्र, १ प्राथमिक आरोग्य केंद्र, १ कृत्रिम रेत उपकेंद्र उघडण्यांत आले. ६२५ कंपोस्ट खताचे खडडे खणण्यांत आले. १०,८२७ बंगाली मण खतें, १,३०६ बंगाली मण बियाणें वाटण्यांत आले. १ वळ पुरविण्यांत आला. ७७१ एकर जमिनीस बांध घालून लागवडीखाली आणण्यांत आली असून ७८९ एकर जमिनीस नव्यानें सिंचाई करण्यात आली. १,०३६ शोषखडडे, ५२ शौचकुपें, ४,५३५ यार्ड नाली, ५५ पिण्याच्या पाण्याच्या विहिरींचे बांधकाम, ६९ विहिरींची दुरुस्ती, १८ शाळांचें बांधकाम करण्यांत आलें. ४४२ प्रौढ साक्षर करण्यांत आले. ४९ शेतकरी संघटना, २४ महिला मंडळे व २० तरुण मंडळे संघटित करण्यांत आली. ३ शाळांचे मुलोद्योगी शाळांत रूपांतर करण्यांत आलें. ३३२ फर्लांग रस्ते बांधण्यांत आले. विविध शिबिरें घेण्यांत आलीं. ७५ लोकांना धंदेशिक्षण देण्यांत आले.

सावनेर विकास गट : हा गट १ एप्रिल १९५७ रोजीं सुरू झाला. ह्यांत १२१ खेडीं असून लोकवस्ती ६७,८९९ इतकी आहे. याचें क्षेत्रफळ ३२५ चौरस मैल आहे. हा गट १ एप्रिल १९५८ पासून प्रथमावस्थेंत आला. ३१ डिसेंबर १९६० पर्यंत ६७८ हजार रुपये खर्च करण्यांत आले असून त्यांत १३७ हजार रुपये श्रम व रोखरित्या लोकवर्गणी म्हणून गोळा करण्यांत आले. ह्या गटांत खालील कामें प्रामुख्याने करण्यांत आलीं: १ सुतारकाम, १ शिवणकाम, १ रंगकाम प्रशिक्षण केंद्र चालविण्यांत आले. १ बीजोत्पादन केंद्र, बडेगांव येथें १ प्राथमिक आरोग्य केंद्र व सावनेर येथें १ आरोग्य प्रात्यक्षिक केंद्र, १ कुटुंबनियोजन केंद्र व १ क्षयरोग प्रतिबंध केंद्र, १ कृत्रिम रेत उपकेंद्र उघडण्यांत आले. १,८४८ कंपोस्ट खताचे खड्डे खणण्यांत आले. ५,५७८ बंगाली मण खतें, ४,०७५ बंगाली मण सुधारलेलें बियाणें वाटण्यांत आलें. १५ वळू पुरविण्यांत आले. २१९ एकर जमिनीस बांध घालून लागवडीखाली आणण्यांत आली तर १,०५९ एकर जमिनीस नव्याने सिंचाई करण्यांत आली. १,०४४ शोषखड्डे, ५६ शौचकुपें, १,१८८ यार्ड नाली, ४२ फर्लांग रस्ते, ९ शाळांचें बांधकाम, २० पिण्याच्या पाण्याच्या विहिरींचे बांधकाम व ३७ विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली. २०२ प्रौढ साक्षर करण्यांत आले. ६९ शेतकरी संघटना, ५९ महिला मंडळें व ७६ तरुण मंडळें संघटित करण्यांत आली. बागायती विकासासाठीं विशेष प्रयत्न करण्यांत आले व त्याखाली ९३४ एकर जमीन आणली.

रामटेक विकास गट : हा गट १ एप्रिल १९५९ रोजीं अस्तित्वांत आला. ह्यांत १४४ खेडीं असून लोकवस्ती ५३,०८३ इतकी आहे. १ एप्रिल १९६० पासून हा गट प्रथमावस्थेंत आला. विविध प्रकारची विकासाची कामें हातीं घेण्यांत आली असून तीं प्रगतीपथावर आहेत. रुपये ७३,००० आतांपर्यंत खर्च करण्यांत आले. श्रम व रोख स्वरूपांत लोकवर्गणी १९,१७५ रुपये जमा झाली. ह्यांत ३५७ कंपोस्ट खड्डे खणण्यांत येऊन ५०६ बंगाली मण बियाणें वाटण्यांत आलीं. १९८ एकर जमीन लागवडीखाली आणून १४० एकर जमिनीस पाणी पुरवठा करण्यांत आला. ९० शोषखड्डे खणण्यांत आले असून २ विहिरी बांधल्या व १३ दुरुस्त करण्यांत आल्या. १० शेतकरी संघटना स्थापण्यांत आल्या व ४ तरुण मंडळें संघटित करण्यांत आलीं.


कामठी विकास गट : हा गट १ एप्रिल १९६० रोजीं अस्तित्वांत आला. ह्यांत ८१ खेडीं असून लोकवस्ती ३३,४६४ इतकी आहे. हा गट विस्तारपूर्व अवस्थेंत असून विकास कार्यासाठी आवश्यक संघटना बांधण्याचें काम प्रगतीपथावर आहे.

पारासिवनी विकास गट : हा गट १ एप्रिल १९६० रोजीं अस्तित्वांत आला. ह्यांत १२२ खेडीं असून लोकसंख्या ४७,५४६ इतकी आहे. हा गट विस्तारपूर्व अवस्थेंत असून विकास कार्यासाठी आवश्यक संघटना बांधण्याचें काम प्रगतीपथावर आहे.

हिंगणा विकास गट : हा गट २ आक्टोबर १९५९ रोजीं अस्तित्वांत आला. ह्यांत १६० खेडीं असून लोकसंख्या ४३,६२६ इतकी आहे. हा गट विस्तारपूर्व अवस्थेंत असून विकास कार्यासाठी आवश्यक संघटना बांधण्याचें काम प्रगतीपथावर आहे.


नकाशा

नागपूर जिल्हा



डोंगर

जलाशय


पिकें व फळें
नागपूर जिल्हा
नीळ
कापूस
संतरा
जवस
आंबे संतरा
तूर
उडीद
संतरा
ज्वारी
खुरसापार
संतरा
संतरा
तूर
ऊस
संतरा
खाण्याची पानें
रामटेक
केळी
ज्वारी
तूर
उडीद
दहेगांव
संतरा
आंबे
कापूस
गहूं
सतीघाट
पिंडराबोरी
प्रगतीपथावरील सिंचाई योजना
सिंचाई योजना

उमरेड विकास गट :

हा गट १ एप्रिल १९६० रोजीं अस्तित्वांत आला. ह्यांत १६२ खेडीं असून लोकसंख्या ४५,२७७ इतकी आहे. हा गट विस्तारपूर्व अवस्थेंत असून विकास कार्यासाठी आवश्यक संघटना बांधण्याचें काम प्रगतीपथावर आहे.

ह्या विकास गटांतून जनतेच्या सहकार्यानें मोठ्या प्रमाणांत नवनिर्माणाचें कार्य चालू आहे. त्याखेरीज विकासकामाचे अंमलबजावणीचें कामीं भारत सेवक समाज, खादी व ग्रामोद्योग मंडळ, विविध समाज कल्याण संस्था मदत करतात. त्यामुळें जिल्ह्याचें स्वरूप दिनप्रतिदिनीं बदलत आहे.

शांतता व सुव्यवस्था.

जिल्ह्यांत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी खालील ठिकाणीं पोलिस कचेऱ्या व ठाणीं आहेत :––

नागपूर विभागाची पोलीस खात्याची मुख्य कचेरी नागपूर येथे आहे. तसेच जिल्ह्याची मुख्य पोलिस कचेरी नागपूर येथे आहे. उप-मुख्य कार्यालयें रामटेक, उमरेड, काटोल व सावनेर येथें आहेत.

पोलिस ठाणीं खालील ठिकाणीं आहेत :––

नागपूर तहसील.––कामठी, बोरी, हिंगणा व सोनेगांव.

उमरेड तहसील.––भिवापूर, कुही, वेलसूर व सिर्सी.

रामटेक तहसील.––देवलापार, पारशिवनी व मौदा.

सावनेर तहसील.––कळमेश्वर, खापा व केळवद.

काटोल तहसील.––नरखेड, जलालखेडा व कोंढाळी.

न्यायदान :

सुसंघटित, कार्यक्षम व स्वतंत्र असें न्यायखातें हे लोकशाहीस पोषक आहे. भारतीय संघ राज्यासारख्या फेडरल स्वरूपाच्या राज्य व्यवस्थेंत हें खातें राज्य घटनेचे रक्षक म्हणूनहि कार्य करतें. भारत तील न्याय-खात्यांत सर्वोच्चपदीं सुप्रीम कोर्ट आहे. राज्य घटनेंत प्रत्येक राज्यासाठीं हायकोर्टाची तरतूद केलेली आहे. हायकोर्ट हें राज्यांतील सर्वोच्च्य न्यायमंडळ आहे. हायकोर्टास मूळ अर्जाचा तसेच अपिलाचाहि विचार करण्याचा अधिकार आहे. तसेच रिट काढणें, राज्यांतील सर्व कोर्टांवर व न्यायमंडळावर देखरेख ठेवणें आणि राज्य घटनेचा अर्थ लावणे आदि कामें हायकोर्टास करावी लागतात. हायकोर्टाचे स्वातंत्र्य अबाधित रहावे म्हणून प्रत्येक हायकोर्टाचा नोकरवर्ग नेमणें, तसेच त्यांच्या नोकरीसंबंधींच्या परिस्थितीसंबंधी नियम तयार करणें ह्याबाबतचा अधिकार मुख्य न्यायाधिशांचा, अगर ते सांगतील त्या न्यायाधिशांचा अगर कोर्टाच्या अधिकाऱ्यांचा आहे.

महाराष्ट्र हायकोर्टाचे एक कायम बेंच नागपूर येथे असून ह्या बेंचमध्यें कमींत कमी तीन न्यायाधीश असतात. ह्या बेंचला बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, चांदा आणि राजुरा ह्या जिल्ह्यांत उद्‌भवलेल्या प्रकरणांच्या बाबतींत हायकोर्टाचे अधिकार आहेत. या जिल्ह्यांत उद्‌भवलेल्या एखाद्या प्रकरणाची सुनावणी मुख्य न्यायाधिशांनीं, तसा हुकूम केला तर, मुंबईतहि होऊं शकेल.

स्वतंत्र न्यायखातें हे महाराष्ट्र राज्याचें एक वैशिष्टय आहे. दिवाणी प्रकरणांतील न्यायदानाच्या बाबतींत न्यायखातें व अंमलबजावणी खातें ह्यांची कामें कधींहि एकमेकांत गुंतली नव्हती. फौजदारी प्रकरणांतील न्यायदानाच्या बाबतींत, ढोबळ मानानें, दोन प्रकारचे मॅजिस्ट्रेट आहेत. ते म्हणजे ज्युडिशिएल

मॅजिस्ट्रेट आणि एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट. पहिल्या वर्गांतले मॅजिस्ट्रेट म्हणजे जिल्हा व सेशन्स जज्ज व त्यांचे इतर मदनीस, तसेच तालुका निहाय न्यायाधीश नेहमीची न्यायदानाचीं कामें पाहतात, तर दुसऱ्या वर्गांतील मॅजिस्ट्रेट कायदा व सुव्यवस्था राखण्यापुरताच आपल्या अधिकारांचा वापर करतात. हायकोर्टाला राज्य घटनेप्रमाणें सिव्हिल जज्जांच्या बाबतींत जे अधिकार आहेत तेंच ज्युडिशिएल मॅजिस्ट्रेटच्या-बाबतींत आहेत.

न्यायपंचायती :

ग्रामपंचायतींच्या कारभाराचें एक महत्त्वाचें वैशिष्ट्य म्हणजे पांच अगर अधिक गांवांसाठी न्यायपंचायती अगर न्यायमंडळें स्थापन करणें आणि त्यांना न्यायदानाचे अधिकार देणें हें होय. सुरवातीला, न्यायपंचायतींना छोट्या गुन्ह्यांबाबतचे खटले चालविण्याचे व सामान्य स्वरूपाचे तंटे मिटविण्याचे अधिकार देण्यांत येतात. मात्र, पंचायतींना जसजसा ह्याबाबत अनुभव मिळेल तसतसे त्यांना अधिक व्यापक अधिकार देण्याबाबत तरतूद करण्यांत आली आहे. अगदी साधे तंटे सोडविण्यासाठी सुद्धां गांवकऱ्यांना तालुक्याच्या ठिकाणीं असलेल्या मॅजिस्ट्रेट अगर सिव्हिल जज्जच्या कोर्टांत जाण्यासाठीं खूप दूरवर जावें लागते, हें सर्वांना माहीत आहेच. शिवाय तंटा मामुली असला व वस्तुस्थिति स्पष्ट असली तरी कोर्टातील कामाची पद्धत गुंतागुंतीची व दीर्घसूत्री असते. न्यायपंचायती स्थापन झाल्यामुळें ह्या अडचणी दूर झालेल्या आहेत. आतां पंचांमुळें गांवकऱ्यांच्या समक्ष खटला चालविण्यांत येतो आणि सर्वसाधारणपणें गांवकऱ्यांना वस्तुस्थिति माहित असल्यानें स्वस्त व सोप्या रीतीनें न्याय मिळू लागला आहे.

एवंच लोकांचे समाधान हीच लोकशाही शासनाची खरी कसोटी मानून त्या दिशेनें ती शासनव्यवस्था कार्यक्षम करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न चालू आहेत. शासनांत जनतेला मोठ्या प्रमाणावर भागीदार करण्यासाठी सत्तेचे विकेन्द्रीकरण कोणत्या रीतीने करावे ह्याचा विचार करण्यासाठी राज्य सरकारनें नेमलेल्या मंडळाचा अहवाल सरकारचे विचाराधीन आहे. त्यांतून आणखी कार्यक्षम अशा लोकशाही शासनव्यवस्थेची उत्क्रांति होईल.

शासनाचें भवितव्य, सत्तेचें विकेन्द्रिकरण व पंचायत राज्य :

महाराष्ट्र राज्यांतील जिल्ह्यांत वेग वेगळ्या स्थानिक संस्थांतर्फे आणि विकास गटातर्फे जे ग्रामीण विकासाचें कार्य चालू आहे त्यांत एकसुत्रता आणण्यासाठी आणि तें कार्य अधिकाधिक लोकानुवर्ति होण्याचे दृष्ठीनें जिल्हा पातळीवरील या सर्व विकास-यंत्रणांचें एकीकरण करण्याची महत्वाची शिफारस वरील लोकानुवर्ति विकेन्द्रिकरण मंडळानें राज्य सरकारला केली आहे. मंडळाच्या अहवालांतील प्रमुख शिफारशी म्हणजे जिल्ह्यांतील स्थानिक पातळीवरच्या सर्व विकासयंत्रणा रद्द करावयांत ही होय. त्यांची जागा योग्यरित्यां भरुन काढण्यासाठी विकेन्द्रिकृत अशा भावी शासन व्यवस्थेत एक सर्वकष जिल्हा मंडळ असेल. त्यांचे मदतीस सुसूत्र अशी शासन व्यवस्था राहील. जिल्हा निहाय विकास कार्यक्रमाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार ह्या मंडळाला राहील. ज्या ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर आर्थिक बोजा, निष्णांत तांत्रिक नेतृत्व आणि विशाल संघटनेची गरज आहे अशी व्यापक कामें मात्र राज्यपातळीवर पार पाडली जातील. तसेच ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठीं ग्रामपंचायतींना महत्वाची कामगिरी पार पाडावयाची आहे. त्यासाठी त्यांना भरघोस अधिकार व अर्थपुरवठा देण्याची तरतूद करण्यात येत आहे. त्यांच्यामार्फत विकास कार्यक्रम आखून कार्यक्षमरित्या राबवून घेण्यासाठी विकास गटांतील सल्लागार समित्यांच्या बिनसरकारी सभासदांना महत्वाची कामगिरी पार पाडावयाची असल्यानें त्यांना खास प्रशिक्षण नुकतेच देण्यांत आले. सत्तेचे विकेन्द्रिकरण व पंचायत राज्याच्या स्थापनेनें ग्रामीण भागांचा कायापालट होईल.

५. अर्थव्यवस्था

आर्थिक उद्दिष्टें :

कल्याणकारी राज्याचे आर्थिक उद्दिष्ट पंचवार्षिक योजनांची पूर्णपणें व उत्साहानें अंमलबजावणी करून साध्य करण्यांत येईल. यासाठी औद्योगीकरण व जमीन सुधारणा या दोन्ही क्षेत्रांतील धोरणांत सुसूत्रता आणण्याची आवश्यकता आहे. म्हणजे त्यामुळे उत्पादनाचे आपले प्रयत्न अधिक गतिमान होतील व सर्वांना समान लाभ मिळेल. या कार्यांत अनेक समस्या व अडचणी आहेत व त्यासाठी अविरत, सर्वंकष व एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता आहे.

केवळ ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांचीच नव्हे तर कोळसा, लोखंड, आदि मालाचे उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांची महाराष्ट्राला गरज आहे. निरनिराळ्या प्रकारचा कच्चा माल महाराष्ट्रांत भरपूर प्रमाणांत उपलब्ध आहे आणि मूलभूत उद्योगधंदे निर्माण करण्यासाठीं या सामग्रीचा उपयोग करून घेण्यांत आला पाहिजे. ऊंसाच्या रसाबरोबर साखरेच्या कारखान्याची कल्पना उदयास आली पाहिजे. मूलभूत उद्योगधंद्यांच्या विकासामुळें देशाच्या अर्थव्यवस्थेंतच नव्हे तर भारताच्या सामर्थ्यांतहि महाराष्ट्र मोलाची भर घालील.

प्रादेशिक व इतर प्रकारचा असमतोलपणा दूर करून, या नवीन राज्याच्या अर्थव्यवस्थेची निर्मिति करण्याच्या प्रचंड व महान् कार्यासाठीं उद्योगपती व समाजाचे इतर थर यांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. राज्याचें औद्योगीकरण करण्यासाठी एक सर्वंकष योजना (मास्टर प्लॅन) तयार करण्यांत आली आहे. उत्पादनाची समन्वित प्रगति घडवून आणणें एवढेंच नव्हे तर त्यापासून उपलब्ध होणाऱ्या फायद्यांची मालक, कामगार व ग्राहक यांच्यांत समान वांटणी करणें हे या योजनेचें उद्दिष्ट आहे.

जमिनीच्या क्षेत्रांतहि अशीच प्रगति करण्याचें योजिलें आहे. कारण जमीन हा आपल्या उत्पादनाचा सर्वांत विस्तृत असा घटक असून, बहुसंख्य लोक तीवर आपली उपजीविका करतात. आपल्या लक्षावधि शेतकरी बांधवांच्या भवितव्यावर व जीवनावर जमीन सुधारणांमुळें महत्त्वाचे परिणाम घडून येणार असल्यानें जमीन सुधारणांच्या प्रश्नाला मानवी व आर्थिक असे दोन्ही प्रकारचें स्वरूप प्राप्त झालें आहे आणि म्हणून हा विषय सहानुभूतीनें व कल्पकतेनें हाताळण्याची आवश्यकता आहे.

दरम्यान, शहर व खेडें यांच्यांत सध्यां आढळून येणारी विषमता दूर करणें जरूर आहे. शहरांतच मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे केन्द्रित झाल्यामुळें शहर व खेडें यांच्यांत निर्माण झालेले विस्तृत अंतर अनेक समस्यांच्या निर्मितीस कारणीभूत झालें आहे. ग्रामीण जीवनाचें नागरीकरण करण्याच्या भूमिकेवरून आपल्या आर्थिक विकासाचें धोरण आधारल्यास ही विषमता दूर होऊं शकेल. ग्रामीण विभागांत राहणाऱ्या लोकांना जीवनांतील विविध सुखसोयी व विकासाची संधि प्राप्त करून दिल्यास सध्याच्या काळांतील एक प्रमुख सामाजिक संघर्ष मिटविण्यास मदत होईल व समाजाचें भावनात्मक ऐक्य प्रस्थापित होण्यासहि त्यामुळें सहाय्य होईल.

—मार्गदर्शक तत्त्वें.

शेतकी

जिल्ह्यांतील बहुसंख्य लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. जिल्ह्यांतील एकूण लोकसंख्येपैकीं ४२.९ टक्के लोक शेती व्यवसायांत गुंतले आहेत. जिल्ह्यांतील जमिनीपैकी ५३.७० टक्के जमीन प्रत्यक्ष लागवडीखाली आहे. जिल्ह्यांतील जमिनीचा उपयोग कशा रीतीने केला गेला आहे ह्याचा अभ्यास विविधरीत्या उपयोगी पडतो. किती जमीन लागवडीखाली असून आणखी किती जमीन लागवडीखाली आणतां येण्यासारखी आहे ह्याबाबत माहिती त्या अभ्यासापासून उपलब्ध होऊं शकते. त्या दृष्टीनें पाहतां जिल्ह्यांतील जमीन खालीलप्रमाणें वाटण्यांत आलेली आहे :--

(संदर्भ वर्ष १९५९-६०)

प्रकार (१)	एकरांत जमीन (२)	एकूण जमिनीशी प्रमाण (३)
(१) एकूण क्षेत्रफळ	२,४४३,०००	१०० टक्के.
(२) जंगलाखालील जमीन*	४५४,३५५	१८.५८ ,,
(३) निरुपयोगी जमीन	४१,६८६	१.७२ ,,
(४) बिगरशेतकी कारणाकरितां वापरांतील जमीन ...	१४१,३४३	५.९ ,,
(५) शेतीकरतां उपयोगी पण पडीत जमीन	१२०,८२०	४.९६ ,,
(६) झाडे व राया	१४,२०९	०.५८ ,,
(७) गवताळ भाग	२९२,५८५	११.९५ ,,
(८) सतत पडीत भाग	२३,२८३	०.९४ ,,
(९) इतर पडीत	४२,८१०	१.७६ ,,
(१०) प्रत्यक्ष लागवडीखालील भाग	१,३११,९६९	५३.७० ,,

*ग्रामीण कागदपत्रांवर आधारित म्हणून अंदाजित व तात्पुरत्या माहितीसाठी.--जंगलखात्याच्या अंदाजानुसार ही जमीन ५.६५ लाख एकर इतकी आहे. त्यांत नागपूरच्या व नझूल जंगलांचा अंतर्भाव आहे.

वरील माहितीवरून दिसून येते की जिल्ह्यांतील ५४ टक्के जमीन प्रत्यक्ष लागवडीखाली आहे. १९ टक्के जमीन जंगलाखाली आहे. ५ टक्के जमीन लागवडीस उपयोगी असूनहि पडीत आहे. त्यांत इतर पडीत जमीन मिळविल्यास ६ टक्के जमीन नव्यानें लागवडीखाली आणतां येईल.

पिकाखालील १,३११,९६९ एकर जमिनीपैकीं फक्त ६२,०१४ एकर म्हणजे ४.७ टक्के जमिनीस पाणीपुरवठ्याच्या सोई उपलब्ध आहेत. सरकारी कालव्याद्वारे सिंचित जमिनीच्या १७.४४ टक्के जमिनीस पाणीपुरवठा होतो. सिंचित जमिनीच्या ५३.२२ टक्के जमीन विहिरीच्या पाण्याखाली आहे. खाजगी मालकीच्या व इतर अशा २३७ तळ्यांखाली २२.५८ टक्के जमीन भिजते, तर इतर प्रकारच्या पाणीपुरवठ्यानें ६.४६ टक्के जमिनीची सिंचाई होते.

शेतकी उत्पन्न

पिकांखालील एकूण क्षेत्राशी टक्केवारी :

अन्नपिकें व इतर पिकें यांखालील क्षेत्राचे परस्पराशीं प्रमाण ७३ : २३ असे आहे. अन्न पिकांखालील व इतर पिकांखालील जमिनीचें एकूण जमिनीशी प्रमाण पुढीलप्रमाणे आहे :—

पीक	१९५६-५७	१९५७-५८	१९५८-५९
तांदूळ	३.६	३.७	३.७३
गहूं	१५.५	१३.९	१२.५७
ज्वारी	४१.१	४१.५	४४.५८
डाळीं, वगैरे	१५.५	१५.८	१९.६८
एकूण प्रमुख अन्नधान्य	७५.७	७४.९	८०.५६
गळीताचीं धान्ये	८.५	९.०	७.८७
कापूस	१२.५	१२.५	१२.४९
इतर	३.३	३.५	...
एकूण बिगर अन्न पिकें	२४.३	२५.००	१९.४४
पिकाखालील एकूण क्षेत्र ...	१००.००	१००.००	१००.००

पीकें :

ज्वारी, कापूस व गहूं ही येथील मुख्य पीकें असली तरी तांदुळाचेंहि पीक बरेच निघते. ते रामटेक व उमरेड भागांत विशेष असते.

नागपूर जिल्हा संत्र्यासाठी प्रसिद्ध आहे. काटोल, सावनेर व नागपूर ह्या तालुक्यांत संत्रीं मोठ्या प्रमाणांत होतात. येथून संत्रीं मोठ्या प्रमाणांत भारतांतील सर्व भागांत पाठविण्यांत येतात. संत्र्यापासून विविध जिन्नस तयार करून तेहि बाहेरच्या बाजारपेठांत विक्रीसाठीं पाठविण्यांत येतात.

उमरेड भाग विशेषतः मिरचीसाठी प्रसिद्ध आहे. नागपूर, सावनेर व काटोल ह्या भागांत कापूस उत्तम होतो.

जिल्ह्यांतील प्रमुख पिकांचे जमीनवार प्रमाण खाली दिले आहे :—

पीकें	क्षेत्र (एकर)	उत्पन्न (टन)
कापूस	१,९६,२४८	७६,३७१ गासड्या *
ज्वारी (खरीप)	४५८,१४९	९०,३८३
भुईमूग	१०,४६०	५,२६७
मिरची	३४,३१४	२,८५४
गहूं	१८९,०६१	३०,३३९
हरबरा	२५,५६८	४,४४९
तूर	११७,४९०	१४,८८०
ज्वारी (रबी)	९०,०००	२२,६४७

*१ गासडींत ३९२ पौंड कापूस असतो.

जमीन सुधारणा

जमिनीच्या तुकड्यांचे एकत्रीकरण :

जमिनीच्या तुकड्यांचे एकत्रीकरण करण्यासाठीं कायद्याने तरतूद करण्यांत आली आहे. ज्या खेड्यांतील ⅔ किंवा अधिक वहिवाटदार तुकडे जोडण्यासाठीं अर्ज करतील अशा खेड्यांत ही योजना घेण्यांत येते. हे कार्य १ एप्रिल १९५९ पासून सुरूं झाले. २८ फेब्रुवारी १९६१ पर्यंत जिल्ह्यांतील ३० खेड्यांत २९,३१० एकर जमिनीचे एकत्रीकरण करण्यांत आले असून १३ खेड्यांतील १४,४७३ एकर जमिनीच्या एकत्रीकरणाचें काम प्रगतीपथावर आहे.

ह्या योजना ज्या खेड्यांत पूर्ण झाल्या तेथील पाहणीवरून शेतकी व सामाजिक संबंधांत बरीच सुधारणा झाल्याचें आढळून आले आहे. जमिनीमधून जाण्यायेण्याच्या प्रश्नावरून पूर्वीं होणाऱ्या कलहाचें प्रमाण घटलें असून सलग जमिनीचे परिणाम पीक उत्पादनाच्या वाढींत झाले आहेत.

हे कार्य करण्यासाठीं जिल्ह्यांत दोन डिव्हिजन काम करीत आहेत. तीन संयुक्त शेती संस्थाहि जिल्ह्यांत कार्य करीत आहेत.

भूमिहीनांना जमीन :

सरकारने हातीं घेतलेलें दुसरें एक अतिशय महत्वाचें कार्य म्हणजे सरकारी पडित जमीनीचें भूमिहीनांना वाटप हें होय. हें कार्य द्रुतगतीनें पार पाडण्याचे दृष्टीनें जमिनी देण्याबाबतची कार्यपद्धति अतिशय सोपीं करण्यांत आली असून जिल्ह्यांत गरजूंना ५,५२९.६२ एकर जमीन वाटण्यांत आली. त्याखेरीज ज्यांना जमिनी मिळाल्या त्यांना जमीन लागवडीयोग्य करण्यासाठीं बैल, अवजारें, रासायनिक खतें खरेदी करण्याकरितां आर्थिक सवलती व कर्जे देण्यांत आलीं आहेत.

कसणारांची जमीन :

लागवडीखाली असलेल्या जमिनीच्या ५३.३ टक्के जमीन ९० टक्के जमीनधारकांच्या ताब्यांत असून त्यापैकीं प्रत्येकाच्या वाटचाला १ एकरापासून २० एकर जमीन येते. त्यांतील ७५ टक्के जमीनधारकांच्या वाटचास १० एकराचे खाली क्षेत्र आहे. २० ते ५० एकर जमिनीचे धारक १०,३९९ इतके असून ५० ते १०० एकर जमीन असणारे २,०१९ लोक आहेत. ४८४ लोकांकडे १०० ते २०० एकर जमीन आहे. २०० ते ५०० एकरांचे धारक १४८ आहेत. ५०० ते १,००० एकर जमीन बाळगणारे १९ असून १,००० चे वर एकर जमीन बाळगणारे लोक १२ आहेत. आर्थिक धारणा क्षेत्र १० ते २० एकर असून ह्या प्रकारांत १५.१ टक्केच जमीनधारक मोडतात. ते २३.२ टक्के जमीन बाळगून आहेत.

जमीनीचा कसवटा :

लोकसंख्येच्या ४२.९ टक्के लोक शेती व्यवसाय करतात. त्यापैकीं २४.२ टक्के लोक स्वतःची शेती स्वतः कसणारे आहेत, तर २.६ टक्के लोक स्वतःची व इतरांची शेती कसतात. लोकसंख्येच्या १४.५ टक्के लोक शेतमजूर असून १.६ टक्के लोक शेती वगैरे न कसतां केवळ शेतीचा खंड वसूल करून राहतात.

खऱ्या अर्थानें शेतीचा विकास व्हायचा असेल तर 'कसेल त्याची जमीन' हें राज्यांतील सर्व जमीन सुधारणांचे उद्‌घोषित उद्दिष्ट साध्य करण्याचे दृष्टीने टाकण्यांत आलेले प्रत्यक्ष पाऊल होय.

क्रमाक्रमानें सर्व मध्यस्थांचे उच्चाटण करून जमीन कसणाराला जमिनीचा कब्जेदार बनविण्याचें धोरणानुसार एक कार्यक्रम आखून खास यंत्रणेमार्फत तो अमलांत आणण्यांत येईल. तसेच जमीन मालकीची कमाल मर्यादा ठरविण्यांत येईल.

सिंचाईच्या योजना

विहिरी व तळीं :

जमीन सुधारणा कार्यक्रमाखालीं पाणीपुरवठ्याच्या छोट्या योजनांमध्यें सार्वजनिक बांधकाम खात्याकडून अमलांत आणण्यांत येणाऱ्या लहान पाटबंधाऱ्यांच्या योजना, शेतकी खात्याकडून अंमलांत येणाऱ्या विहिरी, तळीं, रहाट इत्यादि बाबतच्या योजना यांचा समावेश होतो. ह्या योजनेखाली १९५१—५६

पर्यंत तगाईवर ६,३६,१०४ रुपये देऊन १,०२१ विहिरीचे काम करण्यांत आले व ३,०६३ एकर जमीनीस सिंचाई केली, तर १५,३१,३२० रुपये तगाई रुपानें देऊन ८३२ पंपिंग सेंटस् व इंजिने बसविण्यांत आली. १९५६ पासून १९६१ पर्यंत २८,७०,७५९ रुपये तगाई रुपाने व अनुदानाच्या रुपानें खर्च करून १,३५२ विहिरी बांधण्यांत आल्या व ६१,४७० रुपये खर्च करून ३० तळीं तयार करण्यांत आलीं. त्या योगें ६,७६० एकर जमीन नव्यानें सिंचाईखाली आणण्यांत आली व १०,१४२ बंगाली मणांनी उत्पन्न वाढलें. ह्याचबरोबर पंपिंग सेटच्या खरेदीसाठीहि तगाई मोठ्या प्रमाणांत वाटण्यांत आली. खडकाळ भागांत विहिरीच्या गरजा पुरविण्याच्या दृष्टीनें झपाट्यानें कार्य व्हावे म्हणून ब्लास्टिंग युनिटचें कार्य जिल्ह्यांत सुरु करण्यांत आले आहे.

शेतकऱ्यांना इंजिनासाठीं मदत :

सरकारच्या नवीन धोरणानुसार लँड मॉर्गेज बँका आतां शेतकऱ्यांना अधिक प्रमाणांत कर्ज देणार आहेत. आतांपर्यंत या बँका शेतकऱ्यांना शेतीच्या सुधारणासाठी व विहिरीसाठीं कर्ज देत होत्या. परंतु आतां त्या शेतीसाठीं लागणारी ऑईल इंजिने, पंपींग सेट्स, इलेक्ट्रिक मोटारी घेण्यासाठीहि कर्जे देतील. कर्ज किती द्यावयाचे हे सरकार ठरवील. ही कर्जे १ जुलै १९६१ पासून सुरू होणाऱ्या सहकारी वर्षापासून देण्यांत येतील. या बँकेतर्फे कर्जदारांना पाहिजे असलेली आणि सरकारमान्य असलेली, इंजिने, पंपींग सेटस् शेतकऱ्यांना बसवून दिली जातील त्यांची किंमत दुकानदारांना बँका परस्पर देतील. ह्या कर्जाची कर्जदाराकडून हप्त्या हप्त्यानें बँका वसूली करतील.

वीजेचे पंप बसवितेवेळीं वीजेचे कनेक्शन घेण्यासाठीं शेतकऱ्यांना महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाकडे अमानत रक्कम ठेवावी लागते आतांपर्यंत ती रोखीनें स्विकारली जात असे. पण आतां ती बचत रोख्याच्या स्वरुपांत स्विकारण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. शेती सुधारणेच्या इतर बाबींसाठीसुद्धां विविध प्रकारची तगाई कर्जे जिल्हा विकास मंडळाकडून व विकास गटांकडून वांटण्यांत येतात.

प्रात्यक्षिकांची सोय व बियाण्यांची वाढ :

शुद्ध आणि सुधारलेल्या बियाणांचे किती महत्व आहे हें सांगण्याची जरूरी नाहीं. वास्तविक तो तर शेतीचा खरा पाया आहे. सुधारलेल्या बियाणांच्या खास वाणांची वाढ करून त्यांचे शेतकऱ्यांना वाटप करण्याची योजना जिल्ह्यांत बरेच दिवसांपासून राबविण्यांत येत आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळांत शेतकऱ्यांना सुधारलेलें बियाणें पुरवतां यावे ह्या उद्द्शाने बीजोत्पादन केन्द्र जागोजागीं सुरू करण्याचें ठरविलें. त्यानुसार खालील ९ ठिकाणीं बीजोत्पादन केन्द्रें सुरु करण्यांत आलीं. त्यावर जमीन खरेदी १,५६,४८६ रुपये खर्च करण्यांत आले. ह्या केन्द्राच्या दैनंदिन व्यवस्थेसाठी व विकासासाठी १९५९—६१ सालांत ४,२४,८९५ रुपये खर्च करण्यांत आले. तथें गुदामांच्याहि सोई आहेत. हीं केन्द्रे खालीलप्रमाणे आहेत :—

क्रमांक	गांव	तहसील
१	पांजरी (परसोडी)	नागपूर.
२	डुमरी	रामटेक
३	मरोडी	,,
४	भेंडाळा	सावनेर.
५	सुसुंद्री	,,
६	वंडली	काटोल.
७	नरखेड	,,
८	मोखाळा	उमरेड
९	भोजापूर	,,

खुद्द नागपूर येथें शेतकी कॉलेजचे फार्म आहे.

ह्या केन्द्रांतून तयार झालेले व इतरत्रकडून मिळविलेले बियाणें जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना विकास गटांमार्फत वाटण्यांत आले. तसेंच १९५८-५९ पासून शेतकी प्रात्यक्षिक केन्द्रांची योजना लागू करण्यांत आली. त्यानुसार जिल्ह्यांतील विकास गटांत १९९ प्रात्यक्षिक केंद्रें उघडण्यांत आली. त्या सर्व केंद्रांवर शेतकीच्या सुधारलेल्या पद्धतीची प्रात्यक्षिकें करण्यांत येतात.

खतांचें वांटप :

उत्पादन वाढीसाठी खतांची गरज असते ही सर्वमान्य गोष्ट आहे. त्यानुसार खालील प्रकारची निरेन्द्रिय खतें खात्यामार्फत वाटण्यांत आली. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत १३,८१८ एकर जमीनीस खत पुरविण्यांत आले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची माहिती खालील प्रमाणें :—

खतें (टनांत)	१९५६-५७	१९५७-५८	१९५८-५९	१९५९-६०	१९६०-६१
अमोनियम् सलफेट ...	४१६	४९३	२६१	५९२	७९८
सुपर फॉस्फेट ...	२१८	२१०	...	२९०	३६३
नैट्रोजनयुक्त खते ...	२८	२१	...	१७७	१८
खताखालीं आणण्यांत आलेली जमीन.	८,३२०	९,८६०	५,२२०	११,८४०	१५,९६०
वाढलेले उत्पन्न (मणांत) ...	८,३२०	९,८६०	५,२२०	११,८४०	१५,९६०

कंपोस्ट खताचा वापरही मोठ्या प्रमाणांत करण्यांत येत आहे.

पीक संरक्षण :

धान्योत्पादन वाढविण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे धान्य पीकांवरील कीड व रोगांचे नियंत्रण करणें व टोळधाडीसारख्या किटकांपासून त्यांचे संरक्षण करणें हा होय. त्याबाबतींत नवीन नवीन उपाय शोधून काढून शेतकऱ्यांना त्यांची माहिती देण्यांत येत आहे. त्यासाठीं खास यंत्रांचाही पुरवठा करण्यांत येतो. जिल्ह्यांत संत्र्याचे पीक महत्वाचे असून त्यावर पडणाऱ्या सिट्रस सिला रोगांविरुद्ध जोराची मोहिम सरकारनें आंखली आहे.

प्रशिक्षण योजना :

पहिल्या पंचवार्षिक योजनाकाळांत एक शेतकीचे संपूर्ण शिक्षण देणारे शेतकी कॉलेज नागपूर येथें उघडण्यांत आले होते. ह्या कॉलेजला जोडून शेती विषयक प्रत्यक्ष शिक्षण देण्याची सुविधा करण्याचे दृष्टीनें २५० एकराचे एक प्रायोगिक फार्महि चालू करण्यांत आल असून तेथे विद्यार्थ्यांना शेतकीचे प्रत्यक्ष शिक्षण देण्यांत येते. थारसा येथील सरकारी प्रायोगिक फार्मवर डेमोन्स्ट्रेटर्स व ग्रामसेवक यांना ६ महिने मुदतीचे प्रशिक्षण दिले जाते. याखेरीज या केंद्रांवर संशोधनाचें कामहि चालते. नागपूर कॉलेजांत एक विस्तार कक्षही सुरु करण्यांत आला आहे.

यांत्रिक शेती :

यांत्रिक शेतीचा फायदा या भागाला देण्याचे उद्देशाने ट्रॅक्टर सेंटर उघडण्यांत आले असून वैयक्तिक शेतकऱ्यांना ट्रॅक्टर खरेदीसाठीं तकावी कर्जे देण्यांत येतात.

बांधबदिस्ती :

बांधबदिस्तीमुळें एकरीं उत्पादनांत २० ते २५ टक्के कायमची वाढ होते. बांध घातलेल्या भागांतील विहिरीचे पाणीहि वाढते, जमीनीची धूप थांबते. अशा अनेक कारणानें कंटूर बंडींगची योजना ह्या जिल्ह्यास १९५९ मध्यें लागू करण्यांत आली. दर एकरी फक्त ४० रुपये खर्च येतो. तें कर्जाऊ देण्याची सोय आहे. आतांपर्यंत ३०० एकर जमीनीस बांध घालण्यांत आले असून आणखी प्रगतीस वाव आहे.

भातशेतीची जपानी पद्धत :

भाताचें उत्पादन वाढविण्यासाठी जपानी पद्धतीनें भातशेती केल्यास फायदा होतो ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. अंतरा अंतरानें पेरणी करावयाची हे यांतील अंतर्भूत तत्व होय. ह्या कार्यक्रमास पहिल्या पंचवार्षिक योजनेंत सुरुवात झाली असली तरी खरे कार्य ह्या जिल्ह्यास पॅडी पायलट योजना लागूं झाल्यांनंतरच झाले हे मान्य करावे लागेल.

१९६०-६१ सालीं ही योजना घेण्यांत आली. ह्याखालीं कुही, मौदा, रामटेक व भिवापूर ह्या विकास गटांतील १० हजार एकर ज़मीन जपानी पद्धतीच्या भातशेतीखाली आणण्याचे ठरले. त्यानुसार उद्दिष्ट पार पाडण्यांत यश मिळाले. ह्या योजनेखालीं दर एकरी ८५ रुपये कर्ज सुधारलेले बियाणे, खते व जपान कोळपें घेण्यासाठीं देण्यांत आले. पैकीं रुपये ४५ साहित्याच्या स्वरुपांत देण्यांत आले व रु. ४० रोख देण्यांत आले. ह्या योजनेचा पद्धतशिर प्रसार होत असून त्यापोटीं नियोजित ८ लाख ५० हजार रुपये १९६०-६१ अखेर खर्च होतील. त्यायोगे भाताचे पीक वाढण्यास मदत होईल.

फळबागांच्या विकासासाठीं प्रयत्न :

शेतकऱ्यांनी आपल्या शेतांत फळबागा तयार कराव्यांत म्हणून दर एकरीं ३०० रुपये कर्जाऊ देण्याची योजना ह्या जिल्ह्यास १९५९-६० मध्यें लागूं करण्यांत आली. पांच वर्षानंतर सारख्या मुदतीच्या हप्त्याने हें कर्ज फेडावयाचे असते. १९५९-६० सालीं २०० शेतकऱ्यांना ७९४ एकर जमीन बागायतीखाली आणण्यासाठी २,३८,१९४ रुपये कर्जाऊं देण्यांत आले, तर १९६०-६१ सालीं ४०० शेतकऱ्यांना १,०१९ एकर जमीन बागायतीखाली आणण्यासाठीं ३,०५,६९६ रुपये कर्जाऊ देण्यांत आले. फळबागांबाबत संशोधन करण्यासाठी नागपूर येथे एक नर्सरी आहे.

बाजार व्यवस्था :

शेतकऱ्याला किफायतशिर भाव मिळावेत म्हणून बाजारव्यवस्थेंतील आवश्यक गोष्ट म्हणजे गुदामे होत. अशी गुदामे बांधण्यासाठीं आवश्यक ती मदत व कर्जे देण्यांत येतात. चांगला भाव येईपर्यंत शेतकरी आपला माल ह्या ठिकाणीं साठवून ठेऊं शकतो व मालाच्या तारणावर कर्ज घेऊं शकतो. अशी गुदामे विकास गटांतूनही बांधण्यांत येतात. मोठ्या गुदामांसांठी वेअर हाऊसिंग कॉर्पोरेशन मदत करते.

पीकस्पर्धा :

शेतकऱ्यांत पीकें वाढविण्यासंबंधी उत्साह निर्माण व्हावा म्हणून १९५४-५५ पासून दरसाल खेडें विभाग, तहसिल व जिल्हा पातळीवर पीकस्पर्धा घेण्यांत येतात. ह्या पीकस्पर्धांत शेतकरी मोठ्या संख्येने भाग घेतात.

नागपूर दूध-पुरवठा योजना :

नागपूर शहराला सुरक्षित व सकस दुध पुरविण्याच्या हेतूने एक योजना १९५८-५९ सालीं सुरूं करण्यांत आली.

प्रथम फक्त २३ मण दूध पुरविण्यांत येत असे. परंतु सदीर्घ प्रयत्नांमुळे शासकीय डेअरीला जोडून आज रोजीं ग्रामीण भागांत चालू वर्षांत ४१ डेअरी सोसायटचा सुरु करण्यांत येऊन एका मिल्क युनियनचे नेतृत्वाखाली ह्या योजनेचा विकास करण्यांत आला. विविध प्रक्रिया करणाऱ्या यंत्रसामुग्रीचे व वाहतुकीचे साधनांसाठी आतांपर्यंत ८.९० लाख रुपये खर्च आला असून २०० मण दुधाचा पुरवठा करण्यांत येतो. ग्राहकांना हे दूध केन्द्रावर, घरपोंच अथवा ठोक पद्धतीने शासकीय अथवा खाजगी संस्थांना पुरविण्यांत येतें.

ह्या योजनेच्या पूर्तीसाठीं एकूण २३ लाख रुपये खर्च आयोजित असून १ हजार मण दूध पुरविण्याचे लक्ष्य मानण्यांत आले आहे.

ह्या योजनेमुळें नागपूरच्या ग्राहकांना चांगले व स्वस्त दूध मिळण्याची सोय झाली असून शेतकऱ्यांना एक हमखास असा जोडधंदा उपलब्ध झाला आहे. ह्या योजनेमुळें गुरांचा दर्जा सुधारण्यासही मदत झाली.

पशुसंगोपन व पशुसंवर्धन :

भारतीय कृषि अर्थव्यवस्थेंत जनावरांना फार महत्वाचें स्थान आहे. त्यांचा दूध-दूभत्यासाठी व शेती-कामासाठीं उपयोग होतो. त्यांच्या शेणापासून मोठ्या प्रमाणांत खतहि मिळते. कांही जनावरां-पासून मांस, अंडी, लोकर, कातडी, शिंगे व हाडेहि मिळतात. १९५६ सालीं करण्यांत आलेल्या शिरगणती-नुसार नागपूर जिल्ह्यांत ८.१९ लाख जनावरे आहेत.

ह्यांतील ६.३० लाख गाई, बैल व म्हशी आहेत तर १.५२ लाख शेळ्या व २२,५३८ मेंढ्या आहेत. उरलेली १३९,१०२ घोडी, गाढवे व डुकरे आहेत. गवळाऊ ही जिल्ह्यांतील प्रमुख गाईची जात असून ती दर दिवसास १४ पौंड दूध देते. स्थानिक गाई दर दिवसास ६ पौंड दुध देतात.

जिल्ह्यांतील १०,००० एकर जमीन फक्त ट्रॅक्टरचे नांगरटीखाली असून उरलेली जमीन बैलांच्या सहाय्याने नांगरलीं जाते.

म्हणूनच पशुसंवर्धनाचे महत्व विशेष आहे. ह्या कार्यक्रमाची तीन विभागांत विभागणी होते—(१) पशुवैद्यकीय सुविधा, (२) गुरांची सुधारणा व (३) पशुवैद्यकीय शिक्षण.

पशुवैद्यकीय सोयी :

पशुवैद्यकीय सुविधा प्राप्त करून देण्याचे निमित्ताने पूर्वी असलेल्या रामटेक, उमरेड, सावनेर, काटोल व नागपूर येथील सहा पशुवैद्यकीय केन्द्रांखेरीज व शिवा, पारशिवनी, चाचेर, बेला, कोंढाळी व नरखेड येथील उपकेन्द्राखेरीज कामठी, बुटी-बोरी, नंद, जलालखेडा, पिंपळा केवलरान व मोहपा ह्या गांवीं केन्द्रे उघडण्यांत आली आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत भिवापूर, वेलतूर, खोबाळा, मोवाड व पाटणसावंगी येथें अशीच केन्द्रे उघडण्यांत आली.

नागपूर येथें सर्व प्रकारच्या पशुवैद्यकीय सोई उपलब्ध असलेलें जिल्ह्यांतील प्रमुख केन्द्र आहे. वर नमूद केलेल्या पशुवैद्यकीय केंद्राखेरीज जिल्ह्यांत कळमेश्वर, मौदा, वडोदा व कुही ह्या ठिकाणींही पशुवैद्यकीय सोयीं उपलब्ध आहेत.

गुरांच्या विविध रोगांपैकीं बुळकांड्या रोग महाभयंकर असून गुरांच्या एकूण मृत्यूपैकी ६० टक्के मृत्यु या रोगाने होतात. म्हणून या रोगाचे निर्मूलन करण्याची एक योजना आखून सर्व गुरांना या रोगाच्या प्रतिबंधक लस टोचण्याचा कार्यक्रम आंखून पार पाडण्यांत आला.

इतर रोगांसंबंधी संशोधनाची व्यवस्था करण्यांत आली.

गुरांची सुधारणा :

गुरांच्या सुधारणा कार्यक्रमामध्यें गुरांच्या बीजाची सुधारणा करणें, त्यांच्या खाण्याच्या पद्धती सुधारणें व चाऱ्याच्या पुरवठ्याची सोय करणें आदींचा समावेश होतो. त्यादृष्टीनें पहिल्या पंचवार्षिक योजने-प्रमाणेंच पण विस्तृत प्रमाणावर अस्सल वळू पुरविण्याचा कार्यक्रम अंमलांत आणला गेला. कृत्रिम गर्भधारणा केन्द्र नागपूर येथें खोलण्यांत येऊन जागोजागीं उपकेन्द्रें उघडण्यांत आलीं आहेत.

कोंबडी पालनाचा विकास करण्यासाठीं तेलंगखेडी येथें पहिल्या पंचवार्षिक योजनेंत सुरू करण्यांत आलेल्या प्रायोगिक केन्द्राचा विस्तार करण्यांत येऊन चांगल्या प्रतीचे पक्षी शेतकऱ्यांना पुरविण्यांत आले. तसेंच कोंबडी पालनाचे शिक्षण देणारे केन्द्रहि ह्या ठिकाणीं सुरूं करण्यांत आले.

प्रशिक्षण :

पशुवैद्यकीय कर्मचाऱ्यांना आवश्यक शिक्षण देण्यासाठी नागपूर येथें १९५८-५९ मध्यें एक व्हेटर्नरी कॉलेजहि उघडण्यांत आले.

मत्स्यसंवर्धन :

'अधिक धान्य पिकवा' मोहिमेचा 'मत्स्यसंवर्धन' हा एक महत्वाचा भाग आहे. नागपूर जिल्हा समुद्रा-पासून आंत असल्यानें या व्यवसायाची मर्यादा अंतर्गत जलाशयांतील मत्स्यसंवर्धनापुरतीच मर्यादित आहे. जिल्ह्यांतील विविध जलाशयांत फराय मासे सांठवून वाढविण्यांत येतात.

पहिल्या योजनेंत ५.८४ लाख फराय मासे साठविण्यांत आले व ५०,००४ पौंड मासळी पकडण्यांत आली. दुसऱ्या योजनेंत ह्या कामाची व्याप्ति १,००० एकर अधिक जलाशयांत माशांचे बी सोडण्यांत येऊन २,४०,००० पौंड मासे पकडण्यांत आले.

जंगल संपत्ति :

जमिनीचा अधिकाधिक उपयोग करून घेण्याच्या कार्यांत जंगल संपत्तीचा विकास व उपयोग याला महत्त्वाचें स्थान आहे. औद्योगिकरणाच्या प्रगतीमुळें व वाढत्या लोकसंख्येमळें जंगल मालाला औद्योगिक व घरगुती कार्यासाठीं वाढती मागणी येत आहे. यासाठीं नवीन विभागांचा विकास करणें व ते विभाग राखीव जंगल म्हणून ठेवणें, जंगलांची वाढ करणें, हीं कामें उजाड भागांत हातीं घेणें आवश्यक असून ज्या जंगल विभागांत पोंचणें अशक्य आहे त्या विभागांत रस्ते वगैरेची सोय करून तेथें पोचणें शक्य करणें जरूर आहे.

ह्या दृष्टीनें पाहतां १९५८-५९ च्या वन विभागीय अहवालावरून जिल्ह्यांतील ५.६५ लाख एकर म्हणजेच एक पंचमांश जमीन जंगलाखाली आहे. त्यांतील ५० टक्के भाग एकट्या रामटेक तहसिलींत आहे. ह्या जंगलांतील ३.२८ लाख एकर जंगलें राखीव व उरलेलें २.३७ लाख एकर संरक्षित जंगलें आहेत. त्यांतून इमारती लांकूड व इंधन मिळतें. १९५८-५९ सालीं २६.७५ लाख रुपयांचे १२.८६ घनफूट इमारती लांकडाचें उत्पादन झालें तर ३४.७४ लाख घनफूट इंधन मिळालें. ह्या व्यतिरिक्त इतर उत्पन्न ४.१२ लाख रुपये किंमतीचें मिळालें.

जंगलापासून पर्जन्यमानावरहि इष्ट परिणाम होतो. ह्या जंगलांत साग व सेमल वृक्षांची लावण करणें, कायम स्वरूपाच्या नर्सरीज चालविणें, वनमार्ग उघडणें व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक इमारती बांधणें हा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला असून हीं सर्व कामें प्रगतीपथावर आहेत. नागपूर जिल्ह्यांत बऱ्याच ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर काजूंच्या झाडांची लागवड करण्यांत आली आहे.

जिल्ह्यांतील लोकांना लांकूडफांटा निस्तार हक्कांनुसार जंगलखात्याच्या कुपांमधून पुरविला जातो.

पाणीपुरवठ्याच्या योजना :

भगीरथ प्रयत्न करून देशांतील उपलब्ध नैसर्गिक साधनसामुग्री विशेषतः पाणी—यांच्या जास्तीत जास्त उपयोगावरच शेती व औद्योगिक विकास बहुतांशी अवलंबून आहे. म्हणूनच विकास कार्यक्रमाचा भर नेहमीच पाटबंधाऱ्यांच्या आणि वीज निर्मितीच्या कामावर असतो. ज्या योजनांचा या जिल्ह्याला प्रत्यक्ष फायदा मिळतो अशा योजनांची माहिती खाली दिली आहे.

रामटेक तलाव नागपूरच्या ईशान्येस २६ मैलावर रामटेक तहसिलींत रामटेकपासून ५ मैलावर आहे. ह्यास खिंडसी किंवा रामसागर असेहि म्हणतात.

ह्या तलावाची जागा फारच आदर्श अशी आहे.

रामटेक तलाव योजना :

पावसाळ्यांत येणारे सर्व पाणी साठविण्याची याचे अंगीं क्षमता आहे. पूर्वेकडून वाहात येणारी सूर नदी व पश्चिमेकडून वाहात येणारी सांड नदी ह्या तलावास पाणी पुरवितात. ह्या दोन्हीं नद्या ह्या तलावांतून पुढे निघून वैनगंगेस मिळतात.

ह्या तलाव योजनेचें काम १९०६ सालीं सुरू होऊन १९१३ सालीं पुरें झालें. त्याच्या पाणलोटाचें क्षेत्र ८२ चौरस मैल आहे. तलावाच्या मुख्य धरणाची लांबी ७५२ फूट असून उंची ७२.८ फूट आहे. जलाशयाची खोली ४३.१० फूट आहे. जलधारण शक्ति ४,०५९ दसलक्ष घनफूट आहे. सांडव्याची लांबी ५१० फूट आहे. कालव्याची लांबी २०५.६६ मैल आहे. ह्यायोगें २४,००० एकर खरीफ व २,००० एकर रबी व सतत पीक जमिनीस पाणीपुरवठा होऊं शकतो. ह्यामुळें रामटेक तहसिलींतील ९,७०० एकर भातशेतीस पाणीपुरवठा होतो; तर २,००० एकर गहूं, ऊंस आणि इतर शेतीस सिंचाई होते. ह्या

योजनेस २९,११,८८६ रुपये खर्च आला. १९०९ सालीं ह्या योजनेखालीं ३,२२० एकरास पाणीपुरवठा करण्यांत आला. तो १९५९-६० सालीं नागपूर व भंडारा जिल्ह्यांतील १७,८६४ एकर खरीफ व २,६२० एकर रबी पीकांना पाणी पुरविण्यापर्यंत पोचला आहे. रबी हंगामास पाणी पुरवठा करण्याचे प्रयत्न चालूं आहेत. अपेक्षेप्रमाणें मौदा विकास गटांतील १,५०० एकरास पाणीपुरवठा करतां येणें शक्य झाल्यानें भातशेतीचें पीक चांगलें आलें.

देहेगांव योजना :

पहिल्या योजना काळांत छोट्या सिंचाई योजनांखालीं नागपूर-वर्धा रस्त्यावर ८ व्या मैलापासून २ मैला-वरील देहेगांव तळ्याची योजना हाती घेण्यांत आली होती. ती पुरी करण्यांत आली असून तीवर सुमारे २३ हजार रुपये खर्च करण्यांत आले. ह्या योजनेखालीं सुमारे ६०० एकर जमीन भिजते.

खुर्सापार तलाव योजना :

ही योजना सावनेर तहसिलींत असून मोहपा गांवापासून २ मैलावर आहे. छोट्या सिंचाई योजनाखाली दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत मधुगंगा नदीवर सांडव्यासह ४,१७० फूट लांब मातीचें धरण घालण्याचें काम १९६० मध्यें सुरू झालें. ह्या योजनेचा पाणलोट ८.१० चौरस मैल असून जलधारण शक्ति १५६.७२ दशलक्ष घनफूट आहे. हीच्यावर, पूर्ण झाल्यावर १८ लाख रुपये खर्ची पडतील. २।। मैल कालव्याचे सहाय्यानें १,६४० एकरास पाणीपुरवठा होईल. ही योजना प्रगतीपथावर असून ही योजना तिसऱ्या पंचवार्षिक योजना-काळांत पुरी होईल.

बोर योजना :

मध्यम सिंचाई योजनाखालीं काम चालू असलेल्या वर्धा जिल्ह्यांतील बोर धरणाचाहि फायदा नागपूर जिल्ह्यास मिळणार आहे. ह्या धरणावर १६० लाख रुपये खर्ची पडतील असा अंदाज आहे. त्यायोगें वर्धा व नागपूर जिल्ह्यांतील एकूण ५०,५३४ एकरास पाणीपुरवठा होऊं शकेल.

पिंडराबोरी तलाव योजना :

उमरेड तहसिलींतील उमरेड पासून ४ मैलांवरील पिंडराबोरी तलाव योजनेचें काम हातीं घेतल्यापासून तेथील दृश्य दिवसेंदिवस बदलत चालल्याचें प्रतित होतें.

आंब नदीवर ५१ फूट उंच व ३,४७५ फूट लांब मातीचा बांध घालण्याचें काम १९५९-६० मध्यें सुरू करण्यांत आलें. ह्याचा पाणलोट १७ चौरस मैल असून मातीच्या बांधाने तयार होणाऱ्या तळ्यांत ४८८.६१ दशलक्ष घनफूट पाणी सांठविले जाईल. ह्या योजनेस ३७.५० लाख रुपये खर्ची पडतील.

आणिबाणीच्या दिवसांतहि ५,०५० एकर जमिनीस ह्या तलावामुळें पाणीपुरवठा होऊं शकेल म्हणून शेतकरी आनंदांत आहेत.

सतीघाट तलाव योजना :

उमरेड तहसिलींत तारणा खेड्याजवळ सतीनाल्यावर ३,१२,२१४ रुपये खर्चून २०० फूट लांब मातीचें धरण घालण्याचें काम १९६० पासून नेटानें चालू आहे. छोट्या सिंचाई योजनांखालील ह्या धरणाचा पाणलोट २.३० चौरस मैल असून जलधारण-शक्ति १०९.५४ दशलक्ष घनफूट राहील. त्यायोगें १,२०० एकर जमिनीस पाणीपुरवठा होऊं शकेल.

वरील सर्व योजना तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळांत पूर्ण होतील.

ह्याखेरीज नागपूर जिल्ह्यांत २३७ मालगुझारी तलाव असून त्यांची दुरुस्ती झाल्यास बरीच जमीन सिंचाईखाली राहूं शकेल.

महाराष्ट्र राज्याचे सिंचाई मंडळ नुकतेच ह्या भागांत येऊन गेले. त्यांनी ह्या भागांतील सिंचाई योजनांची व साधनांची फेरतपासणी केली. जिल्ह्यांतील जलसंपत्तीच्या योग्य वापरामुळें व विविध योजनापूर्तीमुळें येथील शेतीचा कायापालट होण्यास मदत होईल.

औद्योगिक विकास

निसर्गाचें वरदान--विपूल खनिज संपत्ति :

नागपूर जिल्ह्याला निसर्गाने विपूल खनिज संपत्तीचे साठे देऊन वरदानच दिलें आहे. पण ही संपत्ति जमिनीच्या पोटांत आहे तशीच राहिली तर ती असून नसून कांहींच उपयोग नाहीं. येथील जनतेच्या कर्तुत्त्वाला आव्हान आहे हें. तें त्यांनी स्वीकारून त्या खनिजांचा योग्य वापर केला पाहिजे व जिल्ह्याचा औद्योगिक विकास घडवून आणला पाहिजे. आपल्या परीनें शासन सर्वथैव प्रयत्नशील आहे. नुकतीच नागपूर येथें एक औद्योगिक परिषद भरविण्यांत आली होती. त्याप्रसंगीं भाषण करतांना महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी उद्गार काढले होते कीं निसर्ग शक्ति व उपलब्ध विद्युत्शक्तीच्या सहाय्यानें ह्या भागाला महाराष्ट्राचे 'रुर' होता येईल.

नागपूर जिल्हा विशेषत: नागपूर हे महाराष्ट्रांतील एक महत्त्वाचे औद्योगिक केन्द्र आहे. अर्थात् येथील औद्योगिक विकासाला कारणीभूत परिस्थिति म्हणजे, याचे ऐतिहासिक व भौगोलिक महत्त्व, कच्चा माल व इंधन यांची विपुलता, उद्योगधंद्यांत भाग घेणारे लोक व उत्पादनाला आवश्यक लागणारी स्थानिक, देशी व परदेशी बाजार पेठांची गरज वाहतुकीची साधने आदि गोष्टी अनुकूल असल्याने उद्योगधंद्यांची येथें पूर्वीपासूनच भरभराट होती.

हातमाग :

यंत्रयुगाच्या पूर्वी नागपूर हे हातमागाचें माहेरघर होतें. नागपूर, कामठी, उमरेड, सावनेर, खापा आदि ठिकाणचें विणकर सुप्रसिद्ध होतें.

हातमाग वस्त्र विशेषतः रेशमी किनारीची धोतरें व साड्या विशेष प्रसिद्ध. त्यांचा परदेशांशीहि व्यापार चालतो.

सन १९५१ चें हातमाग गणतीनुसार विदर्भात एकूण ८८,०९५ हातमाग आहेत. त्यापैकीं ४३,४८३ म्हणजे निम्मे हातमाग केवळ एकटचा नागपूर जिल्ह्यांत आहेत व त्यांतील २१,३९८ हातमाग नागपूर शहरांत आहेत.

जिल्ह्यांत हातमागावर सुमारे २,१७,५०० (मोमीन व विणकर) लोक पोट भरतात. त्यांच्या १४७ सहकारी संस्था असून १८,६३६ सभासद आहेत. ह्या संस्थांचे शेअर भांडवल ४,२६,००० रुपये असून गंगाजळी ७,५८,००० रुपये आहे. सरकारनें त्यांना ९,१५,००० रुपये कर्ज दिलें आहे. रिझर्व बँकेनें ४,४८,००० रुपये कर्ज दिलें आहे. ह्या संस्थांचें खेळतें भांडवल ३१,००,००० रुपयांचे आहे. या भांडवलाचे जोरावर त्यांनीं १९५९-६० सालीं ५५ लाख रुपये किंमतीचें कापड काढलें असून ६२ लाख रुपयाचें कापड विकलें आहे. सहकारी संस्थांचे हातमाग ३,००० होते. त्या मागावर काम करणारांना १७ लक्ष ३३ हजार रुपये म्हणजे प्रत्यकीं ४५ ते ५० रु. दरमहा मजूरी म्हणून दिलें गेलें. तसेच जिल्ह्यांत रेशीम विणकरांच्या ७, लोंकर विणकरांच्या ७ व खादी विणकरांची १ सहकारी संस्था आहेत.

ह्या धंद्याचें महत्त्व ओळखून त्याला उत्तेजन देण्यासाठीं सरकारनें त्यांच्यासाठी निरनिराळ्या योजना आखल्या. त्यांतील प्रमुख म्हणजे उत्पादकांच्या सहकारी संस्था स्थापण्यांत आल्या असून त्यांना आर्थिक मदत व मार्गदर्शन देण्यांत येऊं लागले. उत्पादनासाठी, भाग भांडवलासाठीं, विक्री व्यवस्थेसाठीं, डेपो उघडण्याकरितां, तांत्रिक सुधारणा करण्यासाठीं, अवजारें घेण्यासाठीं, रिबटसाठीं, कामठी व नागपूर येथें विणकरांच्या वसाहती स्थापण्यासाठीं, सरकारमार्फत आर्थिक मदत, कर्ज व मार्गदर्शन मिळूं लागलें.

शक्य त्याठिकाणीं हातमागाशी चढाओढ होणार नाही असे पारखून पॉवरलुम्सहि बसविण्यांत आलें आहेत. त्यासाठीं कर्जें देण्यांत आलीं.

हातमाग वस्त्राचे फिरते विक्री-केन्द्र

हातमागावर तयार करण्यांत आलेले वस्त्र विकण्यांसाठीं एक फिरते विक्री-केन्द्र नुकतेच चालू करण्यांत आले आहे. ३० जून १९६१ च्या तिमाहींत ह्या योजनेखालीं देण्यांत आलेल्या वाहनाद्वारां १३,५०० रुपयांचे वस्त्र गोळा करण्यांत आले व १५,५५४ रुपयांची विक्री करण्यांत आली. विदर्भ

विभागांतील विविध विणकर संस्थांना ह्या फिरत्या विक्री-केन्द्राचा फायदा मिळतो. हातमाग वस्त्राचे प्रचाराचे कार्यही ह्या फिरत्या विक्री-केन्द्राद्वारें परिणामकारकरित्या करण्यांत येते, त्यामुळें विभागांतील दूरदूरच्या भागांत हातमाग वस्त्राचा प्रसार होण्यास मदत होऊन विणकरांचा फायदा झालेला आहे.

तांत्रिक सल्ला देण्यासाठीं नागपूर येथें एक टेक्स्टाईल एक्स्पर्ट नेमण्यांत आला आहे. हातमाग धंद्याचें भवितव्य निश्चित करण्याचें निमित्तानें विणकरांची एक परिषद नुकतीच नागपूर येथें घेण्यांत आली होती. त्या परिषदेंत विणकरांना प्रशिक्षण देण्याच्या योजनेचा विचार होऊन सरकारनें ती स्वीकारल्याचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं जाहिर केले होते. त्यानुसार तपशील ठरविण्यांत येत आहे.

विणकरांचे इतर प्रश्न आहेत. महाराष्ट्र सरकारनें विणकर जमातीच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठीं अर्थमंत्री श्री. शेषराव के. वानखेडे यांच्या अध्यक्षतेखालीं एका सहा सभासदांच्या समितीची स्थापना केली. विणकरांच्या शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें असलेल्या प्रश्नांचा अभ्यास करून तिसऱ्या पंच-वार्षिक योजनेच्या काळांत अंमलबजावणी करण्याकरितां या समितीनें योजना सुचवावी असे ठरले.

या समितीचे इतर सभासद पुढीलप्रमाणें आहेत :—

इमारती व दळणवळण खात्याचे मंत्री श्री. मारोतराव कन्नमवार, शिक्षण आणि समाज कल्याण खात्याचे सचिव श्री. पी. जे. चिन्मुलगुंद, नागपूर विभागाचे कमिशनर डॉ. ए. यू. शेख, रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् श्री. एल्. एन्. वोंगीरवार आणि अर्थ खात्याचे डेप्युटी सचिव श्री. पी. डी. कसवेकर हे सेक्रेटरी आहेत.

राज्यांतील विणकर समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं उपाययोजना म्हणून ह्या समितीनें नुकत्याच केलेल्या प्रमुख शिफारशी खालील प्रमाणें आहेत—

(१) को-ऑपरेटिव्ह बँकाकडून कर्जाच्या स्वरुपांत प्रत्येक मागागणिक जे ३०० रुपये भांडवलादाखल दिले जात होते त्याची मर्यादा वाढवून ती ५०० रुपये करावी ;

(२) टप्याटप्प्याने हातमागांचे रुपांतर यंत्रमागांमध्यें करावें ;

(३) ९० लक्ष रुपये भांडवल असलली एक सहकारी सूत गिरणी काढण्यांत यावी. यांत सरकारचा हिस्सा १० लाख रुपयांचा रहावा व या सूत गिरणींत उंची नंबरच्या सुताचे उत्पादन व्हावे ;

(४) विणकरांच्या वस्तींत अधिक शैक्षणिक संस्था सुरूं कराव्यांत.

हातमाग धंद्याखेरीज इतर कुटिरोद्योगांतील प्रमुख म्हणजे चर्मोद्योग, वनोद्योग, मजूरकाम, तेलघाणी धातूकाम, यंत्रकाम, रंगकाम, वेतकाम, सुतारकाम, लोहारकाम, कुंभारकाम, स्त्रियांचे विविध उद्योग आदि उद्योग चालतात. त्यांच्याहि सहकारी संस्था असून त्यांची संख्या १०६ इतकी आहे.

त्या धंद्यांचे विकासासाठीं प्रशिक्षणाच्या सोई उपलब्ध आहेत. नागपूर येथें ह्या कुटिरोद्योगांबाबत आधुनिक पद्धतीनें प्रशिक्षण देणारी शाळा आहे.

नागपूर येथील कुटिरोद्योग प्रशिक्षण संस्था

भारतीय हस्तकला व कुटिरोद्योग यांचा गतेतिहास उज्ज्वल आहे. परकीय अंमलाखाली मात्र त्यांची हेळसांड होऊन वाताहात झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांच्या पुनरुज्जीवनासाठीं प्रयत्न करण्यांत येऊं लागले. त्यांना राज्याश्रय देण्यांत येऊन आवश्यक ती मदत व मार्गदर्शन देण्यांत आल्यामुळें त्यांची परिस्थिति पुन्हा सुधारूं लागली. परिणामतः देशी व परदेशी बाजारपेठांत कलाकुसरीनें युक्त असा माल मोठ्या प्रमाणांत विकला जाऊं लागला.

बाजारांत प्रतिदिनीं बदलणाऱ्या फॅशनप्रमाणें माल तयार करणें व तोहि स्वस्त परवडेल अशा दरांत, हा प्रश्न सोडविण्यासाठीं छोट्या छोट्या यंत्रांचा वापर करणें आवश्यक होते. नव्या तंत्रांचा अवलंब व छोट्या यंत्रांचा उपयोग ह्याबाबत माहिती कारागिरांना देणें क्रमप्राप्त होते. त्यास अनुसरून राज्य सरकारनें पिढीजात कारागिरांना त्यांच्या धंद्याचें आधुनिक शिक्षण देण्यासाठीं नागपूर येथें प्रशिक्षण संस्था चालू केली.

ही संस्था १९५२ मध्यें स्थापन करण्यांत आली. सुरवातीला ग्रामोद्योगाचें व कुटिरोद्योगाचें संशोधन करणें, गरजू कारागिरांना सल्ला देणें आणि आधुनिक यंत्रांचा वापर, यांची प्रात्यक्षिकें आदि कार्यावरच विशेष भर देण्यांत येत असे.

परंतु कुटिरोद्योगाची खरी गरज लक्षांत घेऊन कारागिरांना प्रशिक्षण देण्याचें प्रत्यक्ष कार्य राज्यपुनर्रचने-नंतर खरें सुरूं झालें. १९५७-५८ मध्यें संस्थेच्या विविध विभागांची सुत्रमय रचना करून कारागिरांना प्रशिक्षण देण्यांत येऊं लागलें. संस्थेच्या विविध विभागांची माहिती खाली देण्यांत येत आहे :—

तांत्रिक विभाग :

एकावेळीं ४८ विद्यार्थी-कारागिर ह्याठिकाणीं प्रशिक्षण घेऊं शकतात. ह्यांत वेगवेगळें पोट-विभाग आहेत. ह्या विभागाच्या वर्कशॉपमध्यें सहा सहा महिनें मुदतीचे वाढीकाम, लाखकाम, टीनकाम व लोहार-काम ह्यांचे वर्ग घेण्यांत येतात. तज्ञ मार्गदर्शक व अद्यावत् यंत्रांनी हा विभाग सुसज्ज आहे. जीवनोपयोगी वस्तू व कलाकुसरीचीं कामें स्वस्त खर्चांत व लहान बँड-सॉ, सर्क्युलर-सॉ, बेल्ट डिस्क सेंडर, मशीन रंधा, वुडवर्किंग, लेथ, स्प्रे पेंटिंग मशीन, इलेक्ट्रिक वेल्डिंग मशीन आदि लहान लहान यंत्रांच्या सहाय्यानें थोडक्या वेळांत करण्याचें शिक्षण कारागिरांना देण्यांत येतें.

मृत्तिका विभाग :

कारागिरांना १ वर्षांत कलाकुसरीची व झिलईदार मातीचीं भांडीं तयार करण्यास शिकविले जाते. विकास अधिकारी यांनाहि ह्या ठिकाणीं मार्गदर्शन करण्यांत येतें. ठिकठिकाणच्या मातीचें विश्लेषणहि ह्याठिकाणीं करण्यांत येतें. दहा हजार सेंटिग्रेडपर्यंत उष्णतामान देणारी मोठी भट्टी, डाऊन ड्राफ्टची भट्टी, पगमील, कुंभारकाम चक्र, विटा व इंग्रजी कौले करण्याची यंत्रें, फिल्टर प्रेस, कांचेचे मणी व खेळणी तयार करण्याचीं यंत्रें आदि आयुधांनीं व तज्ज्ञ मार्गदर्शकांनी हा विभाग सुसज्ज आहे.

शिवणकला विभाग :

ह्या विभागांत १ वर्षाचें प्रशिक्षणासाठीं १५ विद्यार्थी-विद्यार्थीनींना प्रवेश दिला जातो. साधारणतः ऑक्टोबरमध्यें वर्ग सुरूं होतात.

चर्मकला विभाग :

मागासलेल्या जमातींतील, ह्या धंद्यांत काम करणाऱ्या कारागिरांच्या १५ मुलांना ह्या विभागांत १ वर्षाच्या अभ्यासक्रमासाठीं प्रवेश देण्यांत येतो. सिंगर शिलाई यंत्र, सिंगर हेवी अप्पर लेदर स्टिचिंग यंत्र, सोल स्टिचिंग यंत्र, हील मशीन, स्लिप स्टिचिंग यंत्र, स्कायव्हिंग, फिनिशिंग आदि कामाचीं यंत्रें ह्या विभागांत ह्या विद्यार्थ्यांच्या उपयोगा-साठीं ठेवण्यांत आलेलीं आहेत. ह्या विभागांतील विद्यार्थी मागासलेल्या समाजांतून येत असल्यामुळें त्यांच्या बौद्धिक वाढीकडे विशेष लक्ष्य देण्यांत येते. त्यांच्यासाठीं वाचना-लयाची व क्रीडांगणांचीहि व्यवस्था करण्यांत आलेली आहे.

फलसंवर्धन विभाग : १५ सप्टेंबर ते १५ डिसेंबर व १ जानेवारी ते ३१ मार्च अशा मुदतींत चालणाऱ्या ह्या विभागाच्या वर्गांत फलसंवर्धन, फळांचा रस टिकविणें, शिरका, चटण्या, मुरंबा तयार करणें व भाजीपाला टिकविणें आदि प्रक्रिया शिकविण्यांत येतात. ह्याशिवाय विकास खंडांत व इतर ठिकाणीं १० दिवसांचें शिक्षणक्रमाचीहि व्यवस्था करण्यांत येते. मात्र त्या ठिकाणीं खर्च विद्यार्थ्यांना करावा लागतो.

तेलघाणी विभाग : ह्या विभागामार्फत १ महिन्याच्या मुदतीचा अभ्यासक्रम चालविण्यांत येतो. तेथें पुणें येथें तयार झालेली नूतन तेलघाणी, एरंडोलची तेलघाणी व नागपूर येथें तयार केलेली नूतन वर्धा तेलघाणी विद्यार्थी वर्गाला माहिती करून देण्यासाठी ठेवण्यांत आल्या आहेत. ह्या विभागामार्फत तेलघाणी औद्योगिक संस्थांना विनामूल्य तांत्रिक सल्ला दिला जातो.

ग्रामीण कुंभार काम : ६ महिन्याच्या मुदतींत कारागिर विद्यार्थी वर्गाला कुंभार चाककाम, मूर्तिकला, विटा, कौलें तयार करण्याचें शिक्षण देण्यांत येतें.

खांडसारी साखर व गूळ विभाग : ह्या विभागातर्फे चांदा, भंडारा जिल्ह्यांतील अनुक्रमे सिंदेवाही व साकोली येथें प्रात्यक्षिक केन्द्रें चालविण्यांत येतात.

उपरिनिर्दिष्ट वर्ग साधारणतः मे व ऑक्टोबर मध्यें सुरूं होतात. होतकरू विद्यार्थी कारागिरांना त्यांत प्रवेश दिला जातो. त्यांची वयोमर्यादा १४ ते २४ वर्षें असावी लागते. प्रवेश मिळविण्यासाठीं विद्यार्थी कारागिरानें ७ वी पर्यंत शिक्षण घेतलेलें असावें. औद्योगिक सहकारी समितीनें पुरस्कृत केलेल्या विद्यार्थी कारागिरांना प्राधान्य देण्यांत येतें. प्रशिक्षण क्रमाच्या शेवटी चांचणी घेण्यांत येते. त्या चांचणींत पहिल्या २ क्रमांकांच्या विद्यार्थी कारागिरांना २५ रु. व २० रु. यंत्रसामुग्रीच्या स्वरूपांत बक्षिस म्हणून देण्यांत येतात. प्रशिक्षण घेऊन गेलेल्या कारागिरांची तपशीलवार माहिती ठेवण्यांत येते. त्यांना त्यांचा धंदा उत्तमरित्या चालवतां यावा म्हणून आर्थिक सहाय्यहि करण्यांत येते. कांहीं निवडक कारागिरांना विकास खंडांत नोकरीपण देण्यांत येते. आतांपर्यंत २३० कारागिर विद्यार्थी ह्या संस्थेंतून शिक्षण घेऊन गेले. ८७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपल्या प्रशिक्षणाचा फायदा ते इतर कारागिर बंधूंना देऊं शकतील.

विकास गटांत प्रशिक्षणाच्या सोई :

नागपूर विकास गटांत शिंपीकाम व बाहुल्या बनविण्याचें प्रशिक्षण देण्याची शाळा आहे.

भिवापूर विकास गटांत विजेरी उपकरणें व चर्मोद्योगाचें प्रशिक्षण देण्याच्या शाळा आहेत.

सावनेर विकास गटांत सुतारकाम, शिंपीकाम, आदींचें प्रशिक्षण देण्याच्या शाळा आहेत.

कुही विकास गटांत सुतारकाम तर नरखेड विकास गटांत कुंभारकामाचें प्रशिक्षण देण्याच्या शाळा आहेत.

नागपूर, कळमेश्वर व नरखेड येथें कुक्कुट पालनाची माहिती मिळूं शकते.

मौदा विकास गटांत लोहारकाम व सुतारकामाचें प्रशिक्षण देण्याच्या शाळा आहेत.


ह्या केंद्रांतून प्रशिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या कारागिरांना स्वतःचे पायावर उभें राहता यावे म्हणून आर्थिक मदत व मार्गदर्शन करण्यांत येत आहे.


नवराष्ट्र निर्माण कार्यांत मध्यम व मोठ्या धंद्यांबरोबरच कुटिरोद्योगांना व छोट्या उद्योगांना महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे. याचें कारण कीं रोजगार पुरविण्याची त्यांचे अंगी क्षमता आहे आणि म्हणून त्यांचा योजनाबद्ध विकास करण्यांत येत आहे. त्यांच्या विकासाचें रहस्य सहकारी चळवळींत सांठवलेलें आहे म्हणून सहकारी तत्त्वावर त्यांचा विकास घडवून आणण्यांत येत आहे. सरकारी प्रयत्नांबरोबरच ग्रामोद्योग बोर्ड व खादी कमिशन यांचे द्वारांहि ह्या धंद्याचें पुनरुज्जीवनास व विकासास हातभार लावण्यांत येत आहे.

नागपूर जिल्ह्यांत असे २५८ कारखाने असून त्यांत ५,४५६ मजूर रोजगार मिळवितात.

उद्योगधंदे व कारखाने

नागपूर जिल्हा





वाहतूक
नागपूर जिल्हा
दिल्ली
छिंदवाडा
बैतूल
शिवनी
देवलापार
नरखेड
जलालखेडा
सावरगांव
सावनेर
खापा
मनसळ
रामटेक
नयाकुंड
खापरखेडा
लोहडोंगरी
कलकत्ता
काटोल
पा. सावंगी
नागपूर
कळमेश्वर
मौदा
भंडारा
अमरावती
कोंढाळी
पारडी
बाजारगांव
हिंगना
पाचगाव
उमरेड
भिवापूर
बुटीबोरी
वर्धा
मुंबई
चांदा
हिंगणघाट
रस्ते
रेल्वे
मोटार वाहतुकीचें केंद्र
विमानतळ
वृत्तपत्रें व माहिती केंद्र
सर्किट हाउस
पावर हाउस
रेस्ट हाउसेस
युनिव्हर्सिटी व कॉलेजेस
आकाशवाणी

लघुद्योग

पांच लाख रुपये पर्यंत गुंतवलेलें भांडवल असणाऱ्या उद्योगांना लघुद्योगाच्या श्रेणींत घालण्यांत येते. अशा जिल्ह्यांतील लघुद्योगांतील महत्त्वाच्या उद्योगांची माहिती खाली दिली आहे :—

सी. पी. फौन्ड्री वर्क्स, नागपूर :

१९४२ साली स्थापन झालेला हा कारखाना सध्यां दशमानपद्धतीचीं वजनें तयार करतो.

कॉर्न प्रॉडक्टस् कंपनी, नागपूर:

१९५१ सालीं स्थापन झालेला हा कारखाना संत्र्याचा रस तयार करतो. १९५९ सालीं ह्याचें उत्पादन १८,००० गॅलन होतें.

नागपूर जिल्ह्याचें वर्णन संत्र्याचा जिल्हा म्हणून केलें जातें. ह्याच्या १/४ भागांत संत्रीं होतात. येथील संत्रीं फार गोड असतात. व त्यांना देशी फार मोठी बाजारपेठ आहे. संत्र्यापासून दरसाल १।। कोट रुपये उत्पन्न मिळतें. संत्र्यांच्या विकासासाठीं, संत्रीं टिकविण्यासाठीं व त्यांच्यापासून इतर पदार्थ तयार करण्यासाठीं संत्रा बागवान संस्था नेहमी प्रयत्न करीत असते.

पंजाब इंजिनियर्स कॉर्पोरेशन, कामठी :

१९४८ सालीं स्थापन झालेला हा कारखाना ऑईल एक्स्पेलरची व गुऱ्हाळाचे चरकांची निर्मिती करतो.

मेटलफोल्ड उद्योग, नागपूर :

स्क्रू, खिळे बनविण्याचा हा कारखाना १९५१ मध्यें सुरू झाला.

एम्. हाजी वझीर मोहम्मद आणि सन्स, कामठी :

हे चर्मोद्योग करतात.

फोटोफ्रेम तयार करणारे कारखाने :

ह्या धंद्याचे बाबतींत नागपूर फार प्रसिद्ध असून येथील माल देशी व पाकिस्तान, ब्रम्हदेश आदि विदेशी बाजारपेठांत मोठ्या प्रमाणांत खपतो. ह्यांच्यांतील विनयचंद्र आणि कंपनी एकटी दरसाल १ कोट धावफूट फरेमी तयार करते.

इतर विविध लघुद्योग

कॉमर्शियल इंजिनिरिंग वर्क्स, नागपूर :

ही संस्था १९५६ सालीं सुरू झाली. ह्या संस्थेमार्फत सायकलीचे विविध सुटे भाग तयार करण्यांत येतात. जिल्ह्यांत ही एकमेव संस्था असून तिच्यांत दरसाल ५,००० सायकली निर्माण करण्याची क्षमता आहे. ही शासकीय आर्थिक मदतीचे सहाय्यानें प्रगतीपथावर आहे.

रेशीम व रेयॉन उद्योग संस्था, नागपूर :

रेशमी सुताच्या गुंड्या तयार करणारा हा कारखाना १९५० सालीं सुरू झाला असला तरी १९५८ नंतर विशेष प्रगतीपथावर आला.

भिशीवर शटल मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, नागपूर :

धोटा तयार करण्याचें काम ह्या कंपनीने १९५९ सालीं सुरूं केलें.

एशियन एजन्सिज, नागपूर :

लोखंडी फर्निचर बनविणारी संस्था.

अशा ह्या विविध धंद्यांना उद्योगधंदे खात्यामार्फत विविध प्रकारची आर्थिक आदि मदत व मार्गदर्शन करण्यांत येते. त्यांच्यासाठीं बाजाराच्या सोई देखील उपलब्ध करण्यांत येत आहेत. ह्या उद्योगांना १ लाखापर्यंत अर्थपुरवठा करण्याचें काम महाराष्ट्र सरकारनें महाराष्ट्र स्टेट फायनान्शियल कॉर्पोरेशन

नांवाचे संस्थेकडे सोंपविले आहे. ही संस्था प्रादेशिक अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानें उद्योगधंद्यास अर्थपुरवठा करते. तसेंच दिल्ली येथें असलेली नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीस कॉर्पोरेशन हृया उद्योगधंद्यांना भाडे-विक्री-पद्धतीने यंत्रसामुग्री पुरविते. यंत्रसामुग्री व कच्च्या मालाच्या आयातीसाठीं स्थानिक उद्योग धंद्यावाल्यांना वाणिज् व उद्योग खाते, भारत सरकार यांचेकडून परवाना काढावा लागतो. स्टेट बँक ऑफ इंडियाकडून यांना आवश्यक तो कर्जपुरवठा होऊं शकतो. इंधनासाठीं हृया धंद्यांना मदत देण्यांत येते.

पण हृया धंद्यांच्या वाढीसाठी संघटीत पायावर आधारलेली जर कोणती योजना असेल तर ती म्हणजे औद्योगिक वसाहृतीची होय.

मुंबई राज्यांत विदर्भ आल्यावर मुंबई सरकारनें छोटे कारखानदार एकत्र आणून त्यांना जमीन, पाणी-पुरवठा, वीज, वाहतूक वगैरे समान सोयी पुरविण्याच्या दृष्टीनें राज्यांतील निरनिराळ्या भागाप्रमाणें नागपूरसाठीं एका औद्योगिक वसाहृतीच्या स्थापनेला मान्यता दिली.

औद्योगिक वसाहत :

कामठी रोडवर, नागपूरपासून ४ मैलावर औद्योगिक वसाहतीसाठी आदर्श अशी जागा निवडण्यांत आली आहे. म्हसाळा व वांजरा हृया खेड्यांतील एकूण २१.३७ एकर जमीन हृया योजनेसाठी घेण्यांत येऊन वसाहतीच्या बांधकामाला १९५९ पासून सुरवात झाली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळांत १० लाख रुपये खर्च करण्याचे ठरविण्यांत आले. योजना पूर्तीनंतर वसाहतीवर १९ लाख रुपये खर्च होतील. हृया वसाहतींत एकूण ६३ कारखान्यांसाठीं शेड्स बांधण्यांत येतील. त्यांतील ४३ शेड्स १२०' × ६०' च्या आकाराच्या राहणार असून उरलेल्या ७०' × ३०' राहणार आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ३७ शेड्स बांधण्यांत येणार होत्या. त्या पुऱ्या होत आल्या. रस्ते, पूल, विहिरी आदीसारख्या इतर सुविधा उपलब्ध करून देण्यांत आल्या आहेत.

ज्या लघुद्योग मालकांना हृया वसाहतींत यावयाचे असेल त्याने नागपूर येथील डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज यांचेकडे अर्ज करावा लागतो. सोबत इसारा म्हणून नियमित रक्कम द्यावी लागते. अर्ज नामंजूर झाल्यास इसाऱ्याची रक्कम परत मिळते. मोठ्या प्रकारच्या शेड्सचें मासिक भाडे १३० रुपये राहणार असून लहान प्रकारच्या शेड्सचें मासिक भाडे ८५ रुपये राहील. इसाऱ्याची रक्कम १ महिन्याच्या भाड्याइतकीच राहील. करारमदार करून हे शेड्स उद्योग मालकांना देण्यांत येतील. हृया शेड्ससाठी मोठ्या प्रमाणांत मागणी आहे. आतांपर्यंत २० उद्योग मालकांना हृया वसाहतींत जागा देण्यांत आल्या. त्यांच्या वतीनें ट्रान्सिस्टर, अल्युमिनियम, पितळ यांच्या वस्तू, तारा, स्क्रू, खिळे, लोखंडीदोर, औषधे, आदी तयार होतील. हृया वसाहतीचे २९ जून १९६१ रोजीं भारताचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी उद्घाटन केले.

लवकरच नागपूरच्या बाजूला उद्योगधंद्याने गजबजलेले हे पूर नांवारूपाला येईल.

नागपूर जिल्हृयांतील मध्यम व मोठे उद्योग

यंत्रयुगाची देणगी, कापडाच्या गिरण्या :

नागपूर जिल्हृयांतील प्रमुख पीक कापसाचें आहे आणि म्हणूनच येथें दोन महत्त्वाच्या कापडाच्या गिरण्या मोठ्या प्रमाणावर चालू आहेत. त्या म्हणजे एम्प्रेस मिल व मॉडेल मिल हृया होत.

एम्प्रेस मिलसचे ५ घटक आहेत. तर मॉडेल मिलसचे २ घटक आहेत.

मॉडेल मिल मध्यंतरी बंद पडल्यामुळें संचालकाद्वारा महाराष्ट्र सरकारनें चालविण्यास घेतली असून ती फायद्यांत चालविण्यांत येऊं लागली आहे.

एम्प्रेस मिल मध्यें दरसाल १,१३,००,६०७ पौंड धागा विणला जातो व ४,३१,८२,०८० वार कापड विणलें जाते, तर मॉडेल मिल मध्यें १२,९९,७८४ पौंड धागा विणला जातो व २,७५,७९,४१४ वार कापड विणलें जाते.

हृया व्यतिरिक्त रंगारीकाम, धुलाईकाम, रेशीम विणकाम आदिचेहि कारखाने आहेत. हृया धंद्यांत सुमारें १३,६९१ मजूर गुंतलेले आहेत.

संभाव्य सहकारी सूत गिरणी :

लवकरच सूताची गरज भागविण्यासाठी नागपूर येथें विणकरांची एक सहकारी सूत गिरणी काढण्यांत येणार आहे. या गिरणीसाठी लागणारे शेअर भांडवल विणकर आणि विणकरांच्या सहकारी सोसायट्या यांच्याकडून जमा केले जाईल, अशी घोषणा महाराष्ट्र राज्याचें बांधकाम विभागाचे मंत्री श्री. मा. सां. कन्नमवार यांनी नुकतीच केली. सरकारहीं ह्या गिरणीस अर्थ-पुरवठा करील.

फेरोमँगनीजचे कारखाने :

नागपूर जिल्ह्यांत मे. खंडेलवाला फेरो अलॉय लि. कन्हान व इंडिया फेरो मँगनीज मॅन्युफक्चरिंग कंपनी कामठी या दोन कंपन्यांच्या वतीनें मँगनीजवर प्रक्रीया करण्यासाठी २ कारखाने काढण्यास सराकरनें १९५९ सालीं परवानगी दिली असून पहिल्या कारखान्यांतून दरसाल ३०,००० टन फरोमँगनीज निर्माण होईल, व दुसऱ्याचे मार्फत २४,००० टन फरोमँगनीजचें उत्पादन होईल. पैकी पहिला कारखाना सुरू सुद्धा झाला आहे.

विदर्भ ऑटो-स्प्रिंग व ॲन्सिलरीज नागपूर :

कॅनरा वर्कशॉप लि., च्या वतीनें चालणाऱ्या ह्या कारखान्याचे उद्‌घाटन ३-६-६१ रोजीं भारताचे पोलाद, इंधन व खाणी विभागाचे मंत्री श्री. सरदार स्वरणसिंग यांनी केले. ह्या कारखान्यांत मोटारींना लागणाऱ्या स्प्रिंग्ज व इतर वस्तू निर्माण होतात.

सेफ्टी फ्यूज आणि गनपावडर निर्मिति :

कामठी रोडवर मे. सन्याल हसनजी एक्स्प्लोझिव्ज, नागपूर यांची १९४३ पासून स्थापन झालेली भारतांतील एकमेव सेफ्टी फ्यूज व गनपावडर निर्माण करण्याची फॅक्टरी आहे. २४ फूट लांबीच्या ३०० तारांचे प्रत्येकीं असे ५०० गठ्ठे दरमहा ह्या कारखान्यांतून निधत असतात. म्हणजे दरसाल १९,३०,००० तारांचें उत्पन्न होत असतें. दुसऱ्या पंचवर्षीय योजनाअखेर २,४०,००० पर्यंत उत्पादन वाढविण्याचे निर्धारीत लक्ष्य होतें. ह्या ठिकाणीं २०० मजूर काम करतात.

ह्या खेरीज १ केमिकल इंडस्ट्री, लीफस्प्रिंग इंडस्ट्री, फळ संवर्धन व फळ डबे बंद करण्याचा उद्योग, छपाई उद्योग विशेषतः मे. शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स, नागपूर, रंग निर्मिति उद्योग, लांकूड काम, मोटार काम, आदि नमूद करण्यासारखे आहेत.

मध्यम व मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या उद्योग धंद्याच्या कारखान्यांची संख्या ७३ असून त्या कारखान्यांत २४,७७४ मजूर काम करतात.

औद्योगिक सल्ला केन्द्र :

विविध उद्योगधंद्याच्या विकासासाठीं आवश्यक सल्ला पुरविण्याच्या हेतूनें औद्योगिक सल्ला केन्द्र नागपूर येथें कुटीरोद्योग प्रशिक्षक संस्थेच्या इमारतींत उघडण्यांत आले आहे.

उद्योग विभागामार्फत प्रकाशित करण्यांत आलेले सर्व साहित्य व प्रकाशनें ह्या केन्द्रांत संदर्भासाठी व विक्रीसाठीं ठेवण्यांत आलेली आहेत.

उद्योगधंद्याच्या विकासासाठीं सल्ला घेऊं इच्छीणारांनीं डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज, नागपूर, यांना लिहावे अथवा प्रत्यक्ष भेटावे.

औद्योगिक शांतता :

महाराष्ट्र राज्याच्या उद्‌घाटन प्रसंगीं मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या धोरण विषयक निवेदनानुसार औद्योगिक तह घडवून आणण्यासाठी विशिष्ट उपाययोजना अद्याप करण्यांत आलेली नसली तरी कामगार कायदे, निवाडे, करार इत्यादींची अंमलबजावणी न झाल्याबाबत येणाऱ्या तक्रारींची चौकशी व त्यांची अंमलबजावणी व्हावी म्हणून प्रयत्न करण्यासाठीं सरकारनें मालक, कामगार आणि सरकार

ह्यांच्या प्रतिनिधींची एक त्रिपक्ष समिति नेमली आहे. ह्या समितीला कामगार परिषेंदत ठरविण्यांत आलेल्या शिस्त संहितेच्या भंगाच्या प्रकरणांची चौकशी करावी लागते आणि राज्याच्या उद्योग धंद्यांतून तिची परिणामकारक अंमलबजावणी करण्याकडे लक्ष्य पुरवावें लागते. नागपूर येथें एक मजूर न्यायालय असून मजूरांचे हितरक्षणासाठी लेबर ऑफिसर्स नेमण्यांत आलेले आहेत.

कामगार कल्याण :

कामगार कल्याणाच्या दृष्टीनें नागपूर येथें दोन बहुव्यवसाय संस्था चालविण्यांत येतात. त्या ठिकाणीं नर्सिंग स्कूल, कलाकुसर, प्रौढ शिक्षण, शारिरिक शिक्षण, वाचनालय, खेळ, संगीत आदि कार्यक्रम चालतात. योजना अखेर अशा आणखी दोन संस्था येथे निघतील. कामगारांची कार्यक्षमता वाढवण्यासाठीं श्रम आणि रोजगार मंत्रालयामार्फत एक कामगार शिक्षण केन्द्र नागपूर येथें चालविण्यांत येते. तसेच राज्य सरकार मार्फत कामगार विमा योजना अस्तित्वांत असून नुकतीच ती कामगारांच्या कुटुंबांसाठी ही लागू करण्यांत आली आहे. त्या योजनेखाली कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकीय मदत मिळते. कामगारांना उद्योग धंदा मिळवून देण्याचें कामीं एम्प्लॉयमेंट एक्स्चज महत्त्वाची कामगिरी बजावित आहे.

उद्योगधंद्यासाठी वीज पुरवठा

वीज हा औद्योगिकरणाचा पाया आहे. एखाद्या उद्योगधंद्याच्या विकासामध्यें स्वस्त विजेच्या पुरवठ्याला अतिशय महत्त्वाचें स्थान असतें. नागपूर जिल्ह्याला खापरखेडा थर्मल पॉवर स्टेशन मधून वीज पुरवठा होतो.

खापरखेडा योजना सन १९५१ सालीं प्रत्यक्षांत आली. प्रथम ३०,००० किलोवॅट वीज निर्माण करण्याची क्षमता असलेलें हें केन्द्र नुकतेच वाढवलें गेले असून सध्यां ६०,००० किलो वॅट वीज निर्माण करण्यांत येते. तींत आणखी वाढ करण्यांत येणार आहे.

ह्या केन्द्रांतून निर्माण होत असलेली वीज नागपूरमधील विविध प्रकारच्या ग्राहकाला नागपूर इलेक्ट्रिक लाईट व पावर कंपनीमार्फत पुरविली जाते. इतरांना महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड आपल्या ग्रिडमधून पुरविते.

ग्रामीण वीज पुरवठा :

आधुनिक काळांत ग्रामीण विकासासाठीं अतिशय आवश्यक असलेली गरज म्हणजे पुरेसें विद्युत् उत्पादन आणि योग्य तऱ्हेनें ग्रामीण भागांत वीज खेळविणें ही होय.

शेतीसाठी वीज :

त्यायोगें शेतकऱ्यांना आपल्या शेतीस वीजेच्या पंपांच्या सहाय्यानें पाणी देणें सोपे होईल व उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल निर्माण करणें सोईचे होईल. त्याचप्रमाणें आपली उत्पादन क्षमता वाढवता येण्यासाठी कुटिरोद्योग करणारे लोक वीजेची मोठ्या उत्सुकतेने वाट पाहतात.

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डामार्फत नागपूर जिल्ह्यांतील २०५ खेड्यांना आतांपर्यंत वीज पुरवठा करण्यांत आला आहे.

कच्चा माल व खनिजें

कच्चा माल :

कृषिजन्य कच्चा माल नागपूर जिल्ह्यांत विपूल होतो. १९५७-५८ साली त्यांचे खालीलप्रमाणें उत्पन्न होतें :—

पीक	क्षेत्र (एकरांत)	उत्पन्न (टनांत)
ऊंस	१००	१००
गळीताचीं पीके	११२,९००	१२,०००
तंबाखू	१,२००	३००
कापूस	१६४,९००	२०,०००

खनिज पदार्थ

कोळशाचा सांठा : महाराष्ट्रांत उत्कृष्ट दर्जाच्या व मध्यमदर्जाच्या कोळशाचा विपूल प्रमाणवर सांठा असलेला भाग म्हणून नागपूर जिल्ह्याकडे पाहिले जाते.

नागपूर जिल्ह्यांत येथें नव्यानेच स्थापन झालेल्या राज्य सरकारच्या भू-गर्भ आणि खाणकामविषयक विभागानें कोळसा शोधून काढण्याचें काम मोठ्या प्रमाणांत हातीं घेतलें आहे. कामठी कोलिएरीमध्यें २० फूट जाडीच्या थरांतून कोळसा मिळत आहे. त्याचें उत्पादन १७.५ दशलक्ष टन होऊं शकेल. ह्या कोलिएरीच्या पश्चिम भागांतील ६ चौरस मैल टापूंत ३५० दशलक्ष टन कोळशाचा सांठा असल्याचें आतां-पर्यंतच्या पाहणीवरून दिसून आलें आहे. पाहणीचें काम अजूनहि चालूं आहे. पूर्वीच्या २१ फूट जाडीच्या पहिल्या थरांतून सध्यां कोळसा काढण्यांत येत असून आणखी अनेक कोळशाचे थर सांपडले आहेत. यापैकी तिसऱ्या आणि चौथ्या थरांतील कोळसा पहिल्या प्रतीचा आहे. ह्या कामीं इंधन संस्थाहि मदत करते.

नागपूर शहराजवळ बोखारो आणि उमरेड या भागांत कोळशांच्या खाणीचा प्रथमच शोध लागला असून भू-गर्भ आणि खाणीविषयक खात्याचें पाहणीचें काम तेथें चालू आहे. उमरेड भागांत कोळशाचे आठ थर असल्याचे माहीत झाले असून तळाच्या थरांतील कोळसा पहिल्या प्रतीचा आहे. या विभागांत पाहणीचें काम अजूनहि चालू आहे. कोळशाच्या खाणीचा शोध लागलेल्या आणि न लागलेल्या विभागांत २,००० दशलक्ष टनापेक्षां अधिक सांठा असला पाहिजे असा अंदाज आहे. १९५७ सालीं ५१,०७० टन व १९५८ सालीं ६३,०३० टन कोळसा काढण्यांत आला.

मँगनीज : नागपूर जिल्ह्यांत भारतांतील फार मोठे अशुद्ध मँगनीजचे सांठे आहेत. सावनेर तहसिलींतील खापा येथून सुरूं झालेल्या १५ मैल रुंदीच्या पट्ट्यांत मँगनीजचें विपूल सांठे आहेत. हा पट्टा पुढें रामटेकपर्यंत जातो.

गुमगांव, रामडोंगरी, कोदेगांव, मंसर, कांद्री, जुनेवाणी खापा आदि १६ ठिकाणीं अशुद्ध मँगनीजचीं प्रमुख केन्द्रें असून पुष्कळशा खाणींतून ओपन कास्ट क्वारिंग पद्धतीनें आणि मजूर लावून मँगनीज काढले जातें. कांही थोड्या खाणींतूनच यंत्रसामुग्री बसवावी लागली आहे.

या विभागांत सांपडणाऱ्या उच्च प्रतीच्या मँगनीज व्यतिरिक्त नागपूर जिल्ह्यांतील खापा आणि रामटेकच्या उत्तर आणि पश्चिम कन्हान आणि पेंच नद्यांच्या मध्यें असलेल्या जंगलांत हलक्या प्रतीचे मँगनीजचे सांठे आहेत. या सांठ्यामध्ये सिलीकाचें प्रमाण अधिक आणि मँगनीजचें प्रमाण कमी असल्यानें विशेष मँगनीज काढलें जात नाहीं. १९५७ साली ११९,०८२ टन व १९५८ सालीं १०३,३५९ टन मँगनीज काढण्यांत आलें.

लोखंड :

नागपूर जिल्ह्यांत अशुद्ध लोखंडांचे सांठे भिवापूरच्या उत्तरेस २ मैलावर आहेत. तथापि हा सांठा फार थोडा असून त्यांत शुद्ध लोखंडाचा अंश ५५ ते ५८ टक्के आहे.

चुनखडी :

रामटेक व सावनेर तहसिलींत जेथें मँगनीज सांपडतें अशा भूभागांत रेतीमिश्रित अशा चुनखडीचे सांठे आढळतात. ह्या सांठ्यापैकीं कान्द्री, पटगोवारी आणि देवलापार जवळ सांपडणारी चुनखडी बऱ्या दर्जाची असून सध्यां ह्या सांठ्याचा उपयोग करून घेण्यांत येत आहे. १९५७ सालीं १४५ टन व १९५८ सालीं ६०७ टन चुनखडी काढण्यांत आली.

अभ्रक :

नागपूर तहसिलींत अभ्रक विपूल सांपडते.

चिकणमाती :

नागपूर जिल्ह्यांतील खैरी, बाजारगांव, शेमदा, कळमेश्वर, सोनापूर व काटोल तहसिलींतील बऱ्याच ठिकाणीं चिकणमाती मिळते. चिनीमाती कोळसा विभागांत सांपडते. ह्या मातीच्या सहाय्यानें चिनी-मातीचीं भांडीं, रिफ्रॅक्टरीज व विटा तयार करण्यांत येतात. १९५७ सालीं, २३,७७० टन व १९५८ सालीं ४९,५४३ टन माती काढण्यांत आली. इमारती दगडाचेंहि उत्पन्न बरेच होतें.

गेरू :

गेरू हा नैसर्गिक रंग असून तो ह्या जिल्ह्यांत बऱ्याच मोठ्या प्रमाणांत सांपडतो. बहुतेक ठिकाणीं सांपडणारा गेरू पिवळ्या रंगाचा असून अशुद्ध स्वरूपांत आहे. पिवळ्या रंगाचा गेरू अनेक ठिकाणींसांपडत असला तरी तो अजून खाणींतून काढण्यांत येत नाहीं.

उज्वल भविष्यकाल :

मागील औद्योगिक परंपरा, इंधनाची विपूलता, वाहतूक साधनांची सुविधा, खनिज संपत्तीची संपन्नता ह्यामुळें ह्या विभागांतील औद्योगिक विकास फार झपाट्याने घडवून आणण्यासाठीं विविध योजना आखण्यांत येत आहेत. खापरखेड्याची विद्युत् निर्मितिक्षमता आणखी वाढण्यासाठीं प्रयत्न चालू असून खनिज संपत्तीचा वापर मोठ्या प्रमाणांत करण्यांत येत आहे. त्यामुळें नागपूर जिल्ह्याचे औद्योगिक भवितव्य उज्वल आहे.

दळणवळण

जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेंत वाहतुकीच्या साधनांना फार महत्त्वाचें स्थान आहे. नागपूर जिल्ह्यांत रस्त्यांच्या व रेल्वेच्या सोई उत्कृष्ट व विकसित अशा आहेत. त्याचबरोबर नागपूर हे विमान मार्गावरील मध्यवर्ति ठिकाण आहे. तसेच पोस्ट, तारखाते, नभोवाणी, वृत्तपत्रें व वाचनालयें यांच्या सुविधा येथें उपलब्ध आहेत. त्यांची माहिती खालील प्रमाणें :—

रस्ते : राष्ट्रीय राजरस्ते, राज्य राजरस्ते व प्रमूख व इतर सडकांचे जिल्ह्यांत जाळेंच विणण्यांत आल्याचे दिसून येते.

१९५७-५८ सालीं वेगवेगळया प्रकारचे ४५१ मैलाचे रस्ते जिल्ह्यांत होते तर १९५८-५९ सालीं तेच मैलांतर ४६२ पर्यंत पोंचले. त्यांतील ४१८ मैलांचे रस्ते चांगले पक्के असून ४४ मैलाचे साधे रस्ते होते.

ह्यांतील राष्ट्र राज्यरस्ते ३० टक्के लांबीचे असून राज्य राजरस्ते २५ टक्के लांबीचे आहेत.

जिल्ह्यांतील रस्त्यांचे प्रमाण दर हजार चौरस मैल क्षेत्रफळामागे ११७ मैलान्तरांचे रस्ते असे असून दर लाख लोकवस्तीमागे ३४ मैलांतराचे रस्ते असे प्रमाण पडतें.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनाअखेर जिल्ह्याच्या १ हजार चौ. मैल क्षेत्रफळाशी रस्त्याचे प्रमाण १५५ मैल व दर लाख लोकवस्तीमागे ४५ मैलापर्यंत नेण्याचे निर्धारित करण्यांत आले होते. त्यानुसार १४६ मैलांचे रस्ते तयार करण्यांत येणार होते. त्याखालीं जलालखेडा-काटोल हा २१ मैल रस्ता, नयाकुंड रस्ता ६ मैल आणि सावरगांव तें नरखेड १० मैल रस्ता व इतर महत्त्वाचे रस्ते घेण्यांत आले.

नागपूर योजनेनुसार दर हजार चौरस मैल क्षेत्रफळामागें ३०५ मैलांतराचे रस्ते व दर लाख लोकवस्तीमागें १६१.५ मैल रस्ते हवेत.

वर नमूद केलेल्या १४६ मैलाच्या रस्त्यामध्ये १२ मैल राज्य राजरस्ते, ८४ मैल प्रमुख रस्ते व ५० मैल जिल्हा रस्त्यांचा अंतर्भाव आहे.

ह्या रस्ते बांधणी कार्यक्रमांवर, रस्ते विकास योजना व समाजविकास योजना यांच्यामधून ८१.८३ लाख रुपये खर्च निर्धारित होता.

ह्या खेरीज अस्तित्वांत असलेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीची कामेही वेळोवेळीं चालूं असतात. ह्यामुळें जिल्ह्यांतील रस्त्यांचे अंतर ५९८ मैल होईल.

जिल्ह्यांतील प्रमुख मार्ग : नागपूरहून अमरावती, भंडारा, चांदा, वर्धा, काटोल ह्या राज्यांतर्गत, छिंदवाडा, जबलपूर ह्या मध्यप्रदेशांतील व अलाहाबाद ह्या ठिकाणांना जाणाऱ्या सडका प्रमुख होय. ह्या सडकांना मध्ये मध्यें येऊन मिळणारे जोडरस्ते बरेच आहेत.

ह्या रस्त्यांवर महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन व सी. पी. ट्रान्सपोर्ट सर्व्हिसच्या नियमित धावणाऱ्या बसमधून प्रवाश्यांची वाहतूक चालू असते.

वाहतूक : आंतरराज्य वाहतूकही राष्ट्रीय मालकीच्या वाहनांनी होते. सामान व कांही ठिकाणी प्रवाशी वाहून नेणाऱ्या खाजगी मालकीच्या मोटारीहि चालतात. महाराष्ट्र कॉर्पोरेशनच्या वाहनाची दुरुस्ती करण्यासाठीं नागपूर येथें एक व्यापक असें वर्कशॉपही आहे.

शासकीय सेंट्रल वर्कशॉप :

जिल्ह्यांत सरकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठीं उपयोगी पडावीत म्हणून विविध अधिकाऱ्यांकडे वाहन आहेत. त्यांच्या सर्विसिंगची व्यवस्था राखण्यासाठीं नागपूर येथें शासकीय सेंट्रल वर्कशॉप आहे.

विश्राम स्थानें :

जिल्ह्यांतील विविध प्रमुख सडकांवर खालील ठिकाणी सरकारी विश्रामस्थानें आहेत. नागपूर, बाजारगांव, काटोल, कोंढाळी, उमरेड, पांचगांव, भिवापूर, मन्सर, देवलापार, मौदा, सावनेर व पिपळा.

लोहमार्ग :

जिल्ह्यांत मध्य व दक्षिण-पूर्व रेल्वेचे जाळे आहे. रेल्वे फाटचाचे अंतर २०६ मैल आहे. त्यांतील ब्रॉडगेज रेल्वेचे मैलांतर १२९ असून नॅरोगेज रेल्वेचे अंतर ७७ मैल आहे.

लोहमार्गाचे प्रमुख फाटे :

नागपूर—मुंबई.
नागपूर—दिल्ली.
नागपूर—छिंदवाडा.
नागपूर—कलकत्ता.
नागपूर—चांदा.

भारतांतील इतर भागांतील रेल्वेचे क्षेत्रफळ व लोकसंख्येशी प्रमाण विचारांत घेता नागपूर जिल्ह्यांत हे प्रमाण फारच चांगले असल्याचे दिसून येते.

भारतांतील दर १०० चौरस मैलास रेल्वेचे २८ मैल प्रमाण आहे तर नागपूर जिल्ह्यांत हे प्रमाण ५४ मैल आहे. दर लाख वस्तीमागे हे प्रमाण १७ मैल पडते. भारतांत हे प्रमाण १० आहे.

जिल्ह्यांत निरनिराळ्या मार्गांवर खालील ४४ स्टेशनें आहेत :—

ब्रॉडगेज :

(१) नागपूर (म. रे. व द. पू. रे. स्टेशन)
(२) इतवारी.
(३) कळमना.
(४) कामठी.
(५) कन्हान.
(६) डुमरीखुर्द.
(७) रामटेक.
(८) मन्सर.
(९) सालवा.
(१०) चाचेर
(११) थारसा.
(१२) रेवदळ..
(१३) खात.
(१४) बोरखेडी.
(१५) बोरी.
(१६) गुमगांव.
(१७) खाप्री.
(१८) भरतवाडा.
(१९) कळमेश्वर.
(२०) कोहळी.
(२१) मेटपांजरा.
(२२) काटोल.
(२३) कळंबा.
(२४) नरखेड.

नॅरो गेज :

(१) इतवारी.
(२) भांडवाडी.
(३) दिघोरी.
(४) तितूर.
(५) माहुर्ला.
(६) कुही.
(७) मोहद्रा.
(८) बामणी.
(९) उमरेड.
(१०) भिवापूर.
(११) कोराडी.
(१२) खापरखेडा
(१३) पिपला.
(१४) पाटणसावंगी टौन.
(१५) पाटणसावंगी.
(१६) टाकळी.
(१७) मालेगांव.
(१८) सावनेर.
(१९) केळवद.
(२०) खापा.

विमान मार्ग : नागपूर शहर विमानमार्गांनीं मुंबई, कलकत्ता, दिल्ली व मद्रास शहरांशी जोडले गेले आहे. नागपूर भारताच्या मध्यवर्ति ठिकाणीं असल्यानें विमान मार्गाचेही केन्द्रस्थान बनलेले आहे.

नागपूर येथील विमानतळ शहरापासून वर्धा रोडवर ५ मैलावरील सोनेगांव ह्या ठिकाणीं आहे. त्याचे कार्यालय नागपूर स्टेशन जवळ आहे. सोनेगांव विमानतळावर विमानांची वाहतूक रात्रौं चालूं असते. रात्रौं १ पासून ३ चे दरम्यान मुंबई ते नागपूर, कलकत्ता ते नागपूर, मद्रास ते नागपूर व दिल्ली ते नागपूर अशी विमानें उतरतात व तीच पुढे नागपूर ते मुंबई, नागपूर ते कलकत्ता, नागपूर ते दिल्ली व नागपूर ते मद्रास अशा प्रवासासाठीं उड्डाण करतात. एवढ्या अल्पकाळांत विमानांची रहदारी होत असल्याने त्यावेळीं विमानतळ हे नागपूरचे एक आकर्षक स्थान बनले आहे. टपालाची वाहतूकही विमानमार्गे करण्यांत येत असते.

पोस्ट व तारखातें : नागपूर जिल्ह्यांत जनरल पोस्ट ऑफिस, नागपूर व सेंट्रल टेलिग्राफ ऑफिस, नागपूर, ही पोस्ट व तार खात्याची प्रमुख ऑफिसे होत.

जिल्ह्यांत पोस्ट व तारखात्यांच्या कचेऱ्यांची सोय पुष्कळ ठिकाणीं आहे. सर्व तहसिलीची ठिकाणें, म्युनिसिपालिटयांची ठिकाणें व प्रमुख शहरें ह्या सोईंनी जोडलेली आहेत. १९५८-५९ सालीं जिल्ह्यांत २०५ गांवी पोस्ट कचेऱ्या व ३१ गांवीं तार कचेऱ्या होत्या.

नागपूर नभोवाणी केन्द्र :

नागपूर येथे पश्चिम विभागांतील एक आकाशवाणी केन्द्र आहे. माहिती प्रसारास व ह्या भागाच्या सांस्कृतिक व आर्थिक उत्थापनास त्याची बरीच मदत होते.

वर्तमानपत्रें

वृत्तपत्रांना आवाहन :

वृत्तपत्रें ही महान्‌शक्ति आहे. भारतांतील वृत्तपत्रांची व विशेषेकरून या राज्यांतील वृत्तपत्रांची परंपरा अतिशय उज्वल आहे असा सार्थ अभिमान बाळगतां येतो. स्वातंत्र्याच्या चळवळींत वृत्तपत्रांनीं बहुमोल कामगिरी बजावलेली आहे. नवीन राज्य संपूर्णतया यशस्वी व्हावे म्हणून सरकार वृत्तपत्रां-कडून सहकार्याची अपेक्षां करीत आहे. शासनांतील चुका दुरुस्त करणें व हितकारक गोष्टींना पाठिंबा देणें अशी दुहेरी भूमिका वृत्तपत्रें बजावित असतात. पहिल्या भूमिकेंत ती प्रशासनांतील उणीवा टिपून काढतात व दुसऱ्या भूमिकेनुसार तीं चांगल्या कामांचा हिरीरीनें पुरस्कार करतात. सरकारच्या अनेक कल्याणविषयक योजनांमध्यें जनतेचे संपूर्ण सहकार्य मिळविण्याचे कामीं वृत्तपत्रें मदत करतील अशी सरकारची अपेक्षा आहे.

—मार्गदर्शक तत्त्वें

सार्वजनिक दळणवळणाचे साधन म्हणून वर्तमानपत्रांचे कार्य फार महत्वाचे असते. नागपूर जिल्हयांत आणि विशेषत: नागपूर शहरांत वर्तमानपत्रें फार मोठ्या प्रमाणांत प्रसिद्ध होतात. त्यांची वर्गवारी खालील प्रमाणें:—

दैनिकें	११
अर्धसाप्ताहिकें	१
साप्ताहिकें	१०
द्विसाप्ताहिकें	१
मासिके	११
एकूण	३४

इंग्रजी दैनिकें २ असून इंग्रजी साप्ताहिक १ आहे. मराठी दैनिकें ४ असून १ सायंदैनिक आहे. साप्ताहिकें ४ आहेत. मराठी द्विसाप्ताहिक १ आहे. मराठी मासिकें ९ आहेत. २ साप्ताहिकें मराठी व हिंदींतून निघतात तर १ मासिक मराठी व हिंदींतून निघते. हिंदी भाषेंतून ३ दैनिके, १ सायंदैनिक, १ अर्धसाप्ताहिक, २ साप्ताहिकें व २ मासिकें प्रसिद्ध होतात. १ साप्ताहिक संस्कृतमधून निघते.

देशांतील निरनिराळ्या भागांत प्रसिद्ध होणाऱ्या विविध नियतकालिकांचाही येथे मोठ्या प्रमाणांत खप होतो.

नागपूर येथून प्रसिद्ध होणारी कांही नियतकालिके

हितवाद.—इंग्रजी दैनिक—सर्व्हंटस्‌ ऑफ इंडिया सोसायटी प्रकाशन.
संपादक : श्री. ए. डी. मणी.

नागपूर टाईम्स—इंग्रजी दैनिक—नवसमाज लि., प्रकाशन.
संपादक : श्री. डी. टी. देशपांडे.

तरुण भारत.—मराठी दैनिक—नरकेसरी प्रकाशन लि., प्रकाशन नागपूर व पुणे आवृत्त्या.
संपादक : श्री. ग. त्र्यं. माडखोलकर.

महाराष्ट्र.—मराठी दैनिक—शिवराज प्रकाशन.
संपादक : श्री. पी. डी. ढवळे.

युगधर्म.—हिंदी दैनिक—नरकेसरी प्रकाशन लि., प्रकाशन, नागपूर व जबलपूर आवृत्त्या.
संपादक : श्री. सत्यपाल पटाईत.

नवभारत.—हिंदी दैनिक—नागपूर-भोपाळ, जबलपूर व रायपूर आवृत्त्या.
संपादक श्री. रामगोपाल महेश्वरी.

लोकमान्य.—हिंदी दैनिक—नागपूर व कलकत्ता आवृत्या.
संपादक : श्री. कृपाशंकर त्रिपाठी.

सुदर्शन.—मराठी दैनिक—नागपूर व औरंगाबाद आवृत्या.
संपादक : श्री. व्ही. आर्. तुळजापूरकर.

राष्ट्रदूत.—हिंदी सायंदैनिक.
संपादक : श्री. हरिकिशन आगरवाल.

जयविदर्भ.—मराठी सायंदैनिक.
संपादक : श्री. टी. जी. देशमुख.

नागपूर समाचार.—मराठी सायंदैनिक.
संपादक : श्री. एन्. एल्. राव.

नवप्रभात.—हिंदी अर्ध साप्ताहिक.
संपादक : श्री. नंदकिशोर.

चव्हाटा.—मराठी साप्ताहिक.
संपादक : श्री. बा. ना. सावजी.

मन्वंतर.—मराठी साप्ताहिक.
संपादक : श्री. चलपे व श्री. काळे.

ह्या व्यतिरिक्त अंदाज, मन्वंतर, बुद्धभारत, कृषक जगत, नागरिक जीवन, भवितव्यम्, बालविकास, समाजोन्नति, तुषार, मुलांचे मासिक, युगवाणी, सुषमा, रेखा, उद्यम, न्यायबोध, सेवा-सहकार, कामगार पत्रिका, बाल विद्या आदि नियतकालिकें प्रसिद्ध होतात.

बाहेरच्या वृत्तपत्रांचे नागपुरांतील प्रतिनिधी

मुंबईच्या फरी प्रेस जर्नल, इंडियन एक्स्प्रेस, लोकसत्ता, नवाकाळ, मराठा, टाईम्स ऑफ इंडिया, पुण्याच्या केसरी, सकाळ व कलकत्त्याच्या स्टेट्समनचे प्रतिनिधी येथें आहेत.

वृत्त संस्था :

येथें पांच वृत्तसंस्था आहेत :—

(१) प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया, नागपूर.
(२) हिंदुस्थान समाचार, नागपूर.
(३) विभागीय प्रसिद्धि कचेरी, राज्य शासन, नागपूर.
(४) प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो, केन्द्रिय शासन, नागपूर.
(५) इंडियन न्यूज सर्विस, नागपूर.

६. शिक्षण

प्रगतीचे मुख्य साधन :

आर्थिक विकास व भरभराट यांसह सर्व प्रकारच्या प्रगतीचें शिक्षण हें मुख्य साधन असल्यामुळें शिक्षणाची जास्तींत जास्त वाढ होईल अशी परिस्थिति निर्माण करण्यासाठीं राज्याकडून प्रयत्न करण्यांत येतील. शिक्षणाचीं दारें सताड उघडीं करून खालच्या थरांपर्यंत तें पोहोंचविले पाहिजे. हें ध्येय साध्य केल्यास व शेवटच्या कणापर्यंत आम्हीं विचार आणि शिक्षणाचे प्रकाशझोत नेल्यास, महाराष्ट्राची शक्ति जबरदस्त वाढेल व तिचा उपयोग महाराष्ट्र राज्याच्याच नव्हे तर संपूर्ण देशाच्या विकासासाठीं करून घेतां येईल.

आर्थिक प्रगतींत शिक्षणाला किती महत्व आहे याचा विचार करतांना साहजीकपणेंच तांत्रिक शिक्षणाच्या महत्वाकडें लक्ष वेधलें जाते. औद्योगिकरणासाठीं असलेल्या मास्टर प्लॅनसारखी योजना पुरेशा तांत्रिक ज्ञान असणाऱ्या लोकांच्या उपलब्धतेशिवाय यशस्वी होऊं शकत नाहीं. कारण तांत्रिक लोकांच्या तुटवडयामुळें विकासाच्या मार्गांत अडथळें निर्माण होतील, म्हणून औद्योगिक व आर्थिक प्रगतीला सहाय्य करण्याच्या दृष्टीनें तांत्रिक प्रशिक्षणाच्या व शिक्षणाच्या इतर सोई वाढविण्याचा सरकार जास्तींत जास्त प्रयत्न करील. विज्ञानाविषयीं तरुण पिढीच्या मनांत आस्था निर्माण करणें हे सर्व संबंधित लोकांचे कर्तव्य आहे.

शिक्षणाला सामाजिक महत्वही आहे. उच्चशिक्षणाच्या सोयी बहुधा थोडयाशा मोठाल्या शहरांतच केन्द्रित झालेल्या असल्यामुळें, ग्रामीण विभागांतून शहरांतील महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा आपल्या ग्रामीण जीवनाशीं असणारा संबंध तुटतो. सामाजिक, सांस्कृतिक तसेंच आर्थिक दृष्टयाही हे अनिष्ट आहे.

उच्च अभ्यासासाठीं असणाऱ्या व्यवस्थेचें विकेन्द्रिकरण केल्यानें व माध्यमिक शिक्षणाच्या पद्धतीची पुनर्रचना केल्यानेंच ही समस्या सोडवितां येईल. यामुळें माध्यमिक शाळांतून निरनिराळया धंद्यांचे व तांत्रिक विषयांचे शिक्षण देतां येईल.

—मार्गदर्शक तत्त्वें.

१९६१ साली घेण्यांत आलेल्या शिरगणतीचा निष्कर्ष :

लिहितां वाचतां येणे ही शिक्षणाची कसोटी धरून लोकसंख्येचा अभ्यास केला असतां नागपूर जिल्हयाच्या लोकसंख्येंत साक्षर लोकांचे प्रमाण ३५.०४ इतके आहे. एकूण महाराष्ट्र राज्याचा विचार केला असतां बृहन्मुंबई सोडल्यास राज्याच्या सर्व जिल्ह्यांत साक्षरतेच्या बाबतींत नागपूर जिल्हा आघाडीवर असल्याचे दिसून येते.

प्रगतीशील राज्यांतील प्रगतीशील जिल्हा म्हणून नागपूरचे शैक्षणिक क्षेत्रांतील कामगिरीमुळें वर्णन करतां येईल.

१९५१-६० चा शैक्षणिक अहवाल :

नागपूर जिल्ह्यांत नागपूर, सावनेर, काटोल, रामटेक व उमरेड हे पांच तालुके आहेत. बहुतांश लोकांची मातृभाषा मराठी आहे.

१९५१ ते १९६० च्या दरम्यान जिल्ह्यांत शैक्षणिक संस्था व विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणांत वाढ झाली. ही वाढ विशेषतः १९५७ नंतर विशेष दिसते. साहजिकच त्याच प्रमाणांत शिक्षकांची संख्याही वाढली. शैक्षणिक सवलती मात्र चालू ठेवण्यांत आल्या. पूर्वी अस्तित्वांत असलेली जिल्हा लायब्ररीची योजना चालू ठेवण्यांत आली. त्याचबरोबर ग्रामीण वाचनालयांची योजना लागू करून ती वाढविण्यांत आली. समाज शिक्षणाचा कार्यक्रम विस्तृत करण्यांत आला. विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड

निर्माण करण्याच्या दृष्टीनें क्रीडा महोत्सव संघटीत करून चांगले कार्य करण्यांत आले. मुलांमध्यें शिस्त-गुण वाढावे म्हणून ए.सी.सी., एन.सी.सी. व मध्यवर्ति सरकार पुरस्कृत राष्ट्रीय शिस्त योजना आदी कार्यक्रम राबविण्यांत आला. बडोदा येथें झालेल्या क्रीडा महोत्सवांत नागपूर जिल्हयानें व्हॉलीबॉल अजिंक्यपद व लोक नृत्य अजिंक्यपद मिळविले. ह्या कार्यक्रमावर देखरेख ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या संख्येंत वाढ करण्यांत आली. विकासगटांत असणारे समाजशिक्षण संघटक देखील ह्या शाळांना भेटी देतात.

जिल्हयांतील प्राथमिक शिक्षण ग्रामीण भागांत जनपद सभाद्वारां व नागरी भागांत म्युनिसिपल कमिटी व म्युनिसिपल कॉर्पोरेशन द्वारा चालविण्यांत येते. नागरी विभागांत कांहीं खाजगी संस्थाही चालतात त्यांना शिक्षण खात्यामार्फत आर्थिक अनुदान देण्यांत येते.

प्राथमिक शिक्षण :

शासनाद्वारे २ शाळा चालविण्यांत येतात. त्यांतील एक कामठी येथील बेसिक ट्रेनिंग कॉलेजला संलग्नित असून दुसरी वनविभागामार्फत चालविली जाते.

प्राथमिक शाळांचे दोन प्रकार आहेत :—

(१) लोअर प्राथमिक १ ली ते ४ थी पर्यंत, व
(२) अपर प्राथमिक १ ते ७ वी पर्यंत.

दुसऱ्या प्रकाराला इंडियन मिडल स्कूल म्हणतात. ह्या शाळांतून मातृभाषेंत शिक्षण दिले जाते. हा प्रकार सर्वसामान्यरित्या ग्रामीण भागांत आढळतो. ह्या शाळांतून पास होणारे विद्यार्थी बहुधा टिचर्स ट्रेनिंग कॉलेज अथवा नोकरींत प्रवेश करतात. लोअर प्राथमिक शाळेंतील विद्यार्थ्यानें प्रायमरी सर्टिफिकेट परिक्षा उत्तीर्ण केल्यावर तो दुय्यम शाळेंतील वर्गांत जाण्यास पात्र होतो. ज्या अप्पर प्राथमिक शाळेंत इंग्रजी भाषा ऐच्छिक म्हणून शिकविली जाते तेथील तसा विद्यार्थी ७ वी पास झाल्यावर दुय्यम शाळेच्या ८ वींत बसण्यास पात्र होतो.

१९५१ पासून नागपूर जिल्हयानें शैक्षणिक क्षेत्रांत बरीच प्रगती केली. १९५८-५९ पर्यंत शाळांची संख्या ७२ प्रतिशतनी वाढली. विद्यार्थ्यांची संख्याही ६३ प्रतिशतनीं वाढल्याचे दिसून येते. त्या शाळांत १९५९-६० साली आणखी ३३ नी भर पडली. तर विद्यार्थी ३,४७९ नीं वाढले.

शाळा व विद्यार्थी :

शाळा	१९५८-५९		१९५९-६०	
	शाळा	विद्यार्थी	शाळा	विद्यार्थी
शासकीय	२	१७९	२	१३९
जनपद	६१२	४४,९५५	६३०	४६,००३
म्युनिसिपल कमिटी ...	१५०	४०,७५१	१५८	४२,७१२
मदत	४९	८,४०१	४९	८,३६०
बिनामदत	२	५७६	९	१,१२७
	८१५	९४,८६२	८४८	९८,३४१

ह्या वरून शिक्षणाची गरज जनतेंत वाढत असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणें सक्तीचे शिक्षणाची मोहिमही लोकप्रिय होत आहे असे दिसते.

शाळा व विद्यार्थी वाढले. त्याच प्रमाणांत शिक्षकांची संख्याही अर्थातच वाढली. १९५८-५९ मध्यें जिल्ह्यांतील प्राथमिक शाळांत ३,०९६ शिक्षक होते. विद्यार्थी व शाळा वाढल्याने १९५९-६० सालीं शिक्षकांची संख्या वाढवावी लागली. त्या साली ती संख्या ३,२५३ वर गेली त्यापैकीं २,३८८ विनित शिक्षक आहेत. मागील साली हीच संख्या २,२९६ होती. १९५९-६० सालीं विनित शिक्षकांना वेगळी वेतन श्रेणी देण्यांत आल्यानें जादा झालेला खर्च सरकारनें सोसला. सर्वसाधारणपणें १ शिक्षकाला ४० विद्यार्थी हे प्रमाण पडते. जिल्ह्यांत एक शिक्षकी शाळा २८३ होत्या. त्या सर्व ग्रामीण भागांत आहेत.

शाळा इमारतीची सर्वत्र वाणवा होती. त्यामुळें दुबार पद्धतीनें शाळा भरवावी लागे. ही उणीव भरून काढण्यासाठीं समाजविकास गटांच्या सहाय्यानें प्रयत्न करण्यांत आले आणि त्यामुळे विकास क्षेत्रांतील प्रश्न सुटण्यास मदत झाली. नागपूर कॉर्पोरेशनने देखील कॉर्पोरेशन विभागांत शाळा इमारती बांधल्या. शाळेसाठी क्रीडांगणाची चणचण नागरी विभागांत भासते.

शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी निरिक्षक वर्गानें शिक्षकांना निरिक्षणाचे वेळीं शिक्षणाचे पद्धती विषयीं मार्गदर्शन करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. शिक्षण क्रमांतहि आवश्यक तो फरक करण्यांत आला. मूलोद्योग प्रशिक्षण केन्द्रांची वाढ केल्यानें विनित शिक्षकवर्ग मिळण्याची सुविधा झाली. केन्द्रिय शाळांमधील विनित शिक्षक आपल्या ताब्यांत असलेल्या शाळांतील शिक्षकांना मार्गदर्शन करतात.

मूलोद्योग शिक्षण :

१९५८-५९ सालीं जिल्ह्यांत ६ सिनियर बेसिक स्कूल्स चालू करण्यांत आले. त्यांत १,८६६ विद्यार्थी शिक्षण घेत होते. ह्या शाळांतून ५३ विनित शिक्षक काम करीत होते. जनपदांनी २७ ज्युनियर बेसिक स्कूल्स काढले. जिल्ह्यांतील १४ बेसिक ट्रेनिंग कॉलेजांपैकी कामठी येथील कॉलेज शासनामार्फत चालविण्यांत येते. ह्या कॉलेजामधून सूतकताई, विणकाम व बागायत हे उद्योग शिकविले जातात. त्यांतून समवाय कसा साधावा हे शिकविले जाते. ह्यांत ९६१ पुरुष शिक्षक व २४ महिला शिक्षक प्रशिक्षण घेतात. ह्या कॉलेजांवर १,५०,४४० रुपये खर्च झालें. त्यांतील १,०६,४६७ रुपये शासनानें दिले.

मूलोद्योगी शाळांमधून चांगले कातण्यांत येणारे सूत विणकामासाठी वापरले जाते तर टाकाऊ सुतापासून दोर वळतात. ह्याबरोबर विद्यार्थ्यांमध्यें विधायक दृष्टी बाणवण्यासाठीं प्रयत्न करण्यांत येतात. ह्या शाळांतून निर्माण झालेला माल नियमित भावाने विकला जातो. चांगल्या वस्तू प्रदर्शनांत ठेवल्या जातात.

सुशिक्षित बेकार लोकांना काम पुरविण्याचे उद्देशानें दोन मूलोद्योगी शाळेंत आठवा वर्ग काढण्यांत आले.

दुय्यम शिक्षण :

जिल्ह्यांतील दुय्यम शिक्षण (१) शासन, (२) म्युनिसिपल कमिटीज, (३) जनपदसभा व (४) खाजगी संस्थांद्वारे चालविण्यांत येते. परंतू बहुतांश हायस्कूलें ही खाजगी मालकीची आहेत.

दुय्यम शाळांचे ३ प्रकार आहेत (१) हायर सेकंडरी, (२) हायस्कूल, (३) आय. इ. एम्. स्कूल. ह्यांतील तिसऱ्या प्रकारांत ५ वी ते ८ वी चे वर्ग असतात. दुसऱ्या प्रकारांत ५ वी ते १० वी चे वर्ग असतात तर पहिल्या प्रकारांत ५ वी ते ११ वी चे वर्ग असतात.

बहुव्यवसाय प्रशाळा :

जिल्ह्यांत १ शासकीय व १३ खाजगी बहुव्यवसाय प्रशाळा चालू करण्यांत आलेल्या आहेत. त्यांचा दर्जा हायर सेकंडरी स्कूल इतका असतो. ह्या शाळांतून सूतकताई, विणकाम, धातू व सुतारकाम, बागायत, शेती, साबणकाम, मॉडेलींग, कलाकुसर आदि उद्योग शिकविण्यांत येतात. ह्या शाळांत शिकविण्यांत येणाऱ्या अभ्यास क्रमांत मानव अभ्यास, विज्ञान व जीवशास्त्र आणि वाणिज्य धरून तांत्रिक विषय शिकविण्याची सोय असते. ह्यांतून विद्यार्थी आपले विषय निवडतात.

दुय्यम शाळांत १९५८-५९ सालीं ८५ शाळा होत्या. त्यांत १९५९-६० साली २१ नी वाढ झाली तर ४,३८५ विद्यार्थी वाढले.

दुय्यम शाळांतील विद्यार्थ्यांची परीक्षा एका खास मंडळांमार्फत घेण्यांत येते.

नियंत्रणाचे दृष्टीने शाळांची वर्गवारी –

नियंत्रण	१९५८-५९		१९५९-६०	
	शाळा	विद्यार्थी	शाळा	विद्यार्थी
शासन	४	२,१८५	५	२,४७६
म्यूनिसिपल कमिटी ...	७	२,३१७	७	२,६८९
जनपद	१	१६९	५	९४७
मदत	७३	३४,९९५	८०	३७,४०६
बिगर मदत	...	...	९	५३३
	८५	३९,६६६	१०६	४४,०५१

दुय्यम शिक्षणाची गरज जनतेमध्यें वाढू लागल्यानें व सुविधा निर्माण झाल्यामुळें ही प्रगती झाली.

शिक्षक :

१९५८-५९ सालीं नॉन मॅट्रिक ट्रेन्ड १६, अनट्रेन्ड १५, अंडर ग्रॅज्यूएट ट्रेन्ड ३२५, अन्ट्रेन्ड ६५३ व ग्रॅज्युएट ट्रेण्ड ३४४ व अनट्रेन्ड २९८ शिक्षक होते तर १९५९-६० साली नॉन मॅट्रिक ट्रेन्ड १३, अनट्रेन्ड १४, अंडर ग्रॅज्युएट ट्रेन्ड ४३४, अनट्रेन्ड ६८६ व ग्रॅजूएट ट्रेन्ड ४०० व अनट्रेन्ड २८८ शिक्षक झाले. म्हणजेच १९५८-५९ सालीं ६८५ ट्रेन्ड शिक्षक व ९६६ अन्ट्रेन्ड म्हणजे एकूण १,६५१ शिक्षक होते तर १९५९-६० सालीं ट्रन्ड ८४७ व अन ट्रेन्ड ९८८ म्हणजेच १,८३५ शिक्षक जिल्हयांत काम करीत होते.

दुय्यम शाळा शिक्षक ट्रेनिंग :

दुय्यम शाळांतीळ शिक्षकांना ट्रेन्ड करणाऱ्या ७ संस्था असून त्यांत २७७ पुरुष व १४१ स्त्रिया शिक्षण घेतात.

जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना दुय्यम शिक्षण घेतां यावे म्हणून एका शिक्षकामागें ४५ विद्यार्थी वर्गात घेण्याची सवलत देण्यांत आली होती.

मान्यता असलेल्या शाळांना मान्य खर्चाच्या मानानें अनुदान देण्यांत आले.

विद्यार्थ्यांना गरीबी व हुशारी पाहून नादारी व स्कॉलरशिप्स देण्यांत आल्या. त्याचबरोबर ६ ते १४ वर्षे वयाच्या, अथवा शेतीविहिन शेतमजूराच्या मुलास अथवा २० एकरापेक्षां कमी शेतीधारकाच्या मुलास, राजकीय हालअपेष्टा सोसलेल्या लोकांच्या मुलांना अथवा ठराविक उत्पन्नवाल्या नोकरांच्या मुलांना वा हरिजन आणि आदिवासी मुलांना शैक्षणिक सवलती देण्याचे धोरण चालू ठेवण्यांत आले. तसेच पात्र अशा १० टक्के पर्यंत विद्यार्थींना नादारी देण्यांत येत आहे.

९०० च्या खाली वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांना शैक्षणिक सवलत देण्याचे धोरण लागू करण्यांत आले. ती मर्यादा आता १,२०० रुपयांपर्यंत नेण्यांत आली आहे. त्यामुळे ज्या लोकांना शिक्षणापासून गरिबीमुळें आतापर्यंत वंचीत रहावे लागले त्यांना शिक्षण मिळणे सुलभ झाले.

हिंदीचा प्रसार व्हावा म्हणून हिंदी शिक्षकावर होणाऱ्या खर्चांत शासन भागीदार होऊ लागले.

शिक्षकांचें पगार वाढवावे लागले आणि म्हणून सरकारनें अनुदान देण्याची पद्धत दुरुस्त केली.

खास शाळा :

संगीताच्या ३ शाळा असून त्यांत ४५३ विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांतील एका शाळेंत नृत्याचे शिक्षण दिले जाते.

संस्कृतच्या अध्ययनासाठी ३ शाळा आहेत. त्यांत १६२ विद्यार्थी शिक्षण घेतात.

अपंगांसाठीं ४ शाळा चालविण्यांत येतात.

आर्टस् शाळा :

चित्रकला विषय शिकविणारी १ शाळा असून तिच्यामध्यें १९ विद्यार्थी आहेत.

ह्या सर्वांना नियमानुसार अनुदानें देण्यांत येतात.

१४ दुय्यम शाळांतून एन्.सी.सी. ची पथके चालविण्यांत येतात तर ३६ शाळांतून ए.सी.सी. ची पथकें चालू आहेत.

बालक मंदिरें :

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील कार्यक्रमानुसार बालक मंदिराच्या योजनेला चालना देण्यांत आली व माँटेसरी पद्धतीने शिक्षण देणाऱ्या ५९ संस्था उघडण्यांत आल्या. त्यांच्यांत काम करणाऱ्या शिक्षकवर्गाला प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हयांत ३ केन्द्रें आहेत. पैकी १ शासकीय आहे. ह्यांतील एक नागपूर येथे आहे.

मागासलेल्या वर्गासाठी नादारी, दरमहा १२ रुपये स्टायपेंड, वर्गांत १० टके जागा रिझर्व ठेवणे व शासकीय चोखामेळा वसतीगृहांत रहाण्याची व भोजनाची सोय १९५९-६० सालांतही देण्यांत आली.

मुलींचे प्राथमिक शिक्षण :

समाजांत दिवसेंदिवस होत असलेल्या मानसिक परिवर्तनामुळे तसेच शासनाचे व खाजगी व्यक्तींचे प्रयत्नामुळें मुलींच्या शिक्षणाच्या प्रश्नाला चालना मिळत असून त्यांचे शाळेंत येण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. कांही ठिकाणीं सहशिक्षणहि दिले जात आहे.

१९५८-५९ साली मुलींच्या १२२ शाळा होत्या. त्यांत १९५९-६० सालीं ७ नी भर पडली. १९५८-५९ सालीं २७,२७७ मुली शाळांमधून शिकत होत्या तर १९५९-६० साली त्यांत १,१६४ ची भर पडली. त्यांच्यासाठी १९५८-५९ सालीं ७०७ शिक्षक होते तर १९५९-६० साली त्यांत ५० नी वाढ झाली.

कॉर्पोरेशन विभागांत मुलींनासुद्धा सक्तीचे शिक्षण नियम लागूं आहेत.

मुलींच्या शाळांत शिकविणाऱ्या शिक्षकांना वाढते स्केल द्यावे लागल्याने झालेला ज्यादा खर्च सरकारनें सोसला.

मुलींचे दुय्यम शिक्षण :

१९५८-५९ मध्यें मुलींना दुय्यम शिक्षण देणाऱ्या २७ शाळांपैकी १ शाळा शासकीय होती. १९५९-६० सालीं २ खाजगी शाळा वाढल्या. ह्या शाळांतून १९५८-५९ सालीं ८,६८० विद्यार्थीनी शिकत होत्या. १९५९-६० सालीं त्यांची संख्या २,२९८ नी वाढली. ह्या शाळांतून १९५८-५९ सालीं २८० ट्रेंड व १२० अनट्रेंड शिक्षक होते. १९५९-६० सालीं ३१४ ट्रेन्ड व १७५ अनट्रेन्ड शिक्षक होते. मुलींना शैक्षणिक सवलती देण्यांत आल्या.

शारीरिक शिक्षण :

जिल्हयांतील शाळांतून कवायत, खेळ आदी द्वारा शारिरिक शिक्षण देण्यांत येते. त्यासाठीं शिक्षक नेमण्यांत आले आहेत. राष्ट्रीय क्रीडामहोत्सवामुळे ह्या शिक्षणास चालना मिळाली.

शिक्षणप्रसारासाठीं खाजगी प्रयत्न : नागपूर जिल्ह्यामध्यें शिक्षणाचा संघटित प्रसार करण्याच्या उद्देशानें महाराष्ट्राचे अर्थ मंत्री बॅ. शेषराव वानखेडे यांचे नेतृत्वाखालीं महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था, नागपूर, नांवाची संस्था नव्यानेच स्थापन झाली.

ह्या संस्थेची नोंदणी करण्यांत आलेली आहे. तिच्याद्वारां जिल्ह्यांतील शिक्षण योजनांना चालना देणें, ग्रामीण भागांत खाजगी संस्थांनी दुय्यम शाळा काढणें, त्यासाठीं आर्थिक मदत व मार्गदर्शन करणें व शिक्षण क्षेत्रांतील अडचणींतून समाइकरित्या माग काढणें आदी कामे ही संस्था करते.

मोहपा, जलालखेडा, कोंढाळी, पाटणसांवगी मौदा, काटोल, नांदागोमुख, टाकळघाट, केळवद, खापा येथील शिक्षण संस्था ह्या संस्थेस संलग्नित झालेल्या असून बाकीच्या लवकरच करण्यांत येतील.

ह्या कार्यासाठी लागणारा पैसा देणग्यांद्वारां उभारण्यांत येतो.

दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळांत प्राथमिक व दुय्यम शिक्षण जास्त जीवनोपयोगी करण्याचे दृष्टीने प्रयत्न झाले. पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या सोई, सक्ति शिक्षण, शाळागृहांची वाढ, शिक्षकांना पगारवाढ आदी कार्यक्रमासाठीं शासनाद्वारे भरघोस रकमा देण्यांत आल्या.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतील शिक्षण विकास कार्यक्रम : दुय्यम शिक्षणाच्या विकास कार्यक्रमांत बिनसरकारी शाळांना अनुदानें देणे, शिक्षकांची पगारवाढ, बहुव्यवसाय शाळा उघडणें, बांधकाम व साहित्यासाठीं बिनसरकारी शाळांना अनुदानें देणें आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पालकाच्या मुलांना शिष्यवृत्त्या व इतर सवलती देणें आदी कार्यक्रम कार्यान्वित करण्यांत आले. गव्हर्नमेंट व्यावसायिक विद्यालयांत सुतारकाम, लोहारकाम, कातडीकाम, शिवणकाम, विजेरीकाम आदींचा अंतर्भाव करण्यांत आला. तसेंच प्राथमिक शाळांचे मूलोद्योगी शाळांत रुपांतर करणें, शिक्षकांना प्रशिक्षण देणें निरिक्षकांच्या नेमणूका करणें, जनपदांना वाढते अनुदान देणें, दृक्‌वाक् आयुधें उपलब्ध करून देणें, विद्यार्थ्यांसाठी होस्टेल्स काढणें व विद्यार्थीमंडळें स्थापणें, वाचनालयें चालविणें व श्रमदान कार्यक्रम घडविणें, आदी बाबीकडेहि लक्ष पुरविण्यांत आले. नागपूर येथील अनाथ विद्यार्थी गृहांत विविध व्यवसाय शिकविले जाऊं लागले. आतां जिल्ह्यांत २०० हून अधिक लोकवस्ती असलेल्या सर्व खेड्यांत शिक्षणाच्या सोई उपलब्ध झालेल्या आहेत. १९५८-५९ साली प्राथमिक व.दुय्यम शाळांत १५८,७४२ म्हणजे लोकसंख्येच्या १२.८७ प्रतिशत विद्यार्थी होते. त्या शाळांतील शिक्षकांची संख्या ४,२९७ होती. शिक्षक व विद्यार्थी यांचे प्रमाण १:३८ इतके होतें.

नागपूर हे शिक्षणाचे पीठ असून ह्या ठिकाणी सन १९२३ सालीं स्थापन झालेले नागपूर विश्वविद्यालय आहे.

विश्वविद्यालयीन शिक्षण : ह्याचे कार्यक्षेत्र संपूर्ण विदर्भ विभाग असून आतांपर्यंत ते संलग्नित कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या फक्त परीक्षा घेणारे मंडळ होतें. परंतु नुकतेच ह्या विश्वविद्यालयामार्फत शिक्षण प्रदान करण्याचे व संशोधन करण्याचे कार्य हातीं घेण्यांत आले आहे.

ह्या विश्वविद्यालयाची शैक्षणिक खातीं खालीलप्रमाणें आहेत :—(१) बायोकेमिस्ट्री, (२) जिऑलॉजी, (३) पॉलिटिकल सायन्स, (४) पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन व लोकल सेल्फ-गव्हर्नमेंट, (५) रिसर्च डिपार्टमेंट इन आयुर्वेद, (६) एंशट इंडियन हिस्ट्री व कल्चर, (७) फार्मसी व (८) लायब्ररी सायन्स.

नागपूर जिल्ह्यांत ह्या विश्वविद्यालयास जोडलेल्या २१ उच्च शिक्षणाच्या संस्था आहेत. त्या म्हणजे—(१) विश्वविद्यालयीन शैक्षणिक विभाग, (२) कृषि महाविद्यालय, नागपूर, (३) सायन्स कॉलेज, नागपूर, (४) धनवटे राष्ट्रीय महाविद्यालय, नागपूर, (५) जी. एस्. कौलेज ऑफ एकॉनॉमिक्स व कॉमर्स, (६) गव्हर्नमेंट पोलिटेक्निक, नागपूर, (७) इंजिनियरिंग कॉलेज, नागपूर, (८) हिस्लॉप कॉलेज, नागपूर, (९) मेडिकल कॉलेज, नागपूर, (१०) नागपूर महाविद्यालय, नागपूर, (११) एस. बी. सिटी कॉलेज, नागपूर, (१२) लेडी अमृतबाई डागा कॉलेज फॉर वुईमेंन, नागपूर, (१३) एस्. एफ्. एस्. कॉलेज, नागपूर, (१४) व्हेटर्नरी कॉलेज, नागपूर, (१५) लक्ष्मीनारायण इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,

नागपूर, (१६) लॉ कॉलेज, नागपूर, (१७) युनिव्हर्सिटी ट्रेनिंग कॉलेज, नागपूर, (१८) स्कूल ऑफ जर्नालिझम्, नागपूर, (१९) धरमपेठ महाविद्यालय, (२०) सी. पी. अॅन्ड बेरार महाविद्यालय, (२१) मोहता सायंस कॉलेज. आर्युवेदाचे शिक्षण देणारे एक कॉलेज लवकरच सुरू होईल.

वरील सर्व महाविद्यालयांतून विज्ञान, कला, आदीचे उच्च शिक्षण देण्याच्या सोई आहेत. १९५८-५९ सालीं हृचा विविध संस्थांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९,६५९ होती. तर त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांची संख्या ५१० होती.

तांत्रिक शिक्षण :

शिक्षणाच्या विविध अंगांपैकीं तांत्रिक शिक्षण हे एक महत्त्वाचे अंग आहे. आज आपल्या देशाला सर्व क्षेत्रांत तंत्रज्ञांची अत्यंत आवश्यकता आहे. व्यवहारांतील एखाद्या साध्या व्यवसायापासून तो इंजिनियरिंगच्या पदवी शिक्षणापर्यंत नागपूर जिल्हृयांत ज्या तांत्रिक शिक्षणाच्या सोई आहेत त्यांची माहिती खाली देण्यांत आली आहे.

हृचा विविध संस्थांमधून तांत्रिक शिक्षण घेण्यासाठीं विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप, स्टायपेंड, इत्यादि शिवाय शिक्षण शुल्काची सवलतहि देण्यांत येते. त्याचप्रमाणें इतर मागासलेल्या वर्गाचे जातीवर आधारलेले वर्गीकरण नाहिसे करून टाकले असून रु, १,२०० किंवा आंत वार्षिक उत्पन्न असलेल्या सर्वांना इतर मागासलेले वर्ग म्हणून संबोधून अशांच्या पाल्याना शिक्षण शुल्काची सवलत देण्यांत येते.

बी. ई. पदवी परीक्षा :

नागपूर येथील इंजिनियरिंग कॉलेजमध्यें इंटर सायन्स पास झालेल्या विद्यार्थ्यांकरितां सिव्हिल, इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल इंजिनियरिंगचे पदवीपर्यंतचे शिक्षण देण्याची सोय आहे. या महाविद्यालयांत २४० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

डिप्लोमा इन इंजिनियरिंग :

नागपूर येथील शासकीय पॉलिटेक्निकमध्यें डिप्लोमा इन् इंजिनियरिंगच्या शिक्षणाची सोय आहे. गणित व सायन्स घेऊन मॅट्रिक पास झालेल्या २४० विद्यार्थ्यांना सिव्हिल, मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल या विषयासाठीं प्रवेश मिळूं शकतो. हा कोर्स ३ वर्षाचा आहे. महाराष्ट्र राज्याच्या तांत्रिक शिक्षण खात्याकडून परीक्षा घेण्यांत येते. यशस्वी विद्यार्थ्यांना ओव्हरसियर किंवा फोरमन म्हणून नोकरी मिळूं शकते.

औद्योगिक प्रशिक्षण :

नागपूर येथील व्होकेशनल हायस्कूलमध्यें सातवा वर्ग पास झालेल्या विद्यार्थ्यांना सुतारकाम, धातूकाम, शिवणकला, कातडीकाम, इलेक्ट्रिशिएनचे शिक्षण यांची चार वर्षाच्या शिक्षणाची सोय आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना विदर्भ बोर्ड ऑफ सेकंडरी सर्टिफिकेटच्या परिक्षेस बसावे लागते.

बहुद्देशीय माध्यमिक विद्यालयें :

नागपूर येथील शासकीय बहुद्देशिय माध्यमिक विद्यालय व पटवर्धन माध्यमिक विद्यालयांत ७ वा वर्ग पास झालेल्या विद्यार्थ्यांना विविध उद्योगाचे शिक्षण देण्यांत येते. या शाळांतील अभ्यासक्रमांत विज्ञान, कला, तांत्रिक, अप्लाईड मॅथ्स, भूमिती, इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियरिंग आदी विषयांचा समावेश आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना पोलिटेक्निक व इंजिनियरिंग कॉलेजमध्यें प्रवेश मिळतो.

इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट :

नागपूर येथे असलेल्या हृया शाळेंत औद्योगिक व तांत्रिक विषयांचा २ वर्षाचा अभ्यासक्रम आहे. त्यांत १४ तांत्रिक कोर्सेसचा अंतर्भाव आहे. ४४० विद्यार्थ्यांना हृया संस्थेंत प्रवेश मिळतो. या शिक्षण संस्थेंत सिव्हिल व मेकॅनिकल इंजिनियरिंग ड्राफ्ट्समेन, सर्व्हेअर, मोटार मेकॅनिकल, धातूच्या पत्र्यांचे काम, मोल्डिंग, पॅटर्न मेकिंग, टर्नर, फिटर, रेडियो मेकॅनिझम, सुतारकाम, लोहारकाम, पेंटर, वेल्डर, आदी बाबतींत अध्ययनाची सोय आहे.

अॅप्रेंटिस ट्रेनिंग स्किम : नॅशनल अॅप्रेन्टिस ट्रेनिंग योजनेनुसार इंडस्ट्रियल इंन्स्टिटयूट मध्यें फिटर, मेकॅनिक, इलेक्ट्रिशिएन, मोटार मेकॅनिक (थियरी व प्रॅक्टिकल) चे प्रशिक्षण देण्यांत येते. याबाबत थियरीचे वर्ग इंस्टिटयूटमध्यें घेण्यांत येतात व महाराष्ट्र राज्य रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन, नागपूर विभाग, एम्प्रेस मिल, नागपूर इलेक्ट्रिक लाईट आणि पॉवर कंपनी, ऑरेंज ग्रोअर्स असोशिएशन, कर्माशिएल इंजिनियरिंग कंपनी, दळवी इंजिनियरिंग कंपनी या नागपूरच्या संस्थातून प्रॅक्टिकलचे शिक्षण देण्यांत येते.

या शिक्षण संस्थेत दरवर्षी एस्.एस्.सी. पास झालेल्या ५० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो. अभ्यासक्रम ३ ते ४ वर्षाचा आहे.

वर्क अँड ओरिएंटेशन सेंटर : नागपूरला मागच्या ऑगस्टमध्यें सुरू झालेल्या वर्क अँड ओरिएंटेशन सेंटर मध्यें इंटर पास झालेल्या विद्यार्थ्यांकरितां इलेक्ट्रिशिएन, फिटर, वेल्डर आणि मोल्डरचा २ वर्षाचा अभ्यासक्रम पुरा करतां येतो. या संस्थेंत ६४ विद्यार्थ्यांना घेण्यांत येते.

गैरसरकारी टेक्निकल इन्स्टिटयूट : नागपूर जिल्ह्यांत अनाथ विद्यार्थी गृह, नागपूर, इंडियन रेडियो इन्स्टिटयूट, नागपूर, शिवणकला विद्यालय नागपूर, महिला सेवा समाज, नागपूर, लेडीज आर्ट अकॅडमी, नागपूर, आदी शिक्षण संस्थांतून तांत्रिक शिक्षणाची व्यवस्था आहे.

समाज शिक्षण : जिल्ह्यांतील निरक्षरता घालविण्यासाठीं जोमदार कार्यक्रम हातीं घेण्यांत आला. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत ४८० समाज शिक्षण वर्ग घेण्यांत येऊन ३०,०३० लोक साक्षर करण्यांत आले. दुसऱ्या योजनेअखेर जिल्ह्यांतील विकासगट व इतर भागांत ९९६ वर्ग भरविण्याचे ठरले.

समाज शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना अल्प मुदतीचे शिक्षण देण्यांत येते. १९५९-६० सालीं ९९ वर्ग चालू होते. त्यांचा २,१०९ प्रौढांनी फायदा घेतला.

नवसाक्षरांची साक्षरता टिकून रहावी म्हणून ८६ फिरती वाचनालयें चालू करण्यांत आली. अशी २५४ केन्द्रें योजना अखेर उघडावयाची होती. ३० पायलट वाचनालय केन्द्रें उघडण्यांत आली. तसेच ८६ ग्रामीण वाचनालयें उघडण्यांत आली. जिल्हा वाचनालयांत ग्रंथांची भर घालण्यांत आली. ह्या वाचनालयांची उपयुक्तता दिवसेंदिवस वाढत आहे.

प्रमुख वाचनालयें

जिल्ह्यांत खालील प्रमुख वाचनालयें आहेत—

(१) शासकीय माहिती केन्द्र, मोर हिंदी भवन, नागपूर.
(२) शासकीय केन्द्रिय ग्रंथालय, नागपूर.
(३) शासकीय जिल्हा ग्रंथालय, नागपूर.
(४) जनपद वाचनालय, खेड.
(५) जनपद वाचनालय, धापेवाडा.
(६) जनपद वाचनालय, मुधाळ.
(७) जनपद वाचनालय, बोरी.
(८) सदर मुस्लिम लायब्ररी, नागपूर.
(९) शहा मुलजी देवजी लायब्ररी, नागपूर.
(१०) अभ्युदय लायब्ररी, इतवारी, नागपूर.

(११) राजाराम सिताराम दीक्षित लायब्ररी, सीताबर्डी, नागपूर.
(१२) राजाराम सिताराम दीक्षित लायब्ररी, धरमपेठ, नागपूर.
(१३) मुस्लिम लायब्ररी, मोमीनपुरा, नागपूर.
(१४) याकुबिया लायब्ररी, मोमीनपुरा, नागपूर.
(१५) विजय सेवा मंडळ लायब्ररी, पार्वतीनगर, नागपूर.
(१६) अंजुमन इस्लामिक लायब्ररी, कामठी.
(१७) नॅशनल लायब्ररी, महाल, नागपूर.
(१८) आझाद लायब्ररी, कामठी.
(१९) ग्रामीण प्रचार समिति, सोमलवाडा, नागपूर.
(२०) आंध्र क्लब लायब्ररी, सीताबर्डी, नागपूर.
(२१) हिंदु धर्म संस्कृति मंदिर, धंतोली, नागपूर.
(२२) सिद्धार्थ भाग्योदय लायब्ररी, नागपूर.
(२३) नूतन वाचनालय, मौदा.
(२४) विश्वेश्वर वाचनालय, काटोल.
(२५) सरस्वती वाचनालय, धंतोली, नागपूर.
(२६) रामकृष्ण आश्रम वाचनालय, धंतोली, नागपूर.
(२७) कस्तुरबा को. ऑ. लायब्ररी, सदर, नागपूर.
(२८) युनिव्हर्सिटी लायब्ररी, नागपूर.
(२९) म्युनिसिपल मलक लायब्ररी, उमरेड.
(३०) मोहपा म्युनिसिपल वाचनालय, मोहपा.

ह्या वाचनालयांचा लोकांनी मोठ्या प्रमाणावर फायदा घेतला. १८६३ मध्यें स्थापन झालेले पुराण वस्तू संग्रहालय विविध विषयांवर माहिति पुरविते.

गाणी नृत्य व नाटकें यांचा समावेश असलेले कलापथक हे करमणूकी बरोबर शिक्षणाचेंहि काम करते. लोक जागृतीसाठीं अशा संस्थांची वाढ करण्यांत आली. त्यांच्यात चढाओढी ठेवण्यांत आल्या.

ग्रामीण विकासासाठीं ग्रामीण पुढारी प्रशिक्षण देऊन तयार करण्यासाठीं विकास गटांत शिबिरें घेण्यांत आली.

शिक्षणाच्या विविध योजनांवर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ९२.२३ लाख रुपयांची तरतूद होती. १९५९-६० सालापर्यंत त्यांतील ६२,९७,०७७ रुपये खर्च झाले व शिक्षणाचे बाबतींत जिल्हा आघाडीवर येण्यास मदत झाली.

नवबौद्धांना सवलती :

राज्याच्या उद्घाटनप्रसंगी मुख्य मंत्र्यांनी जाहीर केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार राज्यांतील वर्गीकृत जातीपैकी ज्यांनी बुद्ध धर्माचा स्वीकार केला असेल अशा नवबौद्धांना पूर्वीच्या वर्गीकृत जातींना ज्या सवलती आणि सोई देण्यांत येत होत्या, त्याच पुढें चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यांत आला.

दिवसेंदिवस शिक्षणाचें स्वरूपांत व दर्जामध्यें सतत सुधारणा करण्यांत येत आहेत. खाजगी संस्थांना शिक्षण कार्यासंबंधी उत्तेजन देण्याचे व त्यांच्यामध्यें भागीदारी करण्याचें सरकारचें धोरण आहे. आतां या क्षेत्रांत आणखी वाढ करण्याचा टप्पा आला आहे. आपल्याला आतां शैक्षणिक उपयुक्ततेच्या वाढत्या क्षेत्रांत सहेतुक व नियोजनपूर्वक कार्य करतां येईल.

७. सहकार

एकजुटीने कार्य करण्याची या राज्याची महान् व सुप्रसिद्ध अशी परंपरा आहे. या परंपरेंत सर्वोत्कृष्ट मानवी गुणांचा व मूल्यांचा आविष्कार झालेला आहे.

आतां आपली नवी यात्रा सुरू झाली आहे. ही यात्रा दीर्घकाल चालणार आहे. तिचे फळहि आपणांस मिळणार आहे. जनतेचें अंतिम कल्याण साधणें हेंच ह्या यात्रेचे उद्दिष्ट होय. ते सहकारी चळवळीतून साधणें शक्य होईल, अशी आपली निष्ठा आहे.

शेतकऱ्यांची आर्थिक पत वाढविण्याचा, त्याला शेतकीसाठीं अर्थपुरवठा करण्याचा व त्याच्या शेतकी मालाचा विक्रय करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे सहकारी संस्था हा होय. ह्या दृष्टीकोणांतून सहकारी चळवळीकडें पहिल्या पंचवार्षिक योजना काळापासून पहाण्यांत येऊं लागले.

सहकारी चळवळ : शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठीं बहुव्यवसाय सहकारी संस्थेशिवाय दुसरा मार्ग नाहीं ही कल्पना सर्वांना येऊन चुकली होती. आतांपर्यंत कर्ज देणाऱ्या सहकारी संस्था ह्यापुढें अशा रीतीनें बहुव्यवसाय संस्था होऊन शेतकऱ्यांचे सर्वांगीण जीवन सुखी करण्यास उपयोगी ठराव्यांत म्हणून प्रयत्न करण्यांत आले व राज्यसरकारनें त्यांत भागीदारी केली असतां हमखास यश येईल असे अनुभवानें पटल्यामुळें त्या पद्धतीचा अवलंब केला गेला. द्वितीय पंचवार्षिक योजना काळांत खरे प्रयत्न झाले. सहकारी संस्थामार्फत शेतकऱ्यांना 'अधिक धान्य पिकवा' मोहिमेखालीं खतें वगैरे वांटपाचें काम, पंपिंग सेट्स खरेदीसाठीं कर्जें देण्याचे काम व शेतकी मालाचा विक्रय करण्याचें काम करण्यांत आले. ह्या कामाचा जोर विशेषत: १९५८-५९ सालीं दिसला. ह्या काळांत ग्रामीण पत, सहकारी दुग्ध व्यवसाय, सहकारी गिऱ्हाइक संस्था, आदींची सुंदर वाढ झाली.

या जिल्ह्यांत सहकारी चळवळीला खरीखुरी सुरवात १९११ सालीं नागपूर मध्यवर्ति सहकारी बँकेच्या स्थापनेपासून झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. कास्तकारांच्या दैनंदिन जीवनांत येणाऱ्या आर्थिक चणचणींना तोंड देण्यासाठीं निघालेल्या पतपेढ्या ह्याच लहान लहान प्रमाणांत शेतकऱ्यांना बँका भासूं लागल्या. शेती व्यवसायाकरितां कर्ज देणें व त्याची वसूली व्याजासह नियमित करणें एवढेंच कार्य सहकारितेच्या पहिल्या पर्वांत बँकाचे प्रमुख कार्य म्हणून समजलें जात असें.

भारतास स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर सर्वांगीण विकासाची कल्पना निरनिराळ्या साधनांद्वारें नांवारुपास आली. अनेक योजना तयार होऊं लागल्या. जनतेचा दुर्दम्य उत्साह व सरकारकडून मिळणारी आर्थिक मदत या दोहोंचा गुणाकार सर्वांगीण विकासाला मूर्त स्वरूप देऊं लागला. पहिल्या योजनेचे लक्ष्य शेती सुधारणेवर केन्द्रित करण्यांत आलें होते. दुसऱ्या योजनेंत शेतीबरोबर पायाभूत उद्योगाची उभारणी करावयाची होती, तर तिसऱ्या योजनेंत ग्राम विकासाचें साधन म्हणून सहकारितेची कांस धरणें इष्ट असें राष्ट्रीय नियोजन मंडळाला वाटूं लागले. आणि म्हणूनच तिसऱ्या योजनेच्या प्रारंभापासूनच सहकारी चळवळीला जोराची चालना मिळाली आहे हे सर्वश्रुत आहे.

नागपूर जिल्ह्यांत एकूण १,१०० सहकारी संस्था आहेत. त्यांची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणें :

वरीष्ठ बँका	१	कॉटन मिल	१
मध्यवर्ती सहकारी बँक	१	घरबांधणी संस्था	५२
जिल्हा व विभागीय बोर्डस्	२	शेतकी संस्था	४
सुपरवायझिंग युनियन्स	१३	किरकोळ संस्था	६
ग्राहकांची फेडरल संस्था	१	मच्छीमारी संस्था	६
ग्राहक संस्था	२५२	धान्यभांडार संस्था	६
बिनपतीच्या संस्था	५५	संत्रा बागायतदार संस्था	३२
डेअरी संस्था	२८	सेवा सहकारी संस्था	६२९
विपणी संस्था	११		
		एकूण	१,१००

जिल्ह्यांतील औद्योगिक संस्थांची संख्या :

मधुमख्खी पालन संस्था ...	१
तेलघाणी संस्था	१२
बुरड संस्था	२
चर्मकार संस्था	३
चर्मकार उत्पादक संस्था ...	१०
सुतार कारींगर संस्था ...	५
धातू कामगार संस्था ...	४
कुंभार संस्था	१२
नीरा-ताडगुळ उत्पादक संस्था ...	३
जंगल कामगार संस्था	६
मजूर कामगार संस्था	११
रंगाई-छपाई संस्था	५
महिला संस्था	४
मध्यवर्ति संस्था	२
विणकर संस्था	१४७
इतर (शिवणकला, परीट, बिडी, होजिअरी, कापूस, पिंजण).	२६
एकूण ...	२५३

शेतकी सहकारी पत पुरवठा

विदर्भ को-ऑपरेटिव्ह बँक, नागपुर
- जिल्हा सहकारी बँक, नागपूर
  - सेवा सहकारी संस्था पतपेढया
  - वि. का. सो.
  - ऑरेंज ग्रो. अ.
- प्राथमिक भू-गहाणी बँक, नागपूर

विदर्भातील आठहि जिल्ह्यांकरितां कर्जपुरवठा करणारी संस्था म्हणून विदर्भ को.-ऑ. बँकेचे स्थान महत्त्वाचे आहे. ह्या बँकेला जिल्हा मध्यवर्ति बँकांना कज देण्यासाठीं रिझर्व बँकेकडून कर्ज मिळतें. नुकतेच तिचे महाराष्ट्र राज्य को-ऑ. बँकेत सामीलीकरण झाले आहे.

चालू सालासाठीं बँकेच्या कामकाजाची माहिती खालीलप्रमाणें आहे :—

		रुपये
(१) सभासद—		
(अ) वैयक्तिक		५८३
(ब) सहकारी संस्था		१,०५५
एकूण ...		१,६३८
(२) हिस्से भांडवल—		७०,१३,४३०
(अ) हिश्श्यांत सरकारची गुंतवणूक ...	३५,४०,०००	
(ब) इतर	३४,७३,४३०	
(क) सेंट्रल बँक व सोसायटचा ह्यांत गुंतविण्यासाठीं सरकारकडून.		५२,८७,५००
(३) रिझर्व फंड		८,७९,५४८
इतर फंड		१०,२९,९१२.३३
(४) ठेवी		३,२५,८९,००७

	रुपये	
चालू	१,१६,१२,४५७	
बचत	९३,१८,५४०	
मुदत फंड	३९,१५,९०५	
प्रॉव्हिडंट फंड	६,३५,५०४	
इतर	७१,०६,६०१	
(५) कर्ज वांटप (अल्प व मध्यम मिळून)		१०,१३,८०,९९५
(६) कर्ज वसूल (अल्प व मध्यम मिळून)		६,९४,१४,६२७
(७) येणें कर्ज		८,६४,९७,१७१
अल्प	७,८८,१७,३३६	
मध्यम	३८,८३,५१८	
लांब	३७,९६,३१७	
इतर कर्जे		१५,०४,९६६
(८) घेतलेले कर्ज (रिझर्व बँक)		७,१७,७१,०००
(सरकार)		३७,५००
(९) परत केलेले कर्ज (रिझर्व बँक)		४,२०,५३,०००
(सरकार)		३,००,०००
(१०) देणें कर्ज (रिझर्व बँक)		६,५६,७१,०००
(सरकार)		३,३७,५००
(११) निव्वळ नफा		५,०७,५४३

विदर्भ बँकेच्या प्रयत्नानें जिल्ह्याच्या स्तरावर प्रत्येकी एक मध्यवर्ति बँक स्वतंत्रपणें काय करीत आहे.

नागपूर मध्यवर्ति सहकारी बँक, नागपूर :

नागपूरची ही मध्यवर्ति सहकारी बँक १९११ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत अवघ्या १३,००० रुपये भांडवलावर सुरू झाली. या पन्नास वर्षाच्या काळांत बँकेने नावाजण्याजोगी प्रगति केली असून आज रोजी तिचा व्याप खालीलप्रमाणें आहे :—

	रुपये
वसूल झालेले भांडवल	२२,३७,०००
रिझर्व फंड	१,२३,०००
ठेवी	२७,२०,८००
खेळते भांडवल	१६,३५,८२२
निव्वळ नफा	२,३५,७२२

ह्या वृद्धीचे मुख्य कारण म्हणजे बँकेवर नागरी व ग्रामीण ठेवीदारांचा विश्वास हेच होय. ह्या बँकेच्या शाखा सर्व तालुक्यांच्या ठिकाणीं खोलण्यांत आल्या. विकास गटाच्या ठिकाणीहि शाखा उघडण्यांत आल्या आहेत. बँकेच्या स्थानिक कर्ज वांटपाच्या पद्धतीमुळें कास्तकारांचा वेळ व पैसा यांत बचत तर झालीच पण त्याचबरोबर त्यांना कर्ज अक्षरशः सुकर व घरबसल्या मिळण्याची व्यवस्था झाली. बँकेने शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठीं पीक कर्जपद्धति चालू केली. याशिवाय सहकारी संस्थांमार्फत मालाची विक्री करणाऱ्यांना विशेष सवलती देण्याचा नियम केला. सरकारकडून बँकेला ७,७५,००० रुपयांचे भागभांडवल मिळालें आहे. तसेच शेतकऱ्यांना अल्प मुदतीचे कर्ज देऊन त्यांच्या लहान गरजा भागविण्याचे कार्य करतांनाच दीर्घ मुदतीचे कर्ज देऊन शेतकऱ्यांना आर्थिक हलाखीतून वर काढण्याचे कार्यहि ह्या जिल्ह्यांतील भू-गहाणी बँका करीत आहेत.

नागपूर को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्टगेज बँक :

ही संस्था १६ मे १९३५ रोजीं स्थापन झाली. ही संस्था नागपूर जिल्ह्यांतील कास्तकारांना जुनी कर्जफेड, शेती दुरुस्ती व शेत खरेदीकरितां दीर्घ मुदतीचे कर्ज, जमीन आदी तारणावर देते. नवीन २७५ विहिरी खोदणें व ५० जुन्या विहिरी दुरुस्त करणें यासाठीं तकावी कर्ज देण्याचा कार्यक्रम सरकारने ह्या बँकेकडे सोपविला आहे.

१९५९-६० सालांतील ह्या बँकेची परिस्थिति :

		रुपये
(१)	सभासद संख्या	३,१५४
(२)	हिस्से भांडवल	३८,०२१
(३)	कर्ज वांटप	१,५७,०४५
(४)	कर्ज वसूली १९५८-५९ ची	३,२४,३०९
	१९५९-६० ची	६७,२४४
(५)	घेणें कर्ज	१०,९९,४२८
(६)	विदर्भ बँकेकडून घेतलेले कर्ज	१०,५८,१७१
	फंड व ठेवी	७१,५४१
(७)	नफा	१९,५९९

उपरिनिर्दिष्ट कार्यामुळें ग्रामीण पतपेढ्यांची आणि शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारण्याच्या कामीं मदत झाली आहे. याचा परिणाम म्हणजे शेतकऱ्यांची कर्ज फेडण्याची ताकद वाढली आहे व त्यांची सावकारीपाशांतून मुक्तता झाली आहे.

इतर बँकींग कचेऱ्यांची जिल्ह्यांतील संख्या ३४ होती. त्यांतील प्रमुख म्हणजे रिझर्व बँक ऑफ इंडिया व स्टेट बँक ऑफ इंडिया. ह्या दोन्हींच्या कचेऱ्या नागपूर येथे आहेत. तसेच स्टेट फायनान्स कॉर्पोरेशन व इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनच्या शाखा आहेत. ह्या खेरीज जिल्ह्यांत शेतकी, खाणी, उत्पादक, व्यापार, आदी कंपन्या १९५९ साली १८० होत्या. त्यांचे अधिकृत भांडवल ११,६९,३०,८०० रुपये होते.

मोठ्या बहुव्यवसाय सहकारी संस्था वेगवेगळ्या ठिकाणीं स्थापण्यांत येत असतां ज्या गांवीं तसे करणें शक्य नव्हते त्या ठिकाणीं सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यांत येऊं लागल्या. योजना यशस्वी करण्यासाठीं प्रत्येक खेडे आणि ७५ प्रतिशत जनता ह्या कार्यक्रमाखाली आणणें जरूर आहे असे ठरविण्यांत आले. त्यानुसार नागपूर जिल्ह्यांत अस्तित्वांत असलेल्या ५७२ सहकारी पतपेढ्यांचे रूपांतर सेवा सहकारी संस्थांत करण्याचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला. याशिवाय नव्यानें १६ सेवा सोसायट्या उघडण्यांत आल्या.

शेतकऱ्यांच्या विविध उत्पादनांतर्गत गरजा पुरविण्याच्या उद्देशानें ह्या संस्थांचे जाळे पसरविण्यांत आले आहे. त्यांचे सभासदत्व सर्वांना खुलें असते. ३० जून १९६० पर्यंत अशा संस्थांचे सभासद २७,२१३ झालेले आहेत. ४५५ सेवा सहकारी संस्थांनी १२,०६,८६२ रुपये भागभांडवल जमविले. ह्या सर्व संस्था जिल्हा सहकारी बँकेच्या सभासद असून ह्यांना ५०,८५,२६५ रुपये व १६,४८,२६५ रुपये असे अनुक्रमें अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज ३० जून १९६० पर्यंत देण्यांत आले आहे. (१) पतपुरवठा करणें, (२) रासायनिक खतांचा पुरवठा करणें, (३) शेतकीविषयक माहिती पुरविणें ही ह्या प्रकारच्या सेवा सहकारी संस्थांची कामें आहेत. याशिवाय सधन भातशेती क्षेत्रांतील १४३ सेवा सहकारी संस्थाना भातपिकासाठीं जास्तीचे कर्ज देण्यांत आले आहे. या संस्थांची काम सुकर व लवकर व्हावी या उद्देशानें ५०० रु. या दरानें १९५९-६० मध्यें २४० सेवा सहकारी संस्थांना १,२०,००० रु. व्यवस्थापकीय अनुदान देण्यांत आले आहे.

अन्नधान्याचें वांटप :

बत्तीस सेवा सहकारी संस्थांनी स्वस्त धान्याची दुकानें उघडून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

विविध कार्यकारी व मोठ्या आकाराच्या पतपेढ्या :

रूरल क्रेडीट सर्व्हेच्या रिपोर्टाप्रमाणे ह्या जिल्ह्यांत एकूण २३ विविध कार्यकारी संस्था स्थापन झाल्या आहेत. या संस्था उत्तम रीतीनें कार्य करीत असून दिवसेंदिवस त्यांचा व्याप वाढत आहे. ह्या संस्थांनी १९० खेडी व्यापली असून ह्यांचे एकूण ४,९६२ सभासद आहेत. या संस्थांमार्फत बिनापतीचेसुद्धां व्यवहार चालत असून गतवर्षी १५,७१,४६४ रुपयांचा व्यवहार झाला. ह्या संस्था हळूहळू माल सांठविण्यासाठीं गुदामें बांधण्याची तयारी करीत आहेत.

कृषि संस्थांची वाढ :

उत्पादनांत वाढ व्हावी म्हणून सहकारी कृषि संस्थांचीहि वाढ करण्याचे ठरले. शेतीवरील भार कमी करण्याच्या आणि तुकडेबंदी करण्याच्या दृष्टीनें सरकारने सहकारी शेतीचा पुरस्कार केला आहे. त्यानुसार दोन सहकारी संस्था व दोन संयुक्त संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. ह्यांचे कार्यक्षेत्रांत ८५८.८४ एकर जमीन असून सभासद संख्या ५७ आहे. भागभांडवल एकंदर १,४५० रुपये असून १९५९-६० मध्यें यांचें उत्पन्न १२,५०० रुपये होते. या व अशा संस्था यशस्वीरीत्या नेटानें व चिकाटीनें चालविण्याचे धैर्य आमचे कास्तकार भविष्यकाळांत दाखवतील अशी आशा आहे. ह्या सर्व प्रयत्नांत राज्य सरकार भागीदारी करीत आले आहे.

नियंत्रित बाजार :

शेतमालाच्या विक्रीपद्धतींतील प्रचलित गैरव्यवहार दूर करणें हा मालांच्या नियंत्रित बाजाराचा मुख्य उद्देश आहे. उत्पादनक्षमता वाढली पण मालाची विक्री झाली नाहीं तर सहकाराचा हेतू पूर्ण झाला नाहीं असे होईल, म्हणून कास्तकारानें उत्पादन केलेल्या मालाची विक्री करून त्यांना त्यांच्या मालांना योग्य किंमत मिळवून देण्याच्या उद्देशानें जुन्या मध्यप्रदेशांत १९४८ सालीं दि सी. पी. एण्ड बेरार प्रॉव्हिंशिअल को. मार्केटिंग सोसायटी रजिस्टर झाली. राज्य पुनर्रचनेनंतर तिचे रूपांतर विदर्भ को-ऑ. मार्केटिंग सोसायटींत झाले. तिचे भागभांडवल ६,८२,००० रुपये असून त्यापकी सरकारने गुंतवलेले ३,५०,००० रुपये आहे. सभासद १४८ आहेत. मराठवाडा आणि विदर्भांत बाजार नियंत्रणासंबंधीचें स्वतंत्र कायदे आहेत. सबंध राज्यांत बाजारपेठांसंबंधीचा समान कायदा लागू करण्यासाठीं आवश्यक ते उपाय योजण्यांत येत असून लवकरच त्यासबंधीचा कायदा करण्यांत येणार आहे.

१९५८-५९ मध्यें खरेदीविक्री संघांची संख्या ५ होती. ३० जून अखेर आणखी दोन संस्था नोंदण्यांत आल्या.

१९५९-६० सालीं अशा ७ संस्था आहेत. त्यांचे संस्था व इतर सभासद १,५५७ होते. हिस्से-भांडवल ६६,९८८ रुपये असून रिझर्व व फंड ७६,८२७ रुपये होते. खेळते भांडवल ५,९५,६४२ रुपये होते. खरेदी व्यवहार २४,६७,९५९ रुपयांचे झाले तर विक्री व्यवहार २४,६०,०१६ रुपयांचे झाले. नफा ५०,२७२ रुपयांचा झाला.

विक्री समितीचे स्वतःचे असे सर्व साधनांनी सज्ज असे मार्केटयार्ड असल्याशिवाय तिला परिणामकारक काम करतां येणार नाहीं. यासाठीं गरजू विक्री समित्यांना कर्ज व सबसिडीच्या स्वरूपांत सरकारी आर्थिक मदत देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

राज्यांतील निरनिराळ्या बाजारपेठांतील बाजारभावांची माहिती अखिल भारतीय रेडियो केन्द्रा-वरून देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. या योजनेनुसार बाजारपेठांतील निवडक ६० शेतमालाचे भाव नागपूर जिल्ह्यांत नागपूर केन्द्रावरून ध्वनिक्षेपित करण्यांत येतात. याशिवाय मुंबई येथील मार्के-टिंग रिसर्च अधिकारी साप्ताहिक आणि मासिक बाजारभावाचे तक्ते प्रसिद्ध करतो. यांत मुख्यतः भावाचे चढउतार आणि आयात व निर्यातविषयक माहिती असते.

दुधपुरवठा संस्था :

शेतकऱ्यांना जोडधंदा मिळवून देण्याच्या दृष्टीनें दूधपुरवठा संस्था फार उपयुक्त ठरल्या आहेत. नागपूरला सरकारतर्फे दूध वाटप करावयाची योजना हातांत घेतल्यापासून ह्या संस्थांचे महत्त्व विशेष जाणवूं लागले आहे. मागील वर्षापर्यंत २८ संस्था स्थापन झाल्या होत्या. त्यांचे भागभांडवल ५३,५७३ रुपये होते. एकूण सभासद ७०६ असून

दहा संस्थाना ११,००० रुपयांची सरकारी मदत डेअरी योजनेनुसार देण्यांत आली होती. नागपूर दूध योजनेस दूध पुरविण्याचे दृष्टीने या संस्था फार उपयोगी ठरल्या असून प्रत्येक आठवड्याला ५६० मण दूध मागील वर्षी नागपूर संस्थेला पुरवित होत्या. चालू वर्षी ह्या संस्था ४१ पर्यंत पोचल्या आहेत. १ दुधपुरवठा युनियनहि आहे व २ पशुसंवर्धन संस्थाहि आहेत.

मच्छिमार संस्था :

मच्छिमारी हा ह्या जिल्ह्यांतील प्रमुख व्यवसाय होऊं शकत नसला तरी १९५९-६० अखेर सहा संस्था स्थापन झाल्या आहेत. ह्यांचे सभासद १,१३४ रुपये असून भाग-भांडवल १२,८९९ रुपये आहे. रामटेक येथील संस्था ही उत्तम रीतीने कार्य करणारी संस्था समजली जाते. एकूण दोन संस्थांना अल्पमुदतीचे ५,००० रुपयांचे कर्ज देण्यांत आले आहे. ह्या संस्था व्यापाराचे दृष्टीने पुढील काळांत फार उपयोगी ठरतील.

घरबांधणी संस्था :

घरांची टंचाई ही शहरांतच असते असे नाहीं तर ती आजकाल खेड्यांतहि जाणवूं लागली आहे १९५९-६० मध्यें ५२ घरबांधणी संस्था झालेल्या असून त्यापैकी ३६ संस्था कमी पगार असलेल्या लोकांच्या घरबांधणी योजनेखालीं दी विदर्भ हौसिंग बोर्डाच्या मदतीनें कार्य करीत आहेत. पैकीं ३४ संस्था ह्या नागपूरांतच आहेत. व उरलेल्या काटोल व कळमेश्वर येथें प्रत्येकी १ अशा आहेत. वरील संस्थांपैकीं १२ संस्थांना ५२,२०,२२० रु. विदर्भ हौसींग बोर्डाकडून कर्ज दिले असून एकूण १,७६७ नवीन घरें बांधण्यांत आली आहेत. धाऊक बाजारपेठा बांधण्याचे दृष्टीने एक नवीन संस्था स्थापन झाली असून कापड बाजार बांधण्याचे कार्य नागपूरला चालू आहे. अखिल महाराष्ट्रांत नांवाजलेली नागपुरांतील विदर्भ प्रि. को-ऑप. हौसिंग सोसायटी ही फार जुनी संस्था असून सरकारकडून एक पैचीहि मदत न घेतां आपल्या सभासदांना घर बांधण्यासाठीं नियमित कर्ज देत असते. या संस्थेचे एकूण सभासद ४,६२० असून भागभांडवल १३,७५,५०० रुपये आहे. १९५९-६० मध्यें ह्या संस्थेने २३,३१,२०० रुपयांचे कर्ज आपल्या सभासदांना दिलेले आहे. मागासलेल्या जमातीसाठीं घरें बांधण्याच्या दृष्टीनें ११ संस्था नोंदल्या गेल्या असून पैकीं एका संस्थेला सरकारकडून ७५ घरें बांधण्यासाठीं २,२५,५०० रुपयांची मदत दिली गेली आहे. भिवापूर येथेही एका संस्थेने २५ घरें बांधली आहेत.

नागपूर जिल्हा सहकारी बोर्ड, नागपूर :

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या व नागपूर विभागीय संघाच्या सर्व साधारण मार्गदर्शनाखाली नागपूर जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचा प्रसार व प्रचार करण्याकरितां आवश्यक ती कामें हाती घेऊन चळवळीची सर्वांगीण प्रगति करण्याचे पवित्र कार्य करण्याच्या उद्देशानें या बोर्डाची स्थापना १९५९ सालीं करण्यांत आली. सहकारी शिक्षण, वाङमय प्रसार व प्रचार करणें, विविध प्रकारचे सहकार प्रशिक्षण वर्ग चालविणें, परिषदा व शिबिरें भरविणें व सहकारी चळवळीविषयी जनतेंत जास्तीत जास्त आस्था निर्माण करणें, आदी गोष्टी बोर्डामार्फत करण्यांत येतात. नागपूर जिल्ह्यांतील ६०० सोसायट्या बोर्डाचे सभासद आहेत.

नागपूर विभागीय सहकारी बोर्ड :

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या मार्गदर्शनाखालीं नागपूर विभागीय सहकारी बोर्ड नागपूर विभागांतील जिल्हा सहकारी बोर्डावर व त्याचप्रमाणे सहकारी विद्यालयांच्या कारभारावर नियंत्रण ठेवते व मार्गदर्शन करते. ह्या बोर्डाची प्रचार व प्रसारासाठीं एक सिनेमा गाडीहि आहे.

नागपूर सहकारी विद्यालय, नागपूर :

सहकारी खात्याचे कनिष्ठ अधिकाऱ्यांना व सोसायट्यांच्या कार्यकर्त्यांना सहकारविषयक शिक्षण देण्याचे उद्देशाने १ ऑक्टोबर १९५५ पासून हे विद्यालय सुरू झाले. पूर्वी हे खात्यामार्फत चाले. पण आतां ते महाराष्ट्र राज्य संघाकडे सुपूर्त करण्यांत आले आहे. १ एप्रिल व १ ऑक्टोबरला सहामाही शिक्षण वर्ग सुरू होतात. आजपर्यंत १० बॅचेस मधून ७९४ विद्यार्थी प्रशिक्षण घेऊन बाहेर पडले.

नागपूरच्या परिसरांत संत्र्यांची लागवड विपूल प्रमाणांत होते. भारतांत सर्वत्र संत्र्यांची मागणी नेहमी असते. तेव्हां सहकारी पद्धतीनें संत्र्यांचे उत्पादन बागाईतदाराला अधिक फायदेशीर ठरेल, ह्या उद्देशानें ग्रामीण विभागांतून ३२ संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र ३१५ खेड्यांत विभागले असून त्यांचे १,०४६ सभासद आहेत. या सर्व संस्था नागपूर जिल्हा बागाईतदार संघाचे सभासद आहेत.

नागपूर संत्रा बागाईतदार सहकारी संघ :

नागपूरी संत्र्यांचे औद्योगिक महत्त्व लक्षांत घेऊन सहकारी पद्धतीने संत्र्याचे उत्पादन व विक्री करण्याचे कार्य ही संस्था करीत असते. या संस्थेचे कार्यक्षेत्र विदर्भांतील आठ जिल्ह्यापुरते आहे. विदर्भांतील एकूण ५३ प्राथमिक संत्रा बागाईतदार संस्था व ३४७ वैयक्तिक आणि इतर सभासद या संस्थेचे सभासद आहेत. संत्रीं आणि इतर फळांच्या लागवडीस सहाय्य करणें व मालाची प्रत सुधारणें, उत्पादन केलेल्या मालाला बाजारपेठ मिळविणें व संत्री व इतर फळांपासून निरनिराळे टिकाऊ पदार्थ तयार करण्याची व्यवस्था करून त्यांची विक्री करणें या दृष्टीनें नागपूर येथील चॉक्स कॅनिंग फॅक्टरी सात वर्षासाठीं लीजवर चालविण्यासाठीं या संस्थेने घेतली आहे.

या संस्थेची निरनिराळ्या ठिकाणीं पॅकींग सेंटर्स आहेत. दिल्ली येथे ह्या संस्थेचे विक्री केन्द्र आहे. ह्याशिवाय कुक्कुट पालन संस्था, लॉयर पब्लिकेशन को-ऑ. संस्था, धान्य भांडार संस्था, सहकारी जिनींग व प्रेसिंग फॅक्टरी, ग्राहक सहकारी संस्था, नागरी सहकारी संस्था, आदी संस्था समाधानकारक काम करीत आहेत.

सहकारी क्षेत्र हे फक्त शेतकऱ्यांपुरतेच मर्यादित नसून इतर व्यावसायिक लोकांना त्यांच्या उद्योग-धंद्यांची प्रगति करण्याकरितां सहकारी क्षेत्रांत भरपूर वाव आहे.

औद्योगिक सहकारी संस्था :

नागपूर जिल्ह्यांत जिल्हा औद्योगिक सहकारी संघ नांवाची संस्था आहे. तिचे १३४ संस्था सभासद आहेत. औद्योगिक संस्थाना तांत्रिक सहाय्य देणें, प्राथमिक संस्थांचे सेक्रेटरी आणि अकाउंटंटचे कामासाठीं आणि संलग्न संस्थांचे काम पाहण्यासाठीं नोकरवर्गाचा पुरवठा करणें, तसेच स्वस्त दराने कच्च्या मालाचा पुरवठा करणें आणि नाममात्र कमिशन घेऊन प्राथमिक संस्थांचा तयार माल विकणें हा जिल्हा औद्योगिक सहकारी संघ स्थापण्यामागील हेतू आहे. त्यांना मार्गदर्शन करण्यासाठीं राज्य पातळीवर राज्य औद्योगिक सहकारी संघ आहे.

विणकरांची आर्थिक स्थिति कांहीं वर्षांपूर्वी इतकी खालावली होतीं की त्यांच्या रोजच्या आर्थिक गरजा भागविणें त्यांना कठिण झाले होते. कांही विणकरांनी तर आपला धंदा बंद करून गिरण्यांमध्यें मजूरी करावयास सुरवात केली होती. अशा प्रसंगी ह्या संस्थेची स्थापना करून ह्या धंद्याला वर काढण्याचे हेतूनें १९३४ साली ही संस्था स्थापण्यांत आली. १९५३ सालीं अविरत प्रयत्न करून नांवारुपाला आलेल्या ह्या संस्थेची स्वतःची एक प्रशस्त इमारत बांधण्यांत आली. १९५८-५९ सालीं ह्या संस्थेचे २३० विणकर संस्था सभासद होते. ह्या संस्थेची नागपूरांत दोन दुकानें आहेत. ह्या संस्थेला विदर्भ को-ऑपरेटिव्ह बँक व नागपूर मध्यवर्ति बँकेने फार मदत केली. सांप्रत विणकरांची परिस्थिति सुधारण्याकडें महाराष्ट्र सरकारचेहि लक्ष्य वेधले आहे. इतर उद्योगाच्या संस्थाहिं चांगले काम करीत आहेत. निरनिराळ्या क्षेत्रांतील कारागिरांना शिक्षण देण्यासाठीं नागपूर सेंट्रल टेक्स्टाईल इंस्टिटयूट नांवाची संस्था आहे. या टेक्निकल संस्थेमार्फत मातीची भांडी, विटा, कवेलू, शिवणकाम, सुतारकाम, लोहारकाम, होजियरी, फळजोपासना व हातमाग, इत्यादि बाबतींत शिक्षण दिलें जातें.

विदर्भ विणकर केन्द्रिय सहकारी समिति :

हातमाग धंद्याचा विकास : विणकर सहकारी संस्था स्थापणें, कर्ज व आर्थिक मदत व रिबेट, कापडाचा दर्जा वाढविणें, विणकरांची सामाजिक आणि आर्थिक सुधारणा ह्यावर अवलंबून आहे. त्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

खादी आणि ग्रामोद्योग :

घरगुती उद्योगधंद्यांचा विकास आणि वाढ करण्याचे दृष्टीने आणि बेकार कारागिरांना काम मिळवून देण्याचे दृष्टीनें भारत सरकारनें कायद्यान्वयें अखिल भारतीय खादी आणि ग्रामोद्योग मंडळ स्थापन केले आहे.

मंडळानें खालील उद्योगधंद्यांचा जोमदार विकास करण्याचें हातीं घेतले आहे :—

- मधमाशा पालन.
- काडचाच्या पेटचा तयार करण्याचा धंदा.
- कुक्कुट पालन.
- साबण तयार करणें.
- चर्मोद्योग.
- तेलघाणी.
- हातकागद तयार करणें.
- नीरा आणि ताडगूळ.
- हातसडी तांदूळ.
- तंतुउद्योग.
- गूळ व खांडसारी.
- लोहार व सुतारकाम.
- पिठाच्या चक्क्या.
- खादी.

खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत वरील निरनिराळ्या औद्योगिक संस्थांना अवजारें आणि साधनसामग्रीच्या खरेदीसाठीं, गोदामे बांधण्यासाठीं आणि भागभांडवलासाठीं आर्थिक मदत देण्यांत येते. कळमेश्वर या ठिकाणीं तेलघाणी निर्मितीचे काम चालते. त्यासहि प्रोत्साहन देण्यांत येत आहे.

जंगल कामगार सहकारी संस्था :

जंगल कामगार हे बव्हंशी आदिवासी आहेत. त्यांच्या कामाबद्दल त्यांना पूर्ण वेतन मिळावें आणि धंद्यांतील नफा त्यांच्या पदरांत पडावा एवढाच उद्देश केवळ जंगल कामगार सहकारी संस्थांच्या विकास योजनेच्या मुळाशी नसून सांघिक शारीरिक आणि बौद्धिक प्रयत्नांच्या जोरावर व्यवहार चालविण्याची जबाबदारी पार पाडण्याचे शिक्षण त्यांना मिळावें हे पण एक मुख्य उद्दिष्ट आहे. वन्य जमातींचे राहणीचे मान उंचवावे व त्यांची सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक सुधारणा घडवून आणावी हा या योजनेचा दुसरा हेतू. ह्या दृष्टीनें ६ जंगल कामगार संस्था जिल्ह्यांत कार्य करीत आहेत.

८. आरोग्य

नागपूर येथें दोन प्रमुख इस्पितळे रोग्यांवर उपचार करण्यासाठीं आहेत. एक म्हणजे मेडिकल कॉलेज हॉस्पिटल व दुसरे म्हणजे मेयो हॉस्पिटल हे होय.

मेडिकल कॉलेज हॉस्पिटल १९४७ सालीं स्थापन झाले असून तेथें कॉलेजमधील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण देण्यास उपयोगी पडावे म्हणून व रोग्यांना अद्यावत पद्धतीचे उपचार मिळावे म्हणून सर्व प्रकारच्या सोई आहेत. ऑक्यूपेशनल थेरपीचे शिक्षण व मार्गदर्शन करण्याच्या सोई उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणें शरीरावर कोठे विकृती झाली असल्यास त्यावर प्लॅस्टिक सर्जरी करण्याची सोय आहे. आऊट डोअर वार्ड मध्यें बाहेरच्या लोकांना औषधोपचार होतात. गंभीर प्रकारच्या आजाऱ्यांना दवाखान्यांत ठेवून घेण्यांत येते. तेथे ८९१ खाटांची सोय आहे.

मेडिकल कॉलेजला जोडून क्षयरोग्यांवर मोफत उपचार करण्यासाठी केन्द्र आहे. ह्या ठिकाणीं लहान बालकांच्या क्षय रोगांवर उपचार करण्यासाठीं एक वार्ड नुकताच खोलण्यांत आला आहे. क्षय रोग बरा होऊं शकतो. तो रोगी पुन्हा समाजाचा चांगला घटक होऊं शकतो. त्यासाठीं तो बरा झाल्यानंतर समाजाने त्यास जवळ केले पाहिजे. ह्यासाठीं नंतर घ्यावयाची काळजी ह्या विभागामार्फत घेण्यांत येते. बरे झालेल्या रोग्यांच्या पुनर्वसाहतीची योजना ह्या केन्द्रांत लागू करण्यांत आली असून तिचे कार्य समाधानकारक चालले आहे. ह्या रोगांसंबंधी प्रयत्न करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना येथें प्रशिक्षण देण्यांत येते. ह्या केन्द्राची जिल्ह्यांत जागोजागी उपकेन्द्रे आहेत. मेडिकल कॉलेजांत फिजियो-थेरपी, मॅक्सिलो फेशियल सर्जरी, आदींच्या सोई नव्यानेंच उपलब्ध करण्यांत आलेल्या आहेत. मेडिकल कॉलेज हें नागपूरचे प्रमुख आकर्षण आहे.

मेयो हॉस्पिटल फार जुने असून ते सन १८६३ मध्यें सुरू झाले. येथील प्रमुख डॉक्टरांना सिव्हिल सर्जनचा हुद्दा आहे. मेयो हॉस्पिटलमध्यें लेप्रसी क्लिनिकचीहि व्यवस्था असून कुष्ठ रोग्यांसाठीं ६ खाटांची सोय आहे.

नागपूर येथें एक आयुर्वेदिक दवाखाना तयार होत आहे. तेथें १०० खाटांची सोय राहील.

ह्या व्यतिरिक्त डागा मेमोरियल हॉस्पिटल, मातृसेवासंघ व म्यूर हॉस्पिटलमध्यें स्त्रिया व बालकांच्या रोगांवर इलाज होतो. विशेषतः मातृसेवा संघाचा पसारा बराच मोठा असून त्याठिकाणीं तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शनाखालीं नर्सेस व मिडवाईव्ज यांना प्रशिक्षण देऊन तयार करण्यांत येते. येथें एक रक्तकोषहि आहे.

नागपूर येथे एक मनोवैज्ञानिक दवाखाना आहे.

रोग निर्मूलन : जिल्ह्यांतून मलेरियाचे उच्चाटन करण्यासाठीं एक युनिट कार्यशील आहे. क्षयरोग प्रतिबंधक उपाय म्हणून बी. सी. जी. लस टोचण्याचा कार्यक्रम आखण्यांत येतो. नागपूर येथें एक फायलेरिया युनिटहि काम करीत आहे.

कुष्ठरोग नियंत्रण : कुष्ठरोग नियंत्रण योजनेनुसार सध्यां एक उपकेन्द्र उमरेड ह्याठिकाणीं असून, मौदा, काटोल, सावनेर ह्या ठिकाणीं एस्. इ. टी. केन्द्रें आहेत. पारशिवनी येथें लेप्रसी क्लिनिक आहे. कुष्ठरोग बरा होऊं शकतो. गरज आहे फक्त बरा झालेल्या रोग्याला समाजाने सहानुभूतीनें वागवण्याची. त्यासाठीं खास मास पाळून लोकमत तयार करण्यांत येत आहे. ह्या कार्यासाठीं नोकरवर्ग तयार करण्यासाठीं एक प्रशिक्षण केन्द्रहि नागपूर ह्या ठिकाणीं आहे.

कुटुंब नियोजन : वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण घालण्याचे हेतूनें जनव्यापी कुटुंब नियोजन मोहिम आंखण्यांत आली असून ती लोकप्रिय करण्यासाठीं प्रचार करण्यांत येत आहे. सावनेर व केलोद येथील आरोग्य केन्द्रांमधील आणि नागपूर येथील वैद्यकीय कॉलेजांतील कुटुंब नियोजन प्रशिक्षण केन्द्रें, तसेंच प्रादेशिक प्रशिक्षण केन्द्रें ह्या मोहिमेच्या प्रसारास हातभार लावीत आहेत. कुटुंब नियोजनाचे काम नरखेड, मौदा, केळोद, कळमेश्वर, कुही येथे चालते. कुटुंब नियोजनाचे मोहिमेचे एक अंग म्हणून शल्यचिकित्सा शिबिरेंहि आयोजित करण्यांत येतात.

तसेंच नुकतेच एक फिरते कुटुंब नियोजन पथक नागपूर येथें सुरू झाले असून त्याचे कायक्षेत्र नागपूर विभाग राहील.

वैद्यकीय सोयीं :

जिल्हयांत जलालखेडा, मोवाड, काटोल, पिंपळाकेवलराम, नरखेड, कोंढाळी, बढेगांव, खापा, सावनेर, खैरी, कळमेश्वर, पारसिवनी, देवळापार, रामटेक, मौदा, बोरखेडी, कामठी, कुही, उमरेड, भिवापूर, आदी गांवी वैद्यकीय सोयी उपलब्ध आहेत. ह्या-पैकी कांहीं ठिकाणी शासनाद्वारा, कांहीं ठिकाणीं शासकीय अनुदानांतून व कांहीं ठिकाणीं स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत वैद्यकीय केन्द्रें चालविण्यांत येतात. एक शासकीय फिरता दवाखानाहि आहे.

वरील ठिकाणापैकीं नरखेड, बढेगांव, कळमेश्वर, मौदा, कुही, भिवापूर व बोरखेडी ह्या ठिकाणीं प्राथमिक आरोग्य केन्द्रें आहेत.

प्राथमिक आरोग्य केन्द्रें :

नागपूर जिल्हयांतील विकास गटांत प्राथमिक आरोग्य केन्द्रें उघडण्याची योजना आहे. त्यानुसार कळमेश्वर, नरखेड, मौदा, कुही, भिवापूर, नागपूर व सावनेर विकास गटांत अशी केन्द्रें उघडण्यांत आली आहेत. नागपूर व सावनेरखेरीज इतर सगळ्या ठिकाणीं केन्द्रें गटाच्या मुख्य ठिकाणीं असून सावनेर गटांत ती बढेगांव व नागपूर गटांत बोरखेडी ह्या ठिकाणीं आहेत. ह्या केन्द्रांची ३-३ उपकेन्द्रें असतात. मुख्य केन्द्र व उपकेन्द्राच्या कार्यक्षेत्रांत लोकांच्या आरोग्याकडे व आरोग्य खात्याच्या विविध योजना विशेषतः कुटुंब नियोजन योजना ह्याकडे लक्ष दिले जाते. ह्या ठिकाणीं दुधवांटपाचेहि काम केले जाते.

प्रशिक्षण कार्यक्रम :

प्रशिक्षणाच्या कार्यक्रमानुसार नागपूर येथील हेल्थ व्हिजिटर्स स्कूल पुढें चालू ठेवण्यांत आले आहे. सावनेर येथील आरोग्य प्रशिक्षण केन्द्रामध्यें सार्वजनिक आरोग्यासंबंधीचे प्रशिक्षण दिले जाते. निर-निराळ्या प्राथमिक आरोग्य केन्द्रांतून दायांना प्रशिक्षण देण्यासंबंधीच्या योजना चालू आहेत. तसेंच नागपूर येथें सॅनिटरी इन्स्पेक्टरांना प्रशिक्षण देण्यांत येते. निरनिराळ्या सार्वजनिक आरोग्य प्रशिक्षणाची गरज भागविण्याकरितां नागपूर येथें एक सार्वजनिक आरोग्य संस्था स्थापन करण्यांत आली आहे. सध्यां ह्या संस्थेत आरोग्य शिक्षणासंबंधीचे प्रशिक्षण, सॅनिटरी इन्स्पेक्टरांचे ट्रेनिंग आणि पब्लिक हेल्थ ओरिएन्टेशनचे प्रशिक्षण देण्यांत येते. १९६०-६१ मध्यें सार्वजनिक आरोग्यासंबंधीच्या पदव्युत्तर डिप्लोमाचे वर्ग सुरू करण्यांत आले. ह्या संस्थेला जोडूनच व्हॅक्सिन इन्स्टिटयूट व पब्लिक हेल्थ लॅबोरेटरी आहे. पब्लिक हेल्थ लॅबोरेटरीमध्यें अन्नांत भेसळ करण्याला प्रतिबंध करण्यासाठीं पाणी व अन्न यांच्या नमुन्यांचे पृथःक्करण करतां यावे म्हणून आवश्यक त्या प्रयोगशालेय सोयी ह्या ठिकाणीं उपलब्ध आहेत. व्हॅक्सिन इन्स्टिटयूट ह्या जुन्या संस्थेत देवीची व कॉलऱ्याची लस तयार करण्यांत येते.

रोग्यांना निर्भेळ व रास्त दरांत औषध पुरवठा होतो की नाही हे पाहण्यासाठीं औषध नियंत्रण व्यवस्थाहि कार्यवाहित आहे.

स्वास्थ्य म्युझियम :

सार्वजनिक स्वास्थ्य विभागामार्फत जनतेला स्वास्थ्यासंबंधी माहिती देण्याच्या उद्देशानें नागपूर येथें राज्य सरकारनें एक राज्यनिहाय म्युझियम उघडलें आहे.

निरनिराळ्या रोगांचे निवारण, निरोध, चांगले स्वास्थ्य राखण्याच्या पद्धति, चांगल्या आरोग्याच्या संवयी, आदि संबंधी माहिती देणारी मॉडेल्स, भित्तीपत्रे, पत्रकें, आदि येथें ठेवण्यांत आलेलीं आहेत.

आरोग्याच्या विविध अंगोपांगांवर चलत् चित्रपटद्वारांहि दररोज माहिती देण्यांत येते.

जन्म-मृत्युच्या नोंदी :

जागतिक आरोग्य संघटना, भारत सरकार, नागपूर महानगरपालिका, राज्यसरकार यांच्या सहकार्यानें नागपूर येथें एका जन्म-मृत्यूनोंदणीं आणि एपिडेमीऑलॉजी ब्यूरोचे काम चालू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांतील लोक आणि निरनिराळ्या राज्य-सरकारांचे नोकर ह्यांना जन्ममृत्युच्या नोंदी दाखल करण्याच्या आणि त्या संग्रहित करण्याच्या शास्त्रीय आणि प्रगत पद्धतीचे शिक्षण देण्याचे काम ब्यूरोकडून केलें जाते.

जिल्हा आरोग्य संघटना : जिल्ह्यांतील आरोग्य योजना कार्यान्वितकरून त्यावर देखरेख ठेवण्यासाठीं एक संघटना अस्तित्वांत आहे. जिल्हा स्वास्थ्य अधिकारी यांची नेमणूक करण्यांत आली असून त्यांचे सहाय्यक म्हणून एक इ. एम्. ओ. व प्रत्येक तालुक्यांत एक हेल्थ् असिस्टंट, सॅनिटरी इन्स्पेक्टर व सॅनिटरी स्टाफ नेमण्यांत आला आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता : ह्या कार्यक्रमाखाली अंतर्भूत असलेल्या ४५ गांवांना नळाच्या पाणीपुरवठ्याची योजना, चरांचे संडास व पाणी पिण्याच्या विहिरींची योजना राबविण्यांत येत आहेत. १६ लाख रुपये खर्च करून कामठी शहराची पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यांत आली असून नागपूर येथील पाणीपुरवठ्यांत, कन्हान योजना पूर्ण करून, वाढ करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेखालील कार्यक्रमांत विविध ८ योजनांचा समावेश होतो. त्यानुसार उपरिनिर्दिष्ट नर्सेस आणि मिडवाईव्ज यांना प्रशिक्षण देणें, आरोग्य योजनांची पुनर्रचना करणें, क्षयप्रतिबंधक केन्द्र, मनोवैज्ञानिक इस्पितळांत वाढ करणें, आयुर्वेद हॉस्पिटल चालविणें आदि योजना कार्यवाहीत करण्यांत आल्या.

९. समाज कल्याण

समाज कल्याण योजनांमध्यें सुधारविषयक कल्याणकार्य, कल्याण विस्तार प्रकल्प, सामाजिक संरक्षण
अथवा तत्सम योजना, सामाजिक आणि नैतिक स्वास्थ्य, पश्चात काळजी कार्यक्रम, शारीरिकदृष्टचा
अपंग झालेल्यांचे कल्याण आणि इतर समाज कल्याण योजनांचा समावेश होतो.

रिमांड होम :

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत महत्त्वाच्या अशा ज्या कल्याणविषयक योजना होत्या त्यांत प्रमाणित
(सर्टिफाइड) शाळा, रिमांड होम्स आणि पश्चात् काळजीविषयक वसतिगृहें
स्थापन करणें आणि त्यांना मदत करणें ही एक योजना होती. त्या
योजनेनुसार नागपूर येथें एक प्रमाणित शाळा, रिमांड होम व आफ्टरकेअर होस्टेल काम करते.

भिकाऱ्यांची समस्या :

भीक मागण्याच्या धंद्याला आळा बसावा म्हणून नागपूर येथें एक बेगर्स होम चालविण्यांत येते. त्यास
जोडून एक परिश्रमालयहिं आहे.

स्टेट होम :

सामाजिक आणि नैतिक आरोग्य आणि पश्चात काळजीविषयक कार्यक्रमासंबंधीं आणखी एक योजना
आहे आणि ती म्हणजे स्टेट होमची.

१९५७ सालीं सामाजिक व नैतिक आरोग्यासंबंधीच्या कार्यक्रमाखालीं स्त्रियांसाठी स्टेट होमची
स्थापना झाली.
ह्याची व्यवस्था नागपूर नगर महिला मंडळाकडे असून ह्या संस्थेमार्फत निराश्रित, परित्यक्ता
विभक्त, विधवा, वेश्या व्यवसायापासून मुक्त करण्यांत आलेल्या व अविवाहित महिला ह्यांच्या पुनर्वस-
नार्थ कार्य केले जाते. त्यांचे संगोपन, प्रशिक्षण व शक्य झाल्यास पुन्हां संसार थाटून देण्यांत येतात.

ह्या व्यतिरिक्त नागपूर सेवा सदन ही संस्था विधवा तसेच निराश्रित स्त्रियांचे पुनर्वसन करण्याचे
कार्य करते.

श्री नेत्र सुधार संघ, नागपूर, ह्या संस्थेमार्फत डोळ्याच्या रोग्यांवर इलाज करण्यांत येतो.

राज्य समाज-कल्याण मंडळ व केन्द्रिय समाज कल्याण मंडळामार्फतहि अनेक कार्यक्रम जिल्ह्यांत
आंखून पार पाडण्यांत येतात.

कल्याण विस्तार प्रकल्प :

ग्रामीण भागांतील स्त्रिया आणि मुलींच्या कल्याणासाठी कल्याण विस्तार योजना असून त्यांची अंमल-
बजावणी केन्द्रिय समाज कल्याण बोर्ड व महाराष्ट्र राज्य समाज कल्याण सल्लागार मंडळामार्फत चाल-
विण्यांत येते. मंडळाच्या आणि समाज विकास गटांच्या कार्यांत समन्वय साधण्यासाठीं एक अट
घातली असून ह्यानुसार मंडळ समाज विकास गटांतच नवीन प्रकल्प सुरू करते. ह्या प्रकल्पामुळें
ग्रामीण विभागांतील बालकांची काळजी घेण्याच्या दृष्टीनें आणि महिलांना हस्तकलेचे शिक्षण देण्याच्या
दृष्टीनें फार उपयुक्त कार्य होते. ह्या केन्द्रांतून बालकांची आणि गरोदर स्त्रियांची वैद्यकीयदृष्टचा
काळजी घेतली जाते. नागपूर जिल्ह्यांतील कल्याण योजना समिति १९५४ सालीं अस्तित्वांत आली.
ह्या योजनेखालीं पांच समाज कल्याण केन्द्रें नागपूर, उमरेड, सावनेर ह्या तालुक्यांत विखुरलेली आहेत.
१९५७ सालीं काटोल तहसिलीमध्यें २५ खेडचांत दुसरी योजना सुरू करण्यांत आली. या दोन्ही
योजनांत बालवाडी, हस्तव्यवसाय केन्द्रें आणि आरोग्य केन्द्रें चालविली जात आहेत व खेडचांतील असंख्य
महिलांना प्रसूतीपूर्व, प्रसूतीनंतर सेवेचा व इतर प्रथमोपचार यांचा फायदा मिळतो. महिला मंडळेंहि
स्थापन करण्यांत येतात. नुकत्याच ह्या योजना ग्रामीण नेत्यांकडे सोपविण्यांत आल्या आहेत.

पण ह्याच योजना मोठ्या प्रमाणांत व विकास गटांशी समन्वयित कार्यक्रम म्हणून विकास गट कुही,
तहसिल नागपूर, भिवापूर विकास गट, तहसिल उमरेड येथें मंडळाच्या वतीनें चालू आहेत.

बालकल्याण केन्द्र :

बालकल्याण कार्यक्रमाखालीं एक बाल सुधार केन्द्र नागपूर येथें चालू आहे.

पंगु मुलांच्या कल्याणासाठीं काम करणारे एक केन्द्र नागपूर येथे नुकतेच सुरू झाले आहे.

मागासलेल्या वर्गाचे व आदि-वासी जमातीचे कल्याण :

नुकतीच आदिवासी जमातीच्या नेत्यांची एक परिषद नागपूर येथें घेण्यांत आली होती. त्या प्रसंगी शेड्युल्ड कास्टस् व ट्राइब्ज चौकशी समितीचे अध्यक्ष श्री. यू. एन. ढेबर यांनी भेट दिली व परिषदेच्या सूचना ऐकून घेवून त्यावर विचार करण्यांत येईल असे सांगितले.

हयांच्यासाठीं घरें बांधणें, हयांच्या मुलांच्या शैक्षणिक विकासासाठीं शिष्यवृत्या व सवलती देणें, चोखामेळा होस्टेलसारख्या वसतीगृहामधून त्यांच्या राहण्याची व्यवस्था करणें आदि कार्यक्रम हया योजनेखाली आखण्यांत आला. आर्थिक दृष्टया मागासलेल्या माणसांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती देण्याच्या योजनेखाली ज्यांचे वार्षिक उत्पन्न १,२०० रुपये अथवा कमी आहे अशांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

मनोरंजनांतून प्रचार :

समाज कल्याणासाठी विशेषतः जातिविषयक भेदाभेद घालविण्यासाठीं समाज कल्याण खात्यामार्फत सिनेमा, कलापथके, कीर्तने, कवि सम्मेलने, आदि द्वारा जोराचा प्रचार करण्यांत येत आहे. हयासाठीं खास प्रचारकहि नेमण्यांत आलेले आहेत.

दारुबंदीचे कायदे :

जिल्हयांतील सारा भाग दारुबंदीच्या कायद्याच्या अंमलाखालीं असून लोकांना दारुबंदीपासून फायदे समजून येऊ लागले आहेत. दारुबंदीचा प्रचार करण्यासाठीं व जनमत तिच्या बाजूने करण्यासाठीं जिल्हयांत सामाजिक कार्यकर्ते व सरकारी अधिकारी यांची मिळून एक जिल्हा दारुबंदी समिति आहे. तिच्या मदतीला एक सिनेमाची गाडीहि आहे.

घरबांधणी :

नागपूरांत व जिल्हयांतील इतर शहारांत घरांचा प्रश्न बिकट झाल्यानें घरबांधणीच्या प्रश्नाला महत्त्व आले आहे. वाढत्या लोकसंख्येमुळें व ग्रामीण भागांतून लोक शहरांत स्थलांतर करून येत असल्यामुळें शहरी विभागांत घरांची टंचाई तीव्रतेने भासते. त्यानुसार औद्योगिक घरबांधणी, कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांसाठी घरें बांधणें, सरकारी नोकरां-साठी घरें बांधणें, कारभारविषयक घरबांधणी, गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन, नगररचना व ग्रामीण भागांचे पुनर्वसन आदी कार्यक्रम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत घेण्यांत आले. त्यानुसार कमी उत्पन्नवाल्यासाठीं १,४०० घरें बांधण्याचे व औद्योगिक घरबांधणी योजनेखाली २,७२० घरें बांधण्याचे ठरले. हरिजनांसाठींहि नवीन वस्त्या बांधण्याचा कार्यक्रम राबविण्यांत येत असून शक्य त्या ठिकाणीं मिश्र वस्ती करण्यांस प्रोत्साहन देण्यांत येत आहे. हयासाठीं एक खास विभाग उघडण्यांत आला असून त्याचे कार्य प्रगतीपथावर आहे. हरिजनांसाठीं व मागासलेल्या जमातीसाठीं पिण्याच्या पाण्याच्या योजनांखाली विहिरी बांधण्याचा कार्यक्रमहि प्रगतीपथावर आहे.

१०. जन मानस निर्माणाचें कार्य

योजनेची प्रसिद्धि :

योजनेची प्रसिद्धि करून तिच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जनतेचे सहकार्य मिळविण्याचे उद्देशानें प्रसिद्धि खाते काम करते. ह्या खात्याची विभागीय व जिल्हा निहाय कचेरी नागपूर येथे आहे. तसेच एक माहिती केन्द्र व रेडियो पुरवठा केन्द्र आहे.

प्रसिद्धि खात्याची प्रकाशने :

महाराष्ट्र राज्याची माहिती जनतेला देण्याचे उद्देशानें व विभागांत झालेल्या विकास-कामाची माहिती देण्यासाठीं विविध प्रकाशने काढण्यांत येतात. महाराष्ट्र रूपदर्शन, महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ, महाराष्ट्र राज्य परिचय, कोयना आदी माहितीपूर्ण पुस्तके ह्या खात्यामार्फत प्रसिद्ध करण्यांत आली. ती ह्या खात्याच्या विविध कार्यालयांत विकत मिळतात.

विभागीय कार्यालयामार्फत ही विविध पुस्तके प्रकाशित करण्यांत आली. त्यांतील विशेष म्हणजे आदिवासींचा प्रश्न, विदर्भाचा विकास—संकल्प आणि सिद्धि, विदर्भाच्या विकासाची गति वाढत आहे बाघ व इतियाडोह आदी ही होत.

तसेच राज्य कार्यालयामार्फत विविध नियतकालिके प्रसिद्ध होतात. विकास कार्याला वाहिलेले ग्राम-विकास, शेती विकासासाठीं शेतकरी, सर्वोदय, बचत योजनेच्या प्रसिद्धीसाठीं अल्पबचत ही मासिके, पोलिस त्रैमासिक आणि राज्यांतील विविध शासकीय घडामोडीची माहिती देण्यासाठीं निघणारे लोकराज्य ही ती नियतकालिके होत. त्यांची विक्री प्रसिद्धी खात्याच्या विविध कार्यालयामार्फत करण्यांत येते.

विविध विकास कार्याची लेखक, वृत्तपत्रप्रतिनिधी आदींना ओळख करून देण्यासाठीं त्यांना त्या त्या ठिकाणीं नेण्यांत येते. हे काम खात्याच्या चालू योजनेखाली करण्यांत येते.

सफरी :

राज्यांतील महत्त्वाच्या प्रेक्षणीय स्थळांना सर्वसामान्य नागरिकांना भेट देणें सुलभ व्हावे, तसेंच थंड हवेच्या ठिकाणी व समुद्रकाठीं अल्प खर्चांत राहतां यावे याकरिता महाराष्ट्र राज्य सरकारच्या प्रसिद्ध खात्याशी संलग्नित असलेल्या प्रवाशी खात्याने निरनिराळ्या योजना आंखल्या आहेत. ह्या योजनेखालीं नागपूर विभागांतील लोकांच्या अजंठा, वेरूळ व औरंगाबाद येथे सफरी काढण्यांत आल्या.

सिनेमाद्वारे व वृत्तपत्रांच्या सहकार्याने वार्ता व लेख प्रसिद्ध करून योजनांची प्रसिद्धी करण्यांत येते. प्रसिद्धीचे मोठे व हमखास परिणाम करणारे साधन म्हणजे प्रदर्शन होय. निरनिराळ्या यात्रा अथवा समारंभानिमित्तानें प्रसिद्धि खात्या मार्फत विकास निदर्शक प्रदर्शने भरविण्यांत येतात. लाखो लोक त्यांचा फायदा घेतात.

ही कामें करण्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळांत जिल्हा प्रसिद्धि -अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आली.

महाराष्ट्र सरकारचे माहिती केन्द्र :

सर्वसामान्य जनतेला आपल्या देशांतील, राज्यांतील आणि विभागांतील विकास कार्याची माहिती व्हावी आणि त्या योगें त्यांनीं विकास कार्याला हातभार लावण्यास उद्युक्त व्हावे, या हेतूनें महाराष्ट्र सरकारनें माहिती केन्द्रें सुरू करण्याची योजना हातीं घेतली. महाराष्ट्रांत दोन मोठी माहिती केन्द्रें आहेत. त्यापैकीं नागपूर येथील माहिती केन्द्र हें एक असून दूसरे केन्द्र लवकरच मुंबई शहरांत सुरू होईल.

नागपूरचे माहिती केन्द्र सीताबर्डी भागांत वर्धा रोड वरील हिंदी मोर भवन, या इमारतीत पहिल्या मजल्यावर आहे. हे केन्द्र महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्यामार्फत चालविले जाते. केन्द्रांत आकर्षक फोटो, नकाशे, आपोआप चालणारी मॉडेल्स, भित्तिपत्रकें, माहिती फलक, यांच्यामार्फत विविध प्रकारची विकासविषयक माहिती देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

या केन्द्राचा छोटासा ग्रंथालय विभाग आसून त्यांत विकासविषयक ग्रंथ आणि विचारप्रधान साहित्य ठेवण्यांत आलें आहे. याशिवाय निरनिराळ्या व्यवसायाची माहिती देणाऱ्या पुस्तिका, मध्यवर्ति व राज्य पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या विविध परिक्षांची वेळोवेळी प्रसिद्ध होणारी माहितीपत्रकें, इत्यादि उपयुक्त साहित्यहि ठेवलेले आहे. ग्रंथालयांत सुमारे २,५०० पुस्तके आहेत. वाचनालय विभागांत सर्व प्रकारची मिळून १०० हून अधिक दैनिके, साप्ताहिके, मासिकें वाचकांना वाचावयास मिळतात.

फेब्रुवारी १९५८ मध्यें स्थापन झालेले हें केन्द्र जनतेला माहिती उपलब्ध करून देण्याचे कामीं मदत करते. येथें दररोज दिवसभर लोक विविध साहित्य वाचावयास येतात. विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, समाजसेवक, इत्यादि विविध व्यवसायांतील नागरिक या केन्द्राचा फायदा घेत असतात. सुमारें ८,००० लोक दरमहा या केन्द्रांत येतात.

ग्रामीण भागांत सामुहिक रेडियो सेट्स फार महत्त्वाची कामगिरी पार पाडीत आहेत. ते गांवकऱ्यांच्या दारांत जाऊन त्याच्या भाषेंत त्याच्या गावाचा, त्याच्या आजूबाजूच्या भागाचा व संपूर्ण देशाचा झालेला विकास निवेदन करतात.

ग्रामीण जीवनांत रेडीयोचा प्रवेश :

अखिल भारतीय आकाशवाणीवरील कार्यक्रमांत मधून मधून वाद्ये, गाणीं, नाटिका, संभाषणें, वादविवाद यांची योजना करण्यांत येत असल्यामुळें त्यांच्यासंबंधीं गांवकऱ्यांना गोडी वाटते, आणि ते त्यांना चटकन् समजतात. कांही गावकऱ्यांनी हे कार्यक्रम ऐकणाऱ्या लोकांचे गट तयार केले असून ते रेडियो फार्म फोरमस् म्हणून ओळखले जातात. ग्रामीण कार्यक्रमासंबंधी गावकऱ्यांनी वादविवादांतून प्रदर्शित केलेलीं मतें विचारांत घेऊन त्यानुसार आकाशवाणीच्या अधिकारीवर्गास त्यांत योग्य तो बदल करणें शक्य होते व हव्या त्या बाबीसंबंधीची माहिती श्रोतृवर्गास देतां येते. सुधारणा करण्याच्या दृष्टीने या कायक्रमांद्वारें प्रक्षेपित करण्यांत येणाऱ्या सूचना श्रोतृवर्गानें विचारांत घेऊन त्याप्रमाणें कृति देखील केली आहे. ह्या कार्यक्रमांचे शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्व जाणून व रेडियोची उपयुक्तता पटल्यानें राज्य सरकारनें गांवोगांव मागणीनुसार रेडिओ पुरविण्याची योजना आखली, त्यासाठी तंत्रज्ञांची साखळी तयार केली.

रेडियो पुरविण्याच्या योजनेस वर्गणी योजना म्हणतात.

ग्रामपंचायती, नगरपालिका किंवा जबाबदार संस्था ह्या योजनेचा फायदा घेऊं शकतात. आणि आपल्या गांवाकरितां सामूहिक रेडियो सेट मिळवूं शकतात.

रेडियो सेट्स बसविणें आणि तो कार्यक्षम ठेवणें हीं कामें सरकार जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं असलेल्या स्थानिक कचेरीमार्फत करीत असते. रेडियो कार्यक्षम ठेवण्यांत सेट्सची दुरुस्ती, जळून गेलेल्या बॅटरीच्या जागीं नवीन बॅटरी देणें, रेडियो लायसन्स काढणें इत्यादि बाबींचा अंतर्भाव होतो.

पंचायती किंवा त्यांत भाग घेणाऱ्या संस्थांना रेडियो सेटवर, तो बसविण्यावर आणि त्याला कार्यक्षम ठेवण्यावर होणाऱ्या खर्चाचा भाग द्यावा लागतो.

वर्गणी :

बॅटरीवर चालणारे सेट्स	एकदां १७५ रुपये.
मेन्सवर चालणारे सेट्स	एकदां १५० रुपये.
कार्यक्षमता वर्गणी—दरवर्षी ...	६० रुपये.

सामूहिकरित्या ऐकता येईल अशी या रेडियो सेट्सची बनावट करण्यांत आली आहे. मोठ्या जन-समुदायाला रेडियोवरील कार्यक्रम सहजासहजी ऐकतां यावेत म्हणून या सेट्स बरोबर लाऊड-स्पिकर्स असतात. या योजनेसंबंधी सविस्तर माहिती पुढील पत्यावर मिळूं शकेल—इंजिनियर-इन-चार्ज, रुरल ब्रॉडकास्टिंग, प्रकाशन विभाग, इरॉस थिएटर बिल्डिंग, ४२, क्विन्स रोड, चर्च गेट, मुंबई-१.

३१ मार्च १९६१ पर्यंत या योजनेखाली जिल्ह्यांत १०१ सेट्स बसविण्यांत आले आहेत व तेथील हजारो लोक त्यांचा फायदा घेत आहेत.

नभोवाणी शेतकरी मंडळें :

जिल्ह्यांतील सावनेर गटांतर्गत मंगसा, पिपळा डाकबंगला, वाकोडी, इसापूर, उमरी, बिना, नंदगायमुख, सिलेवाडा, सालई ह्या ९ गावांत २० लोकांची प्रत्येकी नभोवाणी शेतकरी मंडळे असून ते दर मंगळवारी सायंकाळी ७॥ ते ८ आकाशवाणी नागपूरवरील कार्यक्रम ऐकतात व त्यावर चर्चा करून चर्चेचा निष्कर्ष आकाशवाणीच्या अधिकाऱ्यास कळवितात.

ह्या मंडळाचे संघटनेसाठीं एका खास संघटकाची सरकारने नुकतीच नेमणूक केली आहे.

केन्द्रीय शासनामार्फत योजनेची प्रसिद्धि करण्यासाठीं एक संघटक येथें नेमण्यांत आला असून ह्या विभागांत सिनेमाद्वारा प्रसिद्धीचे काम तो करीत असतो.

अल्पबचत योजना :

राष्ट्राच्या अभ्युदयासाठीं व योजनापूर्तीसाठीं सर्व्यांनी प्रयत्न करावयास हवेत. कांहींना विकास कार्यासाठीं श्रमदान करतां येईल. कांही लोकांचे ठायीं विकास कार्याविषयी नवी दृष्टी यावी म्हणून झटत राहतील. पण सर्वांनाच राष्ट्राच्या उत्थापनासाठीं आपल्या कुवतीनुसार पैसे वांचवून अल्पबचत मोहिमेत गुंतवतां येतील. शेतकरी, कामकरी, सर्वसामान्य पांढरपेशा नागरिक उत्पन्न आले की प्रथम बचत करावयाची रक्कम बाजूला काढून ठेवील याकडे लक्ष्य देण्यांत येते. त्यामुळें त्याचा व्यक्तिगत फायदा तर होतोच, पण त्यामुळें राष्ट्राच्या प्रगतीला हातभार लागतो.

अल्प बचत गुंतविण्याच्या योजना :

अल्प बचत योजनेंत पैसे गुंतवण्याचे पांच प्रकार आहेत, ते म्हणजे—

(१) १२ वर्षें मुदतीची नॅशनल प्लॅन सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें. ह्यावर दरसाल दरशेंकडा ४·२५ दरानें चक्रवाढ व्याज मिळते.

(२) १० वर्षें मुदतीची ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकिटें. यावर दरसाल दरशेंकडा ४ व्याज दिलें जाते.

(३) १५ वर्षांची अन्युइटि सर्टिफिकिटें. ह्यावर दरसाल दरशेंकडा ४·२५ दराचे चक्रवाढ व्याज धरून मुद्दलाची मासिक हप्त्यानें फेड होते.

(४) पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट. ह्यावर २ ते २½ टक्के व्याज मिळते. किमान २५० रु. खात्यांत शिल्लक असणाऱ्यास चेकनें पैसे काढतां येतात.

(५) संचित मुदतीच्या ठेवीची योजना—ह्या योजनेखाली पांच व दहा वर्षें मुदतीच्या दोन पद्धति असून दरमहा ५ अथवा १० रुपये ठेवण्याची सोय आहे. त्यावर मुदत भरल्यावर दरसाल दरशेंकडा ३·३ ते ३·८ टक्के व्याज देण्यात येते.

याखेरीज बक्षीस रोखें १९६५ ही एक योजना आहे. दर तिमाहींत ड्रॉ करण्यांत येतात व यशस्वी क्रमांकांना बक्षिसें देण्यांत येतात. गुंतविलेल्या रक्कमा बिनव्याजी १९६५ सालीं परत मिळतील.

तसेंच भेटकुपनाचीहि एक योजना आहे. ह्या सर्व योजनांत ठेवलेल्या रकमेस सरकार हमी राहते व त्यावर व्याज परीव्याज मिळते. त्यावर आय-कर नाहीं.

ह्या योजनेचा प्रसार करण्यासाठीं व अल्पबचत करणारांची साखळी निर्माण करण्यासाठीं सरकारी कर्मचाऱ्यांच्या जोडीला एक अल्पबचत सल्लागार समिति नेमण्यांत आली आहे. ह्या समितींत सामाजिक कार्यकर्ते असतात. त्यांचे समाजांतील संबंधामुळ हे काम करणें सोपे जाते.

नागपूर जिल्ह्याचा १९६०-६१ सालीं अल्प बचतीचा इष्टांक ७८ लाख रुपये होता. पण सरकारी नोकर, सामाजिक कार्यकर्ते, अल्पबचत सल्लागार समिति व जनता यांच्या स्तुत्य सहकार्यामुळें इष्टांक तर गाठलाच पण जिल्ह्याने अधिक १० लाख रुपये गुंतवून आतांपर्यंत कधी झाले नाही ते शक्य करून दाखविले. नागपूर जिल्ह्याचा १९६१-६२ सालीं अल्पबचतीचा इष्टांक ८० लाख रुपये असून तो गांठण्यासाठीं पद्धतशीर प्रयत्न चालू आहेत.

११. इतर

नृवंश शास्त्र कार्यालय :

ह्या भागांत भारतांतील कांही विशिष्ट आदिवासी राहतात. मानववंशाचा अभ्यास करणारांना त्यांचा अभ्यास करणें आवश्यक असते. त्यांच्याविषयीं माहिती ठेवण्याचे एक कार्यालय नागपूर येथें आहे.

पुराणवस्तू :

हा भाग प्राचीन असा असून त्याचा इतिहास डोळयांत भरणारा असा आहे. त्याबाबत सखोल संशोधन करण्यासाठीं एक खास कार्यालय नागपूर येथे आहे. तसेच ह्या भागाच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे एक पुराणवस्तू संग्रहालयहि नागपूर येथे आहे.

अग्निशमन प्रशिक्षण संस्था :

आगीपासून बचाव करण्यासाठीं कोणते उपाय योजावेत याबाबत ह्या कामी कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठीं मध्यवर्ति सरकारचे एक केन्द्र व एक महाविद्यालय नागपूर येथें आहे. त्या केन्द्राचे नांव सेंट्रल इमरजन्सी रिलिफ ट्रेनिंग इन्स्टिटयूट असे असून ती संस्था नागपूर येथील विधान सभा भवनाजवळ आहे.

मध्यवर्ति सार्वजनिक आरोग्य इंजिनियरींग संशोधन :

सार्वजनिक आरोग्यासाठीं आवश्यक साधनाबाबत संशोधन करण्यासाठीं एक केन्द्रिय संस्था नागपूर येथे आहे. ती नागपूर येथील सिव्हिल लाईन्समध्यें आहे.

इंधन संशोधन संस्था :

इंधनातील विविध बाबीचे संशोधन करणारी ही केन्द्रिय संस्था नागपूरमधील तेलंगखेडी येथे आहे.

संख्या विभाग :

जिल्ह्यांत व ह्या विभागांत कार्यान्वित असणाऱ्या विविध विकास कार्यावर होणारा खर्च व संपादित यश यांची माहिती गोळा करून तो संकलीत करण्यासाठीं व त्यावरून विविध निष्कर्ष काढून सामाजिक अभ्यासांत मोलाची भर घालणारे एक जिल्हा व एक विभागीय कार्यालय आहे.

१२. नागपूर जिल्ह्यांतील प्रेक्षणीय स्थळें

मोठ्या देशाची छोटी प्रतिकृति या न्यायानें नागपूर जिल्हा देशी वा परदेशी प्रवाशांना देशांत आढळणाऱ्या
निरनिराळ्या अंगांचे मोठ्या आकर्षक स्वरूपांत दर्शन घडवितो. विविध
प्रकारची प्रेक्षणीय स्थळें ह्या जिल्ह्याइतकी इतरत्र क्वचितच सांपडतील. **नागपूर :**
संपन्न निसर्ग, उत्तुंग झाडें, पसरलेले डोंगर, रम्य भूभाग, आरोग्यदायी
हवामान, चांगले रस्ते, निरभ्र निलाकाश, आणि शांत समाजजीवन ही ह्या जिल्ह्याची
वैशिष्टचें आहेत. या जिल्ह्यांतील जंगलांत शिकारीची जनावरें भरपूर असून ती शिकाऱ्यांना जंगलांत
येण्याचे आमंत्रण देतात. संपन्न प्राचीन संस्कृतीचे अवशेष येथें आहेत. तर विकासाच्या विविध कामामुळें
येथील जीवन गजबजून गेले आहे. अशा ह्या गजबजलेल्या ऐतिहासिक जिल्ह्याचे मुख्य ठिकाण नागपूर
हे विभागाचेहि मुख्य ठिकाण आहे. महाराष्ट्र राज्य सरकारचे वास्तव्य काहीं काळ येथें असते म्हणूनहि
नागपूरला महत्व आहे. येथील संत्र्याच्या बाजारामुळें त्यास संत्र्याचे शहर म्हणूनहि संबोधले जाते.

नागपूरचे दोन भाग पडतात. एक म्हणजे रेल्वे रस्त्याचा पूर्व भाग व दुसरा पश्चिम भाग. पहिला भाग
शहर म्हणून ओळखला जातो. तेथें व्यापार चालतो. दुसरा भाग म्हणजे वाढणारे नागपूर शहर होय.
भारताच्या मध्यवर्ति ठिकाणीं नागपूर शहर वसलेले असून भारताच्या सर्व भागाशी ते दळणवळणाच्या
सोईंनी जोडले गेलेलें आहे. येथील हातमाग, कापड गिरण्या, निरनिराळे औद्योगिक व्यवसाय, व्यापार,
कृषि व्यापार व संत्रा मार्केट ह्यामुळें शहराला एक निराळेंच महत्व आहे. त्यामुळें गेल्या २५ वर्षांत ते
मोठ्या प्रमाणांत वाढले.

नागपूर येथें म्युनिसिपल कॉर्पोरेशन व इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली शहराच्या विविध
भागांत विविध सुधारणा घडवून आणण्यांत येत आहेत. गलिच्छ वस्त्या घालविण्याचेहि कार्यक्रम हातीं
घेण्यांत आले असून वाढत्या लोकसंख्येला तोंड देतां यावे म्हणून बर्डी, धंतोली, रामदासपेठ, धरमपेठ,
रविनगर, शंकरनगर, अभ्यंकरनगर हे नवीन भाग निर्माण झाले आहेत.

नागपूर शहराच्या ऐतिहासिक, आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक जीवनाविषयी माहिती इतरत्र
आलीच आहे.

नागपूर शहराचे क्षेत्रफळ ८४ चौरस मैल असून लोकसंख्या १९६१ च्या शिरगणतीनुसार ६४३,१८६
इतकी आहे.

१९६० सालापासून नागपूर महाराष्ट्रांतील एक प्रमुख शासकीय केन्द्र बनले व त्याचे सर्वांगीण
जीवनाला नवीन उजाळा आला. नागपूरचा कायापालट झाला अगदी. नागपुरांत विविध सौंदर्यस्थळांची
फार मोठ्या प्रमाणावर भर पडली. त्यांची व पूर्वींच्या सौंदर्यस्थळांची माहिती खालीं देण्यांत
येत आहे.

रस्ते :

शहराचा पसारा अफाट असला तरी त्यांना जोडणारे रस्ते चांगले बांधलेलें आहेत. वाहतुकीची
व्यवस्था बस व रिक्षांनी होते.

उद्यानें व तलाव :

महाराजबाग.—लहानापासून थोरांना आकर्षण वाटणारी महाराजबाग धरमपेठ रोडवर युनिव्हर्सिटी
व कृषि महाविद्यालय यांच्या जवळ आहे. महाराजबागेंत उद्यान, नर्सरी व प्राणीसंग्रहालय आहे.

अंबाझरी.—गेल्या २ वर्षांत कायापालट होऊन तयार झालेलें सौंदर्यस्थळ म्हणून अंबाझरीचा उल्लेख करतां येईल. हे ठिकाण नागपूरच्या पश्चिमेस ३ मैलावर आहे. याठिकाणीं तलाव असून त्यापासून नागपूरच्या कांहीं भागास पाणीपुरवठा होत असला तरी पण त्यापेक्षां महत्वाची गोष्ट म्हणजे त्याच्या सृष्टी-सौंदर्यामुळें दररोज शेकडो लोक तेथें येऊन मनरमण करतात. नैसर्गिक उंचसखलपणाचा फायदा घेऊन येथें एक सुंदर उद्यान तयार करण्यांत आले आहे.

तेलंगखेडी.—अंबाझरीपासून १ मैलावर तेलंगखेडी उद्यान आहे. तेथेहि सुंदर तलाव आहे.

गांधीबाग.—शहराच्या मध्यवर्ति ठिकाणीं व हातमाग एम्पोरियमजवळ गांधीबाग आहे. गांधीबाग उद्यान फार काळजीपूर्वक तयार केले असून तेथें एक सुसज्ज असा पोहण्याचा तलाव आहे. गांधीबागेंतच स्वामी कृष्णानंद सोख्ता हॉल आहे. हा हॉल सांस्कृतिक कार्यक्रम व सभा आदीसाठीं सुसज्ज असा आहे. वेळोवेळीं तेथें सभा होतात.

शुक्रवारी तलाव.—वॉकर रोडवर शुक्रवारी तलाव असून त्याला गांधीसागर असेहि म्हणतात. तेथें सुंदर उद्यान व मध्यवर्ति सुशोभित बेट आहे.

रंगमंच व सिनेमागृहें :

धनवटे रंगमंदिर.—धनवटे रंगमंदिर उत्तर अंबाझरी रस्त्यावर व्हेरायटी चौकाजवळ विदर्भ साहित्य संघाच्या इमारतींत आहे. सर्व प्रकारच्या नृत्य, संगीत व नाटकें ह्यासाठीं येथील हॉल सुसज्ज असा आहे.

हिंदी मोर भवन.—हिंदी मोर भवन उत्तर अंबाझरी रस्त्यावर व्हेरायटी चौकाजवळ हिंदी साहित्य सम्मेलनाच्या इमारतींत आहे. येथेंहि सुसज्ज असा हॉल आहे. ह्या इमारतींतच शासकीय माहिती केन्द्र आहे.

नागपूरमध्यें जनतेच्या मनोरंजनासाठीं २१ सिनेमागृहें आहेत.

परंतु उद्याचें नागपूरचें सौंदर्यस्थळ कोणते म्हणाल तर येथें तयार होऊं घातलेले यशवंत स्टेडियम हे होय.

स्टेडियम :

१४ नोव्हेंबर १९६० म्हणजेच बालकदिन. हा दिवस नागपूरच्या इतिहासांत महत्त्वाचा दिवस म्हणून गणला जाईल. कारण ह्याच दिवशीं महाराष्ट्राचे मुख्य मंत्री यांनीं पटवर्धन ग्राऊंडवर, त्याच ठिकाणीं सरकार एक स्टेडियम बांधण्याच्या प्रश्नावर सहानुभूतीनें विचार करीत असल्याचें टाळ्यांच्या गजरांत सांगितले.

आणि ह्यानंतर १५ च दिवसांचें अंतरानें सरकारनें पटवर्धन ग्राऊंड, नागपूर कॉर्पोरेशनकडें स्टेडियम बांधण्यासाठी देऊन टाकले.

सरकार व कॉर्पोरेशन समान सहकार्यानें स्टेडियमच्या खर्चांत भागीदार होतील.

नियोजित बहुउद्देशी असे हे स्टेडियम नागपूरचे एक आकर्षण राहील.

ह्या स्टेडियमवर १५,००० प्रेक्षकांची बसण्याची व्यवस्था राहील. या ठिकाणी क्रिकेट, हॉकी, फूटबॉल, टेनिस, बॅडमिंटन आदि खेळांच्या सामन्यांसाठी व्यवस्था राहील. तसेच ह्या ठिकाणी एक पोहण्याचा तलाव राहील व सायकल शर्यतीसाठी मार्ग राहील.

ह्या स्टेडियमच्या पॅव्हिलिएनच्या इमारतींत जर्नालिस्ट होमचीहि जागा राहील.

स्टेडियमचा आकार ७५०′ × ४५०′ राहील. पॅव्हिलियनचे क्षेत्रफळ ५,००० चौरस फुट राहील. तेथें गॅलरीज राहतील ; पैकी आच्छादित गॅलऱ्यांची लांबी ६०० फूट राहील व अनाच्छादित गॅलऱ्यांची लांबी ७०० फूट राहील.

ह्या पॅव्हिलिएनमध्ये वाचनालय व माहिती केन्द्र ठेवण्याचीहि योजना आहे.

गॅलरीच्या मागच्या बाजूला रस्त्याला दर्शनी भागीं ६० दुकानांसाठी जागा राहील.

ह्याचें उत्पन्न स्टेडियमचे दैनंदिन खर्चासाठीं जाईल.

ह्या स्टेडियममध्यें पाहुण्या टीमची राहण्याची व्यवस्था करण्यांत येईल. ह्या ठिकाणी अंतर्गत खेळाच्या सोईहि राहतील. तेथें एक क्लब राहील.

अगोदरच एका स्टेडियमचें बांधकाम चिटणीस पार्कावर प्रगतिपथावर आहे. ह्यावर २.१० लाख रुपये खर्च होईल ; पण त्यायोगें नागपूरकरांची वाढती संपूर्ण गरज भागणें कठीण आहे. ह्याचा विचार करतां नागपूर विभागाचें कमिश्नर डॉ. ए. यू. शेख, मेयर श्री. पन्नालाल देशराज, आदींनीं पुढाकार घेऊन पटवर्धन ग्राउंडवर स्टेडियम बांधण्याचें कल्पनेचा पुरस्कार केला. लोकांच्या खेळाडू वृत्तीला चालना देण्यासाठी अद्यावत व बहुउद्देशी क्रीडांगण बांधण्यासाठीं त्यांच्या नेतृत्वाखाली क्रीडाप्रेमी लोकांच्या सभा झाल्या व कॉर्पोरेशननें तसे क्रीडांगण बांधण्याचा ठरावहि केला. ह्यावर १५ लाख रुपये खर्च येईल.

ह्या स्टेडियमचे पाहणीसाठी एक मंडळहि स्थापण्यांत आले आहे. निरनिराळ्या मार्गांनी मिळणारे ६०,००० रुपयाचे वार्षिक उत्पन्न, कॉर्पोरेशनची मदत आदीमधून ह्याचा दैनंदिन खर्च भागविण्यांत येईल.

ह्या स्टेडियमचे उभारणीमुळें नागपूरच्या क्रीडाजीवनांत चैतन्य येईल.

ह्या क्रीडांगणाची कोनशीला मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी ३० मार्च १९६१ रोजीं बसविली.

नागपूरची संत्रीं :

जिल्ह्यांतील ३/४ भागांत होणारी गोड संत्री येथील व्यापारांत महत्वाचें स्थान पटकावून बसली आहेत. त्यापासून दर साल १॥ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते.

नागपूर येथील इतर संस्था प्रमुख :

नागपूर चबर ऑफ कॉमर्स, टेक्स्टाईल महाविदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स, नागविदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स, मिल्स असोशिएशन, विदर्भ बुनकर सहकारी संस्था, सेवासदन, सोशल वेलफेअर कौन्सिल, रामकृष्ण आश्रम, भारतसेवक समाज, अंधविद्यालय, सी. पी. क्लब, गोंडवना क्लब, नागपूर संशोधन मंडळ, भगिनी मंडळ, माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठीं डिस्ट्रिक्ट सोल्जर्स, सेलर्स व आर्मीमेन्स बोर्ड, प्रादेशिक सेना केन्द्र, म्युझियम, भोसले यांची छत्री, प्रवाशांसाठी सर्किट हौस, रेस्ट हौस व हॉटेलें.

इतर प्रेक्षणीय स्थळें :

नागपूर खेरीज जिल्ह्यांत इतर प्रेक्षणीय स्थळें बरीच आहेत.

अदासा :

सावनेर तहसिलींतील, नागपूरपासून १७ मैलावर असलेल्या अदासा ह्या गांवीं गणपतीचें प्रसिद्ध देऊळ आहे. त्या ठिकाणीं पौष वद्य चतुर्थीला गणपतीची मोठी यात्रा भरते.

अंभोरा :

उमरेड तहसिलींत वैनगंगा, कन्हान आणि आंब नद्यांच्या त्रिवेणी संगमावर अंभोरा हे गांव वसलें असून तेथें चैतन्येश्वराचे एक मंदिर व हरिहर स्वामीची प्रेक्षणीय समाधी आहे. येथें कार्तिक अमावस्येला मोठी यात्रा भरते.

भीवकुंड :

उमरेड तहसिलींत, उमरेडपासून २२ मैलांवर असलेल्या भीवकुंड गांवी तीन गुंफा असून त्यांचा संबंध पांडवांशी दाखविण्यांत येतो. भीवकुंड नांवाचे एक तीर्थहि त्या ठिकाणीं आहे.

भीवागड :

रामटेकपासून १८ मैलावर, रामटेक तहसिलींत असलेल्या भिवागड गांवीं किल्ल्याचें अवशेष सांपडतात. येथील कुवारा भिवसेन ह्या ठिकाणीं चैत्रांत भिवसेनच्या यात्रेसाठीं हजारो गोंड लोक येतात.

भिवापूर :

नागपूर जिल्ह्यांतील, उमरेड तहसिलींतील एक गांव. येथें गोंडकालीन दूर्ग व देवीची भव्य मूर्ति आहे.

धापेवाडा :

कळमेश्वरपासून ५ मैलावर असलेले सावनेर तहसिलींतील हे गांव, चंद्रभागा नदीच्या कांठी वसलेलें आहे. येथें कोष्टी लोकांचे मोठे यात्रास्थान आहे. तेथें आषाढी पौर्णिमेला विठोबाची मोठी यात्रा भरते.

जलालखेडा :

काटोल तहसिलींतील ह्या गांवी एक किल्ला असून एके काळीं हे भोसले राजवटीचे एक महत्वाचे ठिकाण होते. येथें महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. येथील हातमागाचे कापड प्रसिद्ध आहे.

जुनापाणी :

येथील अश्मवर्तुळें प्रसिद्ध आहेत. ती गवळी लोकांच्या वस्त्यांचें अवशेष असावेत.

कळमेश्वर :

येथील लुगडी प्रसिद्ध असून येथें रथाची यात्रा चैत्रांत भरते. तेलघाणीचे एक महत्वाचे उत्पादन केन्द्र म्हणूनहि कळमेश्वरची प्रसिद्धि आहे.

कामठी :

कन्हान नदीवर नागपूर तहसिलींत वसलेलें असून येथे रेल्वे स्टेशन आहे. येथें टेबल-विटा, इंग्रजी कौले, विडचा व रंग यांचे कारखानें आहेत. मोमीन लोक सुती कापड काढतात. येथें मिलिटरी विभागहि आहे. एन् सी. सी. च्या अधिकाऱ्यांना येथें प्रशिक्षण देण्यांत येते.

काटोल :

तालुक्याचें ठिकाण असून संत्र्याच्या बाजारासाठी प्रसिद्ध आहे.

कोराडी :

नागपूर तहसिलींत आहे. येथें अभ्रकाच्या खाणीं असून, चैत्रांत येथील देवीची मोठी यात्रा भरतें.

खापरखेडा :

नागपूरपासून १३ मैलावर, सावनेर तहसिलींतील ह्या गांवी कन्हान नदीवर नागपूर विभागांतील पहिलें थर्मल वीज निर्मिती स्टेशन निर्माण झाले. तेथें ६०,००० किलोवॅट वीज निर्माण होतें व ती ह्या विभागांतील प्रमुख ठिकाणांना विविध कारणांसाठी पुरविलीं जातें. वीज निर्मिती क्षमतेंत आणखी वाढ करण्यांत येत आहे.

करवाही :

रामटेक तहसिलीतींल करवाही खेडयांत आदिवासी लोकांची वस्ती असून त्यांनी संघटनात्मक प्रयत्नांनीं, सरकारी मदत व मार्गदर्शनानें आपल्या खेडयाचा सर्वांगीण विकास करून घेण्याचा विडा उचलला आहे. येथील ग्रामपंचायत फार कार्यक्षम आहे.

मन्सर :

कामठीच्या उत्तरेस १५ मैलावर व रामटेकपासून ५ मैलावर, नागपूर-जबलपूर ह्या राजरस्त्यावर मन्सर हे प्रसिद्ध ठिकाण असून रामटेक भोवतालच्या ८ प्रसिद्ध तीर्थस्थानांपैकीं हे एक स्थान आहे. येथे पूर्वी बुद्ध-स्तूप असावेत. चैत्र महिन्यांत मोठी यात्रा भरते. याच्या आसपास मँगनीजच्या पुष्कळ खाणी आहेत.

मौदा :

रामटेक तहसिलींतील ह्या गांवी अमराई प्रसिद्ध आहे. येथे एक सतीचा खांब आहे. एका जीर्ण-कुंडाचा उपयोग करून जनतेनें विकास गटाच्या सहाय्यानें पिण्याच्या पाण्याची नळानें सोय करून घेतली आहे.

नगरधन :

९४० इसवीच्या एका ताम्रपटांत रामटेक तहसिलींतील नगरधनचा नंदीवर्धन म्हणून उल्लेख सांपडतो. हे पूर्वीचें ह्या विभागाचें प्रमुख ठिकाण असून इतिहासप्रसिद्ध स्थान आहे. येथे कोतेश्वर महादेवाचे हेमाडपंथी देवालय आहे. येथील शंखतीर्थ प्रसिद्ध आहे.

नंदागायमुख :

सावनेर तहसिलींतील ह्या गांवी पौराणिक गायमुख पाहण्यासारखे आहे.

मोहपा :

येथ दर बुधवारी बैलांचा फार मोठा व्यापार चालतो.

कोहळी :

येथील दुग्धव्यवसाय संस्था प्रसिद्ध आहे.

मेटपांजरा :

एकजुटीनें व कर्तबगार व्यक्तींच्या नेतृत्वाखाली ७५० वस्तीच्या काटोल तहसिलींतील ह्या खेडचानें आपला सर्वांगीण विकास करून घेतला आहे. गांवांत पाण्याचे नळ, वीज, शाळा, दवाखाना, बांध-बंदिस्तीची योजना आदी गोष्टींत ह्या गांवानें बरीच प्रगति केलीं आहे.

पाटणसावंगी :

सावनेर तहसिलींतील ह्या खेडचांत जुन्या किल्याचें अवशेष सांपडतात.

सावनेर :

तालुक्याचें प्रमुख ठिकाण. जैमिनी अश्वमेध यज्ञकांडात याचा सारस्वतपूर म्हणून उल्लेख आढळतो. येथें किल्ल्याचें अवशेष सांपडतात. कापसाचा मोठा व्यापार चालतो.

उमरेड :

तालुक्याचे प्रमुख ठिकाण. येथें एक जुना किल्ला आहे. येथें कोष्टी लोकांची वस्ती बरीच असून धोतरें व साडचा प्रसिद्ध आहेत. येथे मिरच्याचा बराच मोठा व्यापार चालतो.

वाठोरा.—काटोल तहसिलींतील ह्या गांवी अश्मवर्तुळें सांपडतात.

डिग्रज.—काटोल तहसिलींतील ह्या गांवी रुख्खडगीर व आनंदानंद स्वामी यांच्या समाध्या आहेत.

बेला.—उमरेड तहसिलींतील ह्या गांवी दत्तजयंतीला घोडचाची मोठीं यात्रा भरते.

रामटेक.—तालुक्याचें प्रमुख ठिकाण असून पौराणिक महत्व असलेले स्थान. अंबागड पर्वतावर रामाची मंदीरें असून येथील खिडशीचा डाकबंगला प्रवाशांच्या दृष्टीने महत्वाचा आहे. येथील अंबाळा, रामसागर हे तलाव व धीवर सोसायटी प्रसिद्ध आहेत. प्रवाशीं लोकांच्या दृष्टीने ह्या ठिकाणास महत्व आहे. त्यांच्यासाठीं विश्रामगृहे तयार करण्यांत आली असून निसर्गरम्य ठिकाणी एका वसतीगृहाची सोय करण्यांत आली आहे.

वर सांगितलेल्या बहुतेक सर्व ठिकाणी जाण्यासाठीं चांगले रस्ते व उतरण्यासाठीं चांगल्या सोई आहेत.

परिशिष्ट १

दृष्टिक्षेपांत नागपूर जिल्हा

क्षेत्रफळ : ३,८४२ चौरस मैल.

लोकसंख्या : १५,११,१८७

प्रमुख ठिकाण : नागपूर. लोकसंख्या : ६,४३,१८६

तहसिली व लोकसंख्या :

नागपूर	...	८,२६,४६५
रामटेक	...	१,७५,२७५
उमरेड	...	१,९२,९२०
सावनेर	...	१,४९,२५०
काटोल	...	१,६७,२७७

शहर : १, नगरें : १२ व खेडीं : १,६६७.

लागवडीखालील क्षेत्र : १३.१२ लाख एकर, जंगल : ५.६५ लाख एकर, इतर : ४.३३ लाख एकर.

उत्तम खाद्य पीकें : संत्रीं, उत्तम नगदी पीकें : कापूस, उत्तम खनिजें : मँगनीज व कोळसा.

गुराढोरांची संख्या : ८,१९,४९३.

फॅक्टरीज : २९५.

रेल्वे मार्ग : २०६ मैल, रस्ते : ४६८ मैल, विमान मार्ग : ४, नभोवाणी केन्द्र : १.

वर्तमानपत्रें : दैनिकें : ११, इतर नियतकालिके : २३.

समाज विकास गट : विस्तारपूर्व गट—५, प्रथमावस्था—४, द्वितियावस्था—४, म्हणजेच १०० टक्के.

सहकारी संस्था : १,१००.

शैक्षणिक संस्था : ९६७, साक्षरतेचें प्रमाण : ३५.०४ टक्के.

शासकीय माहिती केन्द्र : १, वाचनालयें : मध्यवर्ति—१, इतर प्रमुख वाचनालयें—२८. म्युझियम—१.

ग्रामपंचायती : ६५१, त्या खालील खेडीं : १,६६७,

नगरपालिका : १०,

महानगरपालिका : १,

जनपदसभा : ५.

इस्पितळें : ४१.

पर्जन्यमान : ४७.६२ इंच.

कमाल तपमान : ११७° फॅ., किमान तपमान : ४१° फॅ.

जीवनमानाच्या खर्चाचा निर्देशांक : ५११ रु. (आधारभूत सन १९३९).

जन्मप्रमाण : २४, मृत्युप्रमाण : १६.५६.

जिल्ह्याची पंचवार्षिक योजना : संकलिपत खर्चाची तरतूद :

दुसरी योजना— '९३·१३ लाख रुपये.

तिसरी योजना—६१७·२८ लाख रुपये.

परिशिष्ट २

कोणाकडे कशाची चौकशी करावी ?

कामाचे नांव	संबंधित अधिकारी
१. लागवडीसाठी जमीन, तगाई कर्ज, लोखंड, सिमेंट	जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा विकास मंडळ, नागपूर, तसेच तालुका पातळीवर स्थानिक तहसिलदार व गट विकास अधिकारी.
२. शेतीच्या सुधारलेल्या पद्धति, रासायनिक खते, सुधारलेले बी-बियाणें व अवजारें आणि कीटक नाशक औषधें.	जिल्हा शेतकी अधिकारी, नागपूर, तसेच गट निहाय, गट विकास अधिकारी व तहसिलदार, शेतकी अधिकारी.
३. सुधारलेल्या जातींच्या फळझाडांची लागवड	हॉर्टिकल्चरल डेव्हलपमेंट ऑफिसर, सेंट्रल बिल्डिंग, पुणें १.
४. शेती शिक्षणक्रम, शेती व ग्रामसेवक शाळेंत प्रवेश व त्यासंबंधी माहिती.	प्रिन्सिपॉल, ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटर, थारसा व जिल्हा शेतकी अधिकारी, नागपूर.
५. पीक स्पर्धा व प्रदर्शने … … …	जिल्हा विकास मंडळ, नागपूर.
६. जपानी भातशेती व त्यासंबंधी माहिती	जिल्हा शेतकी अधिकारी, नागपूर, तसेंच टेक्निकल ऑफिसर, पॅडी पायलट स्किम, नागपूर.
७. सहकारी संस्थांची स्थापना, कार्यपद्धति व सहकारी चळवळ तसेच ग्रामीण भागांतील लहान उद्योगधंदे, त्यांना मिळणारे सरकारी सहाय्य व मार्गदर्शन आणि वैयक्तिक कलाकारास कला उद्योगास मिळणाऱ्या सहाय्याची माहिती.	डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार, सहकारी संस्था, नागपूर, व गट विकास अधिकारी.
८. शिक्षण संस्थांची स्थापना, कार्य आणि त्यासंबंधी माहिती तसेंच प्राथमिक शिक्षणासंबंधी माहिती.	डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, नागपूर, डिव्हिजनल सुपरिंटेंडेंट ऑफ एज्युकेशन व इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स, नागपूर, तालुका निहाय जनपद सभा.
९. रस्ते व पूल दुरुस्ती व तत्संबंधीची माहिती तसेच डाकबंगले व त्यांत जागा राखून ठेवणें यासंबंधी माहिती.	एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, विभाग १ व विभाग २, सार्वजनिक बांधकाम खाते, नागपूर.
१०. बागायतीसाठी पाटाचे पाणी व छोटे तलाव, तसेच रामटेक येथील विश्रामस्थानांत जागा राखून ठेवण्यासाठीं.	एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, इरिगेशन विभाग, नागपूर.
११. जनावरांचे संगोपन, त्यांच्या रोगांवरील उपाय-योजना.	डिस्ट्रिक्ट ॲनिमल हसबंड्री ऑफिसर, नागपूर.
१२. कोंबडीपालन … … …	पोल्ट्री डेव्हलपमेंट ऑफिसर, खडकी, पुणें ३.

परिशिष्ट २--चालू

कामाचे नांव	संबंधित अधिकारी
१३. ग्रामीण विभागांत ग्रामपंचायती, सहकारी संस्थांतून सामुहिक श्रवणासाठी रेडियो बसविणें व त्यासंबंधी माहिती.	टेक्निशिअन-इन्-चार्ज, ग्रामीण रेडियो विभाग प्रसिद्धि खाते, नागपूर.
१४. अस्पृश्य, मागासलेल्या व आदिवासी जनतेला मिळणाऱ्या सरकारी सवलती, फी सवलत वगैरे.	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नागपूर.
१५. सार्वजनिक आरोग्य संवर्धन, उपचार व्यवस्था व सांथीचे रोग प्रतिबंधक उपाययोजनेसंबंधी.	जिल्हा आरोग्य अधिकारी, नागपूर.
१६. मलेरिया निर्मूलन व डी. डी. टी. फवाऱ्यासंबंधी	आरोग्याधिकारी (मलेरिया निर्मूलन,) श्रद्धानंद-पेठ, नागपूर.
१७. विहिरी, तलाव, रस्ते, शाळागृहे आदिंचे स्थानिक विकास कार्यक्रमांतून येणाऱ्या बांधकामासाठी.	जिल्हा विकास मंडळ, नागपूर.
१८. विकास गट क्षेत्रांतील विकास कामें, त्यांची कार्य-पद्धति व त्यांस मिळणाऱ्या सहाय्यासंबंधी व इतर विकास कामें.	संबंधित गट विकास अधिकारी अथवा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नागपूर.
१९. उद्योगधंद्यासंबंधी मार्गदर्शन	डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज, नागपूर.
२०. वीज योजना व पुरवठ्यासंबंधी ...	सुपरिंटेंडिंग इंजिनियर, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रि-सिटी बोर्ड, नागपूर.
२१. जिल्ह्यांतील पोलिसयंत्रणा व तत्संबंधी माहिती	जिल्हा पोलिस प्रमुख, नागपूर (नागरी विभाग व ग्रामीण विभाग).
२२. जंगलांचे संरक्षण व संवर्धन	डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, नागपूर.
२३. गांवांत पोस्ट सुरू करणें, टपालाची अथवा तारेची व्यवस्था किंवा टपाल व तार-खात्याच्या कार्यपद्धतीसंबंधी.	सुपरिंटेंडेंट, पोस्ट ऑफिसेस, नागपूर.
२४. एस्. टी. चे मार्ग, त्यांची कार्यपद्धति, सूचना व तक्रारी.	डिव्हिजनल कंट्रोलर, महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन, नागपूर विभाग, नागपूर.
२५. हौशी प्रवाशांची आकर्षणें व तत्संबंधींची माहिती	प्रादेशिक व जिल्हा प्रसिद्धि अधिकारी, नागपूर.
२६. ग्रामीण भागांत रस्ते, आरोग्य व पाणीपुरवठा	जनपदसभा, विकास गट.
२७. नोकरीसाठीं नांव नोंदणी	सब-रिजनल एम्प्लॉयमेंट ऑफिसर, नागपूर.
२८. खनिज पदार्थ आदींच्या माहितीसाठीं ...	डायरेक्टर, भूगर्भशास्त्र व खाणी विभाग, नागपूर.
२९. माजी सनिकांच्या, मुलाबाळांच्या व कुटुंबियांच्या हितसंबधीचे प्रश्नासंबधी	जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सोल्जर्स, सेलर्स आणि आर्मीमेन्स बोर्ड नागपूर.

परिशिष्ट २—चालू

कामाचे नांव	संबंधित अधिकारी
३०. जिल्ह्यांतील विविध विभागांच्या योजनांची माहिती.	जिल्हा प्रसिद्धि अधिकारी, नागपूर.
३१. अल्पबचत योजना व तत्संबंधी माहिती ...	जिल्हा अल्पबचत संघटक, नागपूर, अल्पबचत तहसिलदार, जिल्हाध्यक्षांचे कार्यालय, नागपूर.
३२. भूसंरक्षण व बंडिंग योजना	सब्-डिव्हिजनल सॉईल कॉन्झर्वेशन ऑफिसर, काटोल, व जिल्हा शेतकरी अधिकारी, नागपूर.
३३. नागपूर दूध योजना	रिजनल डेअरी डेव्हलपमेंट ऑफिसर, नागपूर.
३४. दारुबंदी प्रचार व स्पिरिट परवाने वगैरे ...	डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ प्रोहिबिशन आणि एक्साईज, नागपूर.
३५. विक्रीकर वगैरे	सेल्स टॅक्स ऑफिसर, नागपूर.
३६. पंचवार्षिक योजना	पंचवार्षिक योजना प्रसिद्धि अधिकारी, नागपूर.
३७. विविध सरकारी प्रकाशने व मुद्रणासाठीं ...	मॅनेजर, गव्हर्नमेंट प्रेस व बुक डेपो, नागपूर.
३८. ग्रामपंचायती, त्यांचा कारभार वगरे ...	कमिश्नर, नागपूर, जिल्हा पंचायत अधिकारी, नागपूर व जिल्हा पंचायत मंडळ, नागपूर.
३९. बंदूक परवाना, हॉटेल, सिनेमा परवाना पासपोर्ट, शांतता व सुव्यवस्था इत्यादि.	जिल्हा मॅजिस्ट्रेट, नागपूर.
४०. विकास कार्यक्रमाचें आंकडे व संख्याविषयक माहिती.	जिल्हा संख्या अधिकारी, नागपूर.
४१. विविध स्वरूपाची माहिती	व्यवस्थापक, माहिती केन्द्र, मोर हिंदी भवन, वर्धा रोड, नागपूर.
४२. मजुर व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्य विमा योजनेबाबत.	विभागीय ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मेडिकल ऑफिसर, मजूर आरोग्य विमा योजना, नागपूर.
४३. मत्स्य संवर्धन	सुपरिंटेंडेंट ऑफ फिशरीज, नागपूर.
४४. भेसळ औषधे आदींबाबत तक्रारी ...	असिस्टंट डायरेक्टर, ड्रग कंट्रोल ॲडमिनिस्ट्रेशन, नागपूर.
४५. होमगार्डस् संघटना	विभागीय संपर्क अधिकारी (होमगार्डस्), नागपूर.

परिशिष्ट २--चालू


कामाचे नांव	संबंधित अधिकारी
४६. घरबांधणी	विभागीय इंजिनीयर, विदर्भ हौसिंग बोर्ड नागपूर, डेप्युटी असिस्टंट कन्सल्टिंग सर्वेअर' नागपूर.
४७. सिमेंट, आयर्न व स्टील पुरवठ्यासंबंधी ...	विभागीय असिस्टंट कंट्रोलर ऑफ सिमेंट, आयर्न व स्टील, नागपूर.
४८. कामगारविषयक प्रश्न	डेप्युटी लेबर कमिशनर, नागपूर व सदस्य, प्रॉव्हिन्शियल इंडस्ट्रियल कोर्ट , नागपूर.
४९. वाफ व धूर नियंत्रण	इन्स्पेक्टर ऑफ स्टीम बॉयलर्स व स्मोक नुइसन्स, नागपूर.
५०. फॅक्टरी नियंत्रण	इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज, नागपूर.
५१. ट्रस्ट नोंदणी	असिस्टंट चारिटी कमिश्नर, नागपूर.
५२. तांत्रिक शिक्षणाच्या सोई	डेप्युटी डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन, नागपूर.
५३. वैयक्तिक आरोग्यासाठी	सिव्हिल सर्जन, मेयो हॉस्पिटल, नागपूर.
५४. विश्वविद्यालयीन शिक्षण	रजिस्ट्रार, विश्वविद्यालय, नागपूर.
५५. वैद्यकीय शिक्षणतसाठी	डीन, मेडिकल कॉलेज, नागपूर.
५६. सार्वजनिक आरोग्य प्रशिक्षण	प्रिन्सिपॉल, पब्लिक हेल्थ इंस्टिटयूट, नागपूर.
५७. देवी व कॉलरा लससंबंधी	डायरेक्टर, व्हॅक्सिन इंस्टिटयूट, नागपूर.

चुकीची दुरुस्ती

पान	ओळ	चूक	बरोबर
३३	१३	३.५	३.६
३३	१४	२५.०	२५.१
३९	१४	१२.८६ घनफूट	१२.८६ लाख घनफूट
४७	२०	२,४०,०००	२४,००,०००
८८	३३	९३.१३	४९३.१३

GPN—J-222—RPON—28-11-61—8,000.

५०८


शासन-व्यवस्था
नागपूर जिल्हा
बेलोना
नरखेड
मोवाड
केळवद
खापा
नांदा
सावरगांव
जलालखेडा
काटोल
सावनेर
पारडशिंगा
मोहपा
कळमेश्वर
कोंढाळी
बाजारगांव
व्याहाड
हिंगणा
गुमगाव
कान्होली
नोरी
देवलापार
कांद्री
रामटेक
कोंढामेंढी
पारशिवनी
मनसळ
खापरखेडा
डुमरी
तारसह
खात
मौदा
कामठी
नागपूर
सोनेगांव
वेलतूर
कुही
जिल्ह्याचे ठिकाण
तालुक्याची ठिकाणें